

# मॉटर्न

१२-१३




वर्षिक पारितोषिक वितरण समारंभ (शैक्षणिक व क्रिडा)
मा. प्राचार्यांचे अभिभाषण



श्री. सुभाष पुरी, बार्सिलोना ऑलिपिक स्पर्धा (अपंग) सहभागाबद्दल अभिनंदन
हस्ते मा. प्राचार्य

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

## मॉडर्न महाविद्यालय, पुणे ४११ ००५.

# 'मॉडर्न' नियतकालिक

# १९९२-९३

**- संपादक समिती -**

**- अध्यक्ष -**

प्रभारी प्राचार्य स. य. गंभीर

**- संपादक -**

डॉ. अरुण दांडेकर

**- सदस्य -**

प्रा. विजय जोशी

प्रा. बाळकृष्ण वाणी

प्रा. (सौ.) मधु साटम

प्रा. विलास आल्हाट

प्रा. महेंद्र गोहेल

प्रा. (सौ.) एल. आर. वेगास

**- विद्यार्थी प्रतिनिधी -**

श्री. पिनाकी देब द्वि. वर्ष, बी. सी. एस.

**प्रकाशक :** प्रा. स. य. गंभीर
प्रभारी प्राचार्य मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**मुद्रक :** राजेंद्र मराठे
सूर्य प्रिंटर्स
७२७, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

**फोटो कंपोज :** नेहा ग्राफिक्स
७२७, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

**मुखपृष्ठ प्रकाशचित्र :** श्री. गणेश साळी तृ. वर्ष शास्त्र (प्राणिशास्त्र)
'इन्सिच' प्रथम पारितोषिक
विजेते प्रकाशचित्र

# संपादकीय

या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस आमच्या प्राचार्यांनी नियतकालीक समितीचा निमंत्रक म्हणून माझा नामनिर्देश केला आणि एक अवघड जबाबदारी अंगावर आली याची सार्थ जाणीव झाली. प्राचार्यांचे अनुभव-संपन्न मार्गदर्शन, नियतकालिक समितीच्या सर्व सहकारी प्राध्यापकांनी केलेली मनापासूनची मदत तसेच कार्यालयीन अधिकारी यांनी दिलेल्या मदतीच्या हातामुळेंच ही जबाबदारी पार पाडू शकलो.प्राचार्य स. य. गंभीर सरांच्या स्नेहपूर्ण आणि सर्वसंपन्न मदतीमुळें हा सर्व कार्यभार पेलताना येणाऱ्या अडचणींवर मात करता आली.

१९९२ - ९३ या शैक्षणिक वर्षात कांही मूलभूत अडचणी आल्या परंतू प्राचार्य स. य. गंभीर सरांच्या सुयोग्य धोरणांमुळे महाविद्यालयाच्या कार्यगतीवर विपरीत परिणाम अजीबात झाला नाही आणि हे शैक्षणिक वर्ष सुरळीतपणे शेवटास गेले. नेहेमी प्रमाणेच या शैक्षणिक वर्षात सुध्दा शैक्षणिक क्षेत्रात, कला क्षेत्रात, संशोधन क्षेत्रात आणि क्रीडा क्षेत्रात आमचे विद्यार्थी आणि प्राध्यापक चांगल्या कामामुळें दाद घेऊन गेले. विविध मंडळे आणि विभाग प्रमुखांचे अहवाल याची साक्ष देतील.

लाख आणि अधिक रुपयांचा संशोधन प्रकल्प स्वकर्तृत्वाने मिळवणाऱ्या डॉ. वि. भा. देशपांडे (मराठी विभाग प्रमुख) यांच्या अभिमानपूर्वक अुल्लेख करावासा वाटतो. नाट्यशास्त्रातील मराठी भाषेतील शब्दकोश तयार करण्यासाठी हे अनुदान विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली, या भारत सरकारच्या संस्थेतर्फे मिळाले आहे. डॉ. वि. भा. देशपांड्यांचे हार्दिक अभिनंदन. या महाविद्यालयातील प्राध्यापकांचा संशोधन क्षेत्रांशी असलेला संबंध आणि संशोधन क्षेत्रात टाकत असलेली भर एक सुखद आनंद देऊन जातो. उप- प्राचार्य पद्माकर आपटे यांच्या शोध निबंधाला मिळालेली आंतरराष्ट्रीय स्वीकृती , डॉ. हेमंत घाटे यांनी वाचलेला शोध निबंध या अशाच कांही सुखद आठवणी. पदव्युत्तर संशोधन केंद्रांना (प्राणिशास्त्र आणि वनस्पती शास्त्र) भेट देण्यासाठी येणारे वैज्ञानिक या संशोधन केंद्राबाबत असलेली कौतुक मिश्रित अुत्सुकताच व्यक्त करतात.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी बांधिलकी मानणारे हे आमचे महाविद्यालय मानसशास्त्र विभागातर्फे मार्गदर्शन केंद्र चालवते तसेच विद्यार्थी दशेतील इतर स्पर्धात्मक परिक्षांची तयारी करुन घेण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविते. अशा उपक्रमांना विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद चांगला मिळतो आणि त्यामुळे अशा उपक्रमांची उपयुक्तताच सिध्द होते.

महाविद्यालयातील सर्वांच्याच सहकार्यामुळे ही जबाबदारी पार पाडता आली. सर्वांचे मन: पूर्वक आभार आणि धन्यवाद.

डॉ. अ. बा. दांडेकर

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| ■ पुणे शहरातील पर्यावरण समस्या व त्याची पुणेकरांमध्ये असलेली जाणीव | कु. मोनाली वाघ | १ |
| ■ क्रीडा वैद्यक शास्त्र | विनय शेरीकर | ३ |
| ■ प्रेम (कविता) | विजय पाटील | ४ |
| ■ पुण्याहुन अजमेरला | स्नेहल पाठक | ५ |
| ■ संगणक : आजची अनिवार्य गरज | रवींद्र काळे | ८ |
| ■ शिकत रहा | जितेंद्र ओव्हाळ | १० |
| ■ डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टिकोण | जितेंद्र ओव्हाळ | ११ |
| ■ शिक्षण क्षेत्रातील प्रदूषण | संजीव मोरे | १४ |
| ■ आम्ही सगळे अंधारात (कविता) | विजय पाटील | १६ |
| ■ उद्योजक : एक विश्लेषण | जितेंद्र ओव्हाळ | १७ |
| ■ कधीही (कविता) | विजय पाटील | २० |
| ■ राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर : एक अनुभव | रोहीदास भंडारे | २१ |
| ■ पर्यावरण व प्रदूषण | संजीव मोरे | २३ |
| ■ कविता | अनिता गुरव | २७ |
| ■ साक्षर जनता, भूषण भारता | साधना गोखले | २८ |
| ■ स्पर्धा | अंजली कानडे | ३० |
| ■ देव आहे की नाही ? | राजश्री फाटक | ३३ |
| ■ शिक्षण सामाजिक विकासाशी निगडीत हवे | शिवाजी बाराते | ३६ |
| ■ जाहिरातीची कला | गीतांजली कोटलकर | ३८ |
| ■ मी केलेला प्रवास | निशीगंधा डोणकर | ४० |
| ■ धागे (कविता) | बिपीन इनामदार | ४१ |
| ■ शोध (कविता) | पौर्णिमा काळे | ४१ |
| ■ मुलाखत- सुभाष पुरी | मनस्विनी प्रभुणे | ४२ |

| | | |
|---|---|---|
| ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर | एस. आर. गायकवाड | ४५ |
| ■ दिनकराचा पुनर्जन्म (कविता) | ललिता बारमुख | ४७ |
| ■ माझी आई (कविता) | सोपान गाडे | ४७ |
| ■ आहे मनोहर तरी..... | सविता केतकर | ४८ |
| ■ चुटके | प्रविण मुरकुटे | ५० |
| ■ बर्म्युडा ट्रॅंगल | अरविंद आटकर | ५१ |
| ■ साक्षर मी झाले ! | शैलजा डंके | ६० |
| ■ गतानुगतिको लोको | मङ्गला सोमण | ६४ |
| ■ कविता | - | ६५ ते ६८ |


**हिंदी विभाग**


| | | |
|---|---|---|
| ■ धर्म क्या है ? | भारती कोळी | ७१ |
| ■ साहित्य में जीवन दर्शन | रमेश निकम | ७२ |
| ■ मनुष्य बनाम पर्यावरण | अर्जुन भोई | ७४ |
| ■ मंथरा अभी भी जिन्दा है । | जितेंद्र राजपूत | ७६ |
| ■ भारत का महान संपूत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर | जितेंद्र ओव्हाळ | ७७ |
| ■ कविताएं | | ७८ से ८१ |


**English Section**


| | | |
|---|---|---|
| ■ The Girl Child of India | Gauri Kulkarni | 85 |
| ■ The Face | Manishkumar Handa | 86 |
| ■ Life | Sanjeev More | 86 |
| ■ Vandemataram | Smruti Shah | 87 |
| ■ Environmental Problems In Pune City & Awareness of these Among Puneites | Mugdha Potnis | 89 |
| ■ Environmental Problems In Pune City | Seema Bothe | 91 |
| ■ Poems | - | 99 to 100 |
| ■ **Reports** | | I To XXX |

## Form IV

### Statement about ownership and other particulars about

# Progressive Education Society's Modern College Of Arts Science And Commerce Pune 411 005 Annual

| | | |
|---|---|---|
| 1. | Place of Publication | :Pune |
| 2. | Periodicity of its publication | :Annual |
| 3. | Printer's Name | :R. G. Marathe<br>Surya Printers,<br>727, Sadashiv Peth, Pune 30. |
| 4. | Publisher's Name (Whether citizen of India) if foreigner, state country of origin. | :Prin. S. Y. Gambhir<br>Modern College Of Arts,<br>Science and Commerce<br>Pune - 5. Indian |
| 5. | Editor's Name (Whether citizen of India) if foreigner, state country of origin. | :Prin.. S. Y. Gambhir<br>Modern College Of Arts,<br>Science and Commerce,<br>Pune -5. Indian |
| 6. | Name and address of individuals, who own the paper and partners or shareholders holding more thanone percent of the total capital | :Modern College of Arts,<br>Science and Commerce<br>Pune -5<br><br>Not applicable |

I Prin. S. Y. Gambhir, hereby declare that the particulars given above are true to the best of knowledge and belief.

**Prin. S. Y. Gambhir**

Publisher



कलामंडळ १९९२-९३



राष्ट्रीय सेवा योजना १९९२-९३



जिमखाना कार्यकारी समिती १९९२-९३



आंतरमहाविद्यालयीन व्हॉलिबॉल (मुली) स्पर्धा        ९२-९३

वरिष्ठ महाविद्यालय विजयी संघ



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (मुले) स्पर्धा १९९२-९३
वरिष्ठ महाविद्यालय, उपविजेता संघ



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (मुले) स्पर्धा १९९२-९३
कनिष्ठ महाविद्यालय उपविजेता संघ



कनिष्ठ महाविद्यालय

आंतर राज्य (शालेय) बॅडमिंटन स्पर्धा १९९२-९३ (विजयी संघ)



कनिष्ठ महाविद्यालय

आंतरशालेय बुद्धिबळ (मुली) स्पर्धा १९९२-९३ (विजयी संघ)



“मॉडर्न श्री” १९९२-९३
श्रीरंग आप्पा वायदंडे




सुप्रसिद्ध अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांच्या हस्ते
कलामंडळ पारितोषिक वितरण समारंभ



**लोकेश अभ्यंकर**
गुणवत्ता यादी
आठवा क्रमांक



**गोपाळ पारसनीस**
गुणवत्ता यादी
दहावा क्रमांक
रसायनशास्त्र पारितोपिक



**कु. वर्षा तुपे**
पुस्तपालन व लेखाकर्म
विषयाचे पारितोपिक



**नूतन उरसळ**
बारावी परिक्षा
७२ टक्के गुण



**संजीव मोरे**
एम. कॉम. भाग १
प्रथम श्रेणी



**मोनाली वाघ**
द्वितीय वर्ष विज्ञान
लायनेस क्लब निबंध स्पर्धा
द्वितीय पारितोषिक



**राजीव तांबे**
हार्मोनिअम - विविध
स्पर्धा यशस्वी सहभाग



**गिरिश कानिटकर**
इंसिकमध्ये सहभाग



**मुग्धा पोतनीस**
लायनेस क्लब निबंध
स्पर्धा प्रथम क्रमांक



**स्नेहल पाठक**
एन. एस. एस. अजमेर
कँपसाठी निवड
आंतरमहाविद्यालयीन हिंदी
स्पर्धा प्रथम क्रमांक



**गजानन डंके**
एन. एस. एस. जिल्हा
स्तरीय कँपसाठी निवड



**शंकर पिनगे**
बी. ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण



**अश्विनी सावंत**
आंतरराष्ट्रीय नेट बॉल व
राष्ट्रीय सॉफ्ट बॉल खेळाडू



**अनिता पारवे**
राज्यस्तरीय जिमनॅस्ट
खेळाडू



**पराग जोशी**
राज्यस्तरीय वजन उचलणे
प्रथम क्रमांक



**राम राजमाने**
विद्यापीठ व्हॉलिबॉल



**संदिप त्रिगुणे**
राज्यस्तरीय विद्यापीठ
क्रिकेट



**संतोष साळुंखे**
आंतरराष्ट्रीय तायकोंदो
स्पर्धा कास्यपदक विजेता



**सुभाष पुरी**
बार्सिलोना ऑलिंपिक
माजी खेळाडू



**ऋषिकेश मद्रासी**
पुणे विद्यापिठ कबड्डी
संघात निवड



**सोमनाथ नलावडे**
पुणे विद्यापिठ कबड्डी
संघात निवड



**मंदा वहिले**
पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन
स्पर्धेत तृतीय कृमांक



**सविता पटवर्धन**
द्वितीय वर्ष विज्ञान
आंतरमहाविद्यालयीन कबड्डी



**प्राजक्ता दाबके**
११ वी वाणिज्य
राज्यस्तरीय जिमनॅस्टीक्स



**एम. जी. फराश**
एम. फिल पदवी संपादन



**डॉ. वि. भा. देशपांडे**
मराठी रंगभूमी
शब्द कोशासाठी विद्यापीठ
अनुदान मंडळाचे
अर्थसहाय्य



**एस आर पोखरकर**
एम. फिल पदवी संपादन



**श्री. एस. एस. कामठे**
म. वि. शिक्षकेतर संघटना, महा.
राज्य शि. से. महासंघ यांच्या
कार्यकारणीवर सदस्य



**श्री. मानसिंग साळुंखे**
शिक्षणशास्त्र निष्णात



**बा. शं. पाठक**
म. वि. कर्मचारी संघटना- सचिव
शिक्षकेतर सेवक संघटना-उपाध्यक्ष



**श्री. आर. पी. काळे**
ज्योतिष विशारद पदविका
संपादन

# मराठी विभाग

# पुणे शहरातील पर्यावरणाची समस्या - व त्याची पुणेकरांमध्ये असलेली जाणीव

कु. मोनाली वसंत वाघ
द्वितीय वर्ष, विज्ञान शाखा - ब

'पुणे तिथे काय उणे' अशी पुण्याची ख्याती सर्वत्रच पसरलेली आहे. पुण्याला सांस्कृतिक, नैसर्गिक आणि विद्येचाही वारसा लाभलेला आहे. पुणं समुद्रसपाटीपासून सुमारे १८०० फूट उंचावर आहे. पुण्याचं हवामान सर्वांनाच मानवणारे आहे. मुंबईसारखे दमट व उष्ण किंवा माथेरान महाबळेश्वरसारखे अती पावसाचे व अती थंडही नाही. पावसाचे प्रमाणही मध्यम आहे. पुणे जवळपास सर्व बाजूंनी टेकड्यांनी वेढलेले असल्यामुळे तिव्र वादळंही अगदी क्वचितच होतात. पर्यावरणाच्या दृष्टीने मुबलक पाणी असणे ही महत्त्वाची बाब मानली जाते. पुण्यात कात्रज, पाषाण तलाव लकाकी तळं वेगवेगळ्या पेठांमधून जिवंत झऱ्यांच्या विहिरी, खडकवासला धरण, मुळ-मुठा नद्या यांच्यामुळे पाण्याची मुबलकता आहे. म्हणून पूर्वी अतिशय घनदाट नसली तरी चांगल्यापैकी वृक्षराजी होती.

अशा समृद्ध पुण्याकडे लोकांचा ओघ न आला तर नवलच ! शिवाय पेशवे व इंग्रजांच्या काळात पुण्याला राजकीय महत्त्व होते. त्यामुळे उच्चविभूषित लोकही येथेच स्थायिक झाले.

१९५३ च्या आसपास H. A. फॅक्टरी आणि इतर छोटे मोठे कारखाने यांना माल पुरविणारे छोटे जोडधंदे सुरू झाले. साहजिकच पुण्यातली वस्तीही वाढायला लागली. जिथे जागा उपलब्ध असेल तिथे तात्पुरती, पक्की घरे बांधायला सुरुवात झाली आणि पूर्वीचं टुमदार पुणं नष्ट व्हायला लागलं. १९६१ साली आलेल्या पुरामुळे तर पुण्याचा चेहेरामोहराच बदलला. त्यामुळे पुण्यातल्या रस्त्यांचा आणि घरांचा कै. स. गो. बर्वे यांनी काढलेला आराखडा धुळीला मिळाला. लोकसंख्या-वाढीमुळे घरबांधणीसाठी बेसुमार, बेताल वृक्षतोड सुरू झाली. परिणामी निसर्गाचा तोल बिघडला. हवा तापायला लागली. पुण्याचं तपमानही वाढायला लागलं. शिवाय अनेक वनस्पती दुर्मिळ झाल्या. त्यांच्यावर अवलंबून असलेले प्राणी, पक्षी यांचीही संख्या कमी झाली. हनुमान टेकडी, पर्वती, चतु:शृंगी ह्यावर झाड, पक्षी यांच्याऐवजी झोपड्याच उभारल्या गेल्या. आणि अजूनही त्यांची संख्या वाढतेच आहे. या झोपडपट्ट्यांमध्ये पुरेशा सुविधाही नाहीत. पर्यावरण बिघडण्याच्या दृष्टीने ही सर्वात घातक बाब समजली जाते. पर्वतीसारख्या भागात तर लोक 'बेबी कॅनॉल'मधील पाण्याचा वापर सर्व दैनंदिन कामासाठी आणि पिण्यासाठी करतात. एवढेच नव्हे तर काही भागातील कारखान्यांमुळे पाणी दूषित होत आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर 'पाटील इस्टेट' झोपडपट्टीतील एक मुलगी 'सुदर्शन केमिकल्स' ह्या कंपनीतून बाहेर टाकलेल्या केमिकल्समध्ये असणारं शिसं पाण्यामार्फत पोटात जाऊन मृत्यूमुखी पडली. अशा तऱ्हेने पाणी 'जीवन' असण्याऐवजी 'मरण' झाले आहे. तसेच नदीत आता तर सर्रास सांडपाणी सोडण्यात येतं. सांडपाण्याचा निचरा होणारी योजना कधी नीट आखलीच गेली नाही. लोकसंख्येला आळा न घातल्यामुळे तर ही समस्या जास्तच बिकट झाली. नदीच्या ह्या प्रदूषणाचा परिणाम नदीतील जलचर व पाणवनस्पतींवर झाला आहे. नदीतील अनेक उपयुक्त मासे तसेच अनेक उपयुक्त वनस्पती नष्ट होत आहेत. पाण्यात जलद वाढणाऱ्या जलपर्णीमुळे

डासही अपरिमित वाढले. अशा तऱ्हेने एके काळी पुण्याचे भूषण असणाऱ्या मुळा-मुठासारख्यां नद्या पुण्याचे दूषण होत चालल्या आहेत.

पुण्यातला कचरा ही खरोखरच रोजची डोकेदुखी झाली आहे. कोथरुडचा 'कचरा डेपो' हा पूर्वी शहराबाहेर असला तरी तो आता शहरातच आला आहे. एवढेच नव्हे तर वारा ज्या बाजूने वाहतो, त्या बाजूला तो असल्यामुळे बहुतांशी घाण परत आपल्याचकडे येत आहे. याकडे बहुतेकांचे दुर्लक्षच झाले आहे.

पुण्यात आणि पुण्याच्या जवळपास असलेल्या कारखान्यांमुळे कार्बन मोनॉक्साइड, सल्फर डायॉक्सॉइड, क्लोरोफ्ल्यूरोकार्बन ह्यासारखे दूषित वायू हवेत मिसळले जात आहेत. यामुळे सजीवांच्या श्वसनसंस्थेला आणि वनस्पतींच्या वाढीलाही धोका निर्माण झाला आहे. पुण्यात स्वयंचलित वाहनांचे प्रमाणही गेल्या काही वर्षात अमाप वाढले आहे. ह्या वाहनांमधून निघणारे विषारी वायू, तसेच आवाज यामुळे पुण्याचे पर्यावरण दिवसेंदिवस फारच गंभीर होत आहे. याची प्रचिती आपल्याला सायंकाळी ५ ते ५.३० च्या सुमारास शिवाजीनगर, कोथरुड, डेक्कन, पुणे स्टेशन सारख्या वर्दळीच्या भागात येते. ह्याशिवाय निरनिराळ्या मंडळांच्या महापूजा, गणेशोत्सव, दुर्गापूजेच्या वेळी लावल्या जाणऱ्या कर्णकर्कश् लाउडस्पिकर्सची भर पडते.

सर्वच दृष्टीने मानवणारा पुण्याचा सुंदर परिसर खरोखरच बिघडला. परंतु गेल्या काही वर्षात मात्र पुण्याच्या सुजाण नागरिकांना पर्यावरण बिघडल्याची जाणीव झाली आहे. महानगरपालिका, अनेक संस्था, अनेक व्यक्ती, शाळा, वृत्तपत्रे, आकाशवाणी आपापल्या परीने जनसामान्यात, 'पर्यावरण' जागृती निर्माण करण्याचे प्रयत्नही करत आहेत. पावसाळ्यात महानगरपालिका वृक्षांची रोपं फुकट वाटते. वनराई, परिसर, रानवा, वाईल्ड, W. W. F. ग्रामायन, रानफूल, सारख्या संस्था परिसराची माहिती आणि त्याचे योग्य जतन कसे करायचे याबाबत जागरुक आहेत. शाळा, वृक्षदिंडी काढून, गेलेले वैभव परत मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. आकाशवाणी, वृत्तपत्रे ह्या प्रसारमाध्यमांतूनही पर्यावरण-विषयक जनजागृती केली जात आहे. लहान मुलांमध्येही पर्यावरण - संस्कार व्हावेत म्हणून शिक्षणमंत्री पतंगराव कदम यांनी शालेय अभ्यासक्रमात पर्यावरण हा विषय सक्तीचा केला आहे, याबाबत त्यांचे आभार मानायला पाहिजेत.

'पर्यावरण - जागृती' करण्यापूर्वी पर्यावरणाचा अभ्यास सखोल आणि योग्य दिशेने केला पाहिजे. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी त्यामुळे प्रदूषण किती प्रमाणात कमी होते हे पाहिले पाहिजे. उदा. जलद वाढणारी पण बारीक पानांची सुबाभुळीची झाडं लावून धुळीचे, पर्यायाने हवेचे प्रदूषण कमी होणार नाही. त्यासाठी रुंद रुंद पानांची धूळ धरून ठेवणारी वड, पिंपळ, साग, यासारखी झाडं लावली पाहिजेत. विजेच्या तारांपर्यंत झाडं वाढली की ती कापावी लागतात. म्हणून त्या ठिकाणी कमी उंचीची झाडं लावावीत. किंवा विजेच्या तारा जमिनीतूनच न्याव्यात. पाण्याचा योग्य ठिकाणी वापर, कचऱ्याची विल्हेवाट योग्य तऱ्हेने झाली तरच पुण्याचं गेलेलं वैभव परत मिळेल.

'पर्यावरणाचा मी एक सदस्य असून, त्याचा समतोल राखणे माझे कर्तव्य आहे' अशी भावना प्रत्येकाच्या मनात उत्पन्न झाली पाहिजे. 'एक घर एक गाडी' पेक्षा 'एक घर एक झाड' असायला पाहिजे. अशा तऱ्हेने 'सुंदर पुणे स्वच्छ पुणे हरित पुणे' हे केवळ स्वप्न न राहता ते सत्य होऊ शकेल. परंतु त्यासाठी भगीरथ प्रयत्न होणे आवश्यक आहे.

# क्रीडा वैद्यक शास्त्र

**विनय शेरीकर**
बी. कॉम., एम. पी. एड.

क्रीडा जगतात १९९२ हे वर्ष भारताच्या दृष्टिकोणातून अतिशय वाईट ठरले. बार्सिलोना ऑलिंपिकमध्ये भारताचे अक्षरश: पानिपत झाले. ज्युनियर एशियन मैदानी स्पर्धेत थोडीफार कामगिरी खेळाडूंनी केली. क्रिकेटचा दक्षिण अफ्रिका दौऱ्याच्या बाबतीत पराभवाचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात.

शारीरिक शिक्षणाचा शिक्षक व खेळाडू या दृष्टीने विचार करताना पराभवाच्या अनेक कारणांचा विचार केला. त्यात एक महत्त्वाचे कारण म्हणजे क्रीडा वैद्यक शास्त्राचा विचार आपल्या भारतात अतिशय कमी प्रमाणात केला जातो. साहजिकच क्रीडा वैद्यक शास्त्र म्हणजे काय ? व त्याचे क्रीडा क्षेत्रातील महत्त्व यांचा प्रामुख्याने विचार करणे हे महत्त्वाचे. खेळाडूंना याची माहिती असणे आवश्यक आहे.

"क्रीडा वैद्यकशास्त्र" ही क्रीडा वैद्यकशास्त्र विभागाची एक उपशाखा आहे. आपल्या देशात यासाठी विशेष पदविका अभ्यासक्रमसुद्धा अजूनपर्यंत पाहिजे त्या प्रमाणात विकसित झालेला नाही.

या शास्त्रात खेळाडूंचा सर्वांगिण अभ्यास करून त्यास खेळ कसा निवडावा, त्यानंतर वयाचा व खेळाचा एकमेकांशी असणारा संबंध, शारीरिक क्षमता, खेळात होणाऱ्या (नियमित) दुखापती व त्यावरील इलाज, दुखापती होऊ नयेत म्हणून घेण्यात येणारी काळजी, प्राथमिक उपचार, (First Aid), वेगवेगळे व्यायाम-प्रकार प्रत्येक खेळासाठी वैशिष्ट्यपूर्ण व्यायाम-प्रकार, खेळाडूंचा आहार, खेळानुसार लागणारा आहार-कॅलरीज, दारू, तंबाखू सिगरेट याने खेळाडूंवर होणारा परिणाम, महिला खेळाडू व त्यांना येणाऱ्या अडचणी, विविध प्रकारचे उत्तेजके (Drugs), वेगवेगळ्या प्रकारचे संशोधनाबाबतचे महत्त्वपूर्ण बाबी, योगासने व त्याचे शरीरावर होणारे परिणाम इ. विचार केलेला असतो.

त्याचप्रमाणे खेळाडू, त्यांचा पूर्वइतिहास व त्यांच्या सभोवतालचे वातावरण, त्यांचा मित्रपरिवार, त्याची मानसिक स्थिती इ. खेळाडूंवर होणारा परिणाम इ. महत्त्वाच्या गोष्टींचा विचार या शास्त्रात केला जातो.

थोडक्यात क्रीडा वैद्यकशास्त्रात व्याधीनंतरच्या उपचारांबाबत माहिती असते. तर क्रीडा वैद्यकशास्त्रात या बरोबरच व्याधी निर्माण होणार नाही, या बद्दलच्या ज्ञानावर अधिक भर असतो.

खेळाडूंच्या बाबतीत त्यांच्या स्वत:च्या व क्रीडा वैद्यकशास्त्रास महत्व प्राप्त झालेला आहे.

नवीन राष्ट्रीय क्रीडा धोरणात 'लहानपणीच खेळाडू हेरा' (Catch them young.!) असे खेळाडूंच्या बाबतीत म्हटले आहे. पण त्याच्यासाठी लागणाऱ्या कसोट्या, ज्ञान-कौशल्य, त्यांची अनुवंशिकता, भोवतालची परिस्थिती इ. बाबतीत मार्गदर्शकास ज्ञान असणे आवश्यक आहे.

कोणत्याही स्तरावरती विजय मिळविणे किंवा उत्कृष्ट खेळाडू तयार करण्यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहे.

१) खेळाडूंचे वय, अंगकाठी
२) खेळाडूंच्या सभोवतालचे वातावरण
३) आहार

४) व्यायाम प्रकार व वैशिष्ट्यपूर्ण व्यायामप्रकार

५) स्पर्धेच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या युक्त्या प्रयुक्त्या (डावपेच)

६) शारीरिक क्षमता

वरील सर्व गोष्टींचा विचार क्रीडा वैद्यक शास्त्रात केला जातो. त्यामुळे खेळाडूस स्वत:च्या खेळासंबंधी व स्वत: विषयी माहिती तर होतेच; पण तो स्वत:तील दोष स्वत: हेरून खेळावर प्रभुत्व मिळवू शकतो.

दुर्दैवाने आपल्या भारतात खेळाडूंच्या तत्कालीन असणाऱ्या कौशल्याचा विचार करून निवड केली जाते. त्यामुळे काही वेळा निवडी चुकतात. यास अपवादही आहेत. इतर राष्ट्रांमध्ये क्रीडा वैद्यक शास्त्रानुसार खेळाडूंची लहानपणीच निवड करून त्यांना त्या शास्त्रानुसार आहार, व्यायाम-प्रकार देऊन खेळासाठी लागणारे कौशल्ये शिकविली जातात. त्यामुळे वैयक्तिक खेळांमध्ये १३ वर्षे वयाची खेळाडू ऑलिंपिकमध्ये सुवर्ण-पदक मिळवू शकतात.

## प्रेम ?

**विजय पाटील**, तृतीय वर्ष कला

तुझं माझ्यावर प्रेम आहे
म्हणजे नेमकं काय आहे ?
माझी वाट पाहणं
माझ्याबद्दल इतरांना विचारणं
मी आलो की माझ्यावर रागावणं
माझ्या मोकळ्या केसातून हात फिरवणं
की माझ डोकं सुन्न करुन जाणं ?
सांग ना -
तुझं माझ्यावर प्रेम आहे
म्हणजे नेमकं काय आहे ?
मी सांगतो -
तुझं माझ्यावर कधीही प्रेम नव्हतं
आणि नाही
तुला हवं होतं एक खेळणं
फक्त तुझा टाइमपास करणारं
तुला हवी होती एक बाहुली
फक्त तुझं म्हणणं ऐकून घेणारी
तुला व्हायचं होतं सूत्रधार
कठपुतलीच्या खेळाचा
पण मला माझा
मेरा नाम जोकर करून घ्यायचा नव्हता

माझं तुझ्यावर प्रेम आहे
आणि कदाचित यापुढे असेलही
पण तुझं माझ्यावरं प्रेम आहे ?
अजून मला कळलं नव्हतं
सांग ना-
तुझं माझ्यावर प्रेम आहे
म्हणजे नेमकं काय आहे ?
मी जेव्हा विचार करतो
तुझ्या माझ्या संबंधाचा
आपल्या दोघांच्या प्रेमाचा
तेव्हा मला आठवतो
प्रेमाचं प्रतिक असलेला तो बदाम
आणि त्याही पेक्षा जास्त
त्यातून जाणारा तो बाण
माझ्या मनात सलत राहतो
मला दिसते
मजनूची व्यथा
दिव्यावर जळणारा पतंग
तुझं माझं प्रेम
या दोघातलं सत्य काय आहे ?
सांग ना -

# पुण्याहून अजमेरला

**स्नेहल अरुण पाठक**
तृतीय वर्ष विज्ञान

१२ फेब्रुवारीला झेलमने आम्हाला घेऊन पुणे सोडले. आम्ही तिसऱ्या दिवशी रविवारी राजस्थानच्या पवित्र मातीत पाय ठेवले. एक शिरशिरी उठली. आणि सर्वांगावर रोमांच उभे राहिले. त्यानंतर समोरच्या घोड्याचा टांग्यातून आम्ही १४ फेब्रुवारीला अजमेरच्या राजकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात पोहोचलो.

येथे मुलींची व्यवस्था 'छात्रा-छात्रावास' येथे होती. सामान ठेवून तोंड वगैरे धुवून आम्ही चहा व नाशत्याचा सकाळी १०.०० वाजता आस्वाद घेतला. त्यानंतर आपापली स्नानादि इत्यादी कामे आवराआवर करून प्रथम घरी "सुखरूप पोहोचल्याचे" पत्र पाठविले व राजस्थानची सांस्कृतिक राजधानी अजमेर पाहायला गेलो. साधारण ११.३०च्या सुमारास आम्ही अजमेरच्या प्रसिद्ध 'गरिब-नवाज' दर्ग्यासमोर पोहोचलो. प्रवेशद्वाराशीच भव्यता पाहून स्तिमित झालो आणि एक दरवाजा, मागून दालन, पुढे चुल्हा, जेथे ५० मण धान्य शिजू शकते. हे पाहून मन थक्क होते. वैभवशाली इतिहासाची माहिती घेऊन मुख्य वर्गापाशी पोहोचलो. तेथील कलाकुसर पाहून व दर्ग्यापाशी पोहचलो. तेथील कलाकुसर पाहून व दर्ग्याच्या पावित्र्याने भारावलो. श्रद्धेने माथा टेकून बाहेर पडलो.

१२.३० ला आम्ही "अडीच दिवसांचे झोपडे" पाहिले. केवळ अडीच दिवसात एवढी सुंदर वास्तू उभा राहू शकते ! असे प्रश्नचिन्ह घेऊनच आम्ही एवढी वास्तू पाहून निघालो. त्यानंतर जवळच्यांच डोंगरावरून संपूर्ण परिसर पाहिला व त्यानंतर एका सुंदर बागेत आलो. तेथे पृथ्वीराज चौहान यांनी बांधलेला "लोकसागर सरोवर " पाहिले. जैन मंदिर पाहिले. तेथे थोडा अल्पोपाहार करून पुढील स्थळ पाहण्यासाठी निघालो.

खरोखर स्वर्ग आहे ? असेल तर तो कसा असावा ? हे प्रश्न आपल्याला पडतात. त्याचे उत्तर देऊ पाहाण्याचा उत्तम प्रयत्न काही कलाकारांनी केलाच आहे. हे आम्हाला जैनमंदिर बघितल्यावर वाटले. खरोखरीच अप्रतिम अशी पितळी मंदिरे, मूर्ती, हत्ती, घोडे वगैरे पाहून आम्हाला त्या मंदिराला नाव द्यावेसे वाटले, 'पृथ्वीवरचा स्वर्ग.' अशा या स्वर्गाहून २.३० ला आम्ही बाहेर पडलो.

आम्ही पुन्हा बेस कँपमध्ये आलो. जेवण घेऊन सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली. ४ वाजता उद्घाटन झाले. प्रमुख पाहुण्यांनी आमच्या 'सद्भावना यात्रेला' शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. पुन्हा सर्वजण चहा घेऊन फिरायला गेलो. एकमेकांशी ओळखी केल्या. सायंकाळी जेवणे उरकून 'पुष्कर' या स्थळाची कल्पना करत झोपलो.

सकाळी ४.३० ला उठून आम्ही प्रात: विधी उरकून नंतर ५.४५ला चहापान केले. त्या दिवशी सद्भावना यात्रेसाठी जाणाऱ्या दलाला दर्गाशरिफ पर्यंत जाऊन निरोप दिला. नास्ता करून पुष्करला जाण्यासाठी निघालो. ब्रम्हा

मंदिरात दशावतारांचे चित्रप्रदर्शन घेऊन निळ्या - हिरव्या पुष्कर सरोवराच्या पाण्याचे दर्शन घेतले व दृश्य नयनमनोहर होते. त्यानंतर पुन्हा बेस कँपच्या दिशेने निघालो. तेथे जेवण वगैरे उरकून सभेसाठी ४ वाजता जमलो. आम्हाला निरोपाचे कार्यक्रम संपल्यावर 'रोटरी क्लब' यांनी आम्हाला मेजवानी दिली. त्याप्रसंगी प्रश्नोत्तरांच्या द्वारा आम्ही राजस्थानी संस्कृती जाणण्याचा प्रयत्न केला.

दुसऱ्या दिवशी म्हणजे १६- २- ९३ रोजी बेस कँपचा निरोप घेऊन आम्ही आमच्या 'सद्‌भावना यात्रेस' ठिक ८ वाजता 'दर्गा शरिफ'पासून सुरुवात केली. त्यापूर्वी "देशाच्या ऐक्यासाठी, सर्वांगिण विकासासाठी आम्ही झटू" अशी प्रतिज्ञा केली. ३८ कि मी. अंतर चालून विविध घोषणांच्या गर्जनात आम्ही "किशनगढ" हा आमचा पहिला स्टे कँप गाठला. त्या वेळी संध्याकाळचे ६.४५ झाले होते. चालून-चालून पाय दुखत होते; पण एक टप्पा गाठल्याचा आनंदही होता. आम्ही जवळच असलेले गोंदतलाव तळे पाहिले. त्यानंतर चहा वगैरे आटोपून किशनगढ किल्ला व बालाजी मंदिराला भेट दिली. संध्याकाळी लाइट गेली, त्यामुळे सगळेच पदयात्री मैदानात बसलो व गाण्याच्या भेंड्या खेळलो. खूप मजा आली. रात्रीच्या जेवणानंतर दुसऱ्या दिवशीची तयारी केली व निद्रेच्या आधीन झालो. १७- २ - ९३ रोजी सकाळी उठून प्रातःविधी आटोपून सकाळी ठीक ८ वाजता पदयात्रेला प्रारंभ केला. आम्हाला भोजियावास येथील ग्रामस्थ घ्यायला आले. त्यांच्याशी बोलत, त्यांच्या दिनचर्येची, राहाण्याची चौकशी करत, त्यांच्या गावापर्यंत पोहोचलो. तिथे आमचे ढोल, ताशांच्या गजरात उत्स्फूर्त स्वागत झाले. त्यांनी आम्हाला दाल-वाटी खायला दिली. आणि त्यानंतर लस्सी दिली. ह्या सगळ्यांचा चर्चाबद्दल सांगायचं तर ते आम्हाला अमृतप्राय वाटले. कारण त्यात त्यांचे प्रेम मिसळलें होते. त्यात जवळ-जवळ आठ दिवसांनी घरचे अन्न मिळाले होते. आणि त्यात ३ कि मी. चालून आलेल्या आमच्या पोटात कावळे ओरडत होते. त्यानंतर हरमाडा ह्या गावी आम्ही साधारण २ वाजता पोहोचलो. तेथे एका शाळेत सभा झाली. आमच्या शिबिर- प्रमुखांनी व मी तेथे भाषण केले. त्यानंतर आम्ही व गुजराथ असा एक समूह करून देशभक्ती- गीते सादर केले व नंतर त्यांचा निरोप घेऊन पुढच्या स्टे कँम्पला म्हणजे "तिलोनिया" येथे पोहोचलो. सर्वात छान व्यवस्था तिलोनियालाच होती. सर्वोत्कृष्ट दर्जाचे जेवण पण आम्हाला मिळाले. तेथे आम्ही हॅन्डीक्राफ्टचे प्रदर्शन पाहिले. खरेदी केली. तेथे सौर ऊर्जा प्रकल्प पाहिला. संध्याकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम केले. "आज प्रथमच आम्ही राजस्थानी खेडे पाहिले. लोकांशी प्रत्यक्ष संबंध आला. आज कृतकृत्य झाल्यासारखे वाटले, अशी चर्चा करत आम्ही झोपी गेलो, दुसऱ्या दिवशीच्या यात्रेसाठी.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे ७.३० ला पुढच्या ४२ कि मी. टप्पा गाठण्यासाठी चालायला सुरुवात केली. मी, माझी मैत्रीण योगिनी तसेच जितेंद्र व बाळासाहेब असे चौघेजण भराभर अंतर कापत सगळ्यांच्या पुढे चाललो होतो. साधारणपणे ३० कि मी. चाललो. तेवढ्यात मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने जितेंद्रला ठोकर मारली. त्यांना जोरदार अपघात झाला. आम्ही ट्रकचा नंबर घेतला. जितेंद्रवर प्रथमोपचार केले व त्याला दद येथील रुग्णालयात नेले. पोलिस चौकीत तक्रार नोंदवली. जबान्या व साक्ष देऊन आम्ही शिबिरस्थळी पोहाचलो. तेथे रडारड चालली होती. तेथे जाऊन 'काळ आला होता पण वेळ आली नव्हती' असे सांगून सगळ्यांचे समाधान केले. त्या वेळी रात्रीचे ठीक ७.३० झाले होते. १८- २- ९३ चा दिवस चांगलाच लक्षात राहिला.

१९- २- ९३ ला ७ वाजता 'गाडीता' ह्या पुढील मुक्कामी जाण्यासाठी निघालो. त्यापूर्वी जितेंद्रला पुढील

उपचारासाठी 'जयपूर' येथे पाठविले. मन काहीसे चलबिचल होत होते. त्यात पायांना फोड आल्याने चालणे अशक्य झाले. म्हणतात ना सामुदायिक यात्रेला वेगळेच महत्त्व व दुर्दम्य उत्साह जाणवतो, त्याचा आम्ही अनुभव घेतला व साधारण ४ वा. गाडीता येथे पोहोचलो. वातावरणात खूपच गारवा होता. तापमान ४ अंश सेंटीग्रेड झाले होते. पुण्याच्या शिबिरार्थी मध्ये चौघेजण थंडी तापाने आजारी पडले. त्यांच्या सेवेत कसा वेळ गेला कळलेच नाही. संध्याकाळी ७ वा. इतर शिबिरार्थी-मध्ये संध्या फेरीला गेले. त्या दिवशी माझ्या मनावर थोडासा ताण होता. त्या अवस्थेतच झोपी गेले.

२०- २- ९३ला बडके बालाजींच्या ४० कि मी. अंतरासाठी पुन्हा बँडेजयुक्त पायांनी मी सज्ज झाले. दोन्ही पाय उचलणे जड जात होते, पण तरीही तीव्र इच्छाशक्तीमुळे मी हेही अंतर ५.३०ला संपवले. त्या दिवशी राजस्थानी गायकांच्या वटसावित्रीसारखा सण होता. त्यांचे पूजाविधी बघून छान वाटले. भारतीय संस्कृती काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत सारखी आहे. आम्ही त्या दिवशीही कार्यक्रम केले.

२१- २- ९३ ला आम्ही "गुलाबी शहराचे" दर्शन घेतले. २८ कि मी. अंतर तोडून आम्ही सायं. ६ वा. जयपूर पाहिले. जयपूरच्या किल्ल्याने आमचे स्वागत केले. पांढऱ्या स्वच्छ संगमरवराच्या दगडांतून कलाकारांनी एक सुंदर बिर्ला मंदिर साकारले होते. त्याच्या दर्शनाने शांत वाटले. आतली लक्ष्मी- नारायणाची मूर्ती पाहून 'श्रमपरिहार' झाला व आम्ही अखेर दादू संस्कृत महाविद्यालयाच्या मंडपात प्रवेश केला. थोड्या वेळाने जितेंद्रला भेटलो. त्याला आम्हाला पाहून आपले अश्रू आवरणे कठीण झाले. आमची पण अवस्था तशीच होती. दुसऱ्या दिवशी आम्ही जयपूरमध्ये आमच्या पदयात्रेचा शेवटचा टप्पा पूर्ण करण्यासाठी निघालो. ८ वाजता निघून १ वाजता "गलताजी" मंदिराला भेट दिली. आसपासचा परिसर पाहिला. इतक्या उंचीवरून जयपूर हे शहर खूपच सुंदर दिसत होते. त्या दिवशी "वीरबालिका महाविद्यालयाच्या" विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून पारंपरिक पद्धतीने आमचे स्वागत केले. नंतर आम्ही सिटीप्लेस पाहिला व दमून भागून शिबिरस्थळी पोहचलो.

दुसऱ्या दिवशी २३- २- ९३ ला आम्ही इतर ठिकाणी म्हणजे पृथ्वीराज चौहानने बांधलेला आमेर किल्ला पाहिला. तेथील वैशिष्ट्य म्हणजे हत्तीयात्रा. तेथे अनेक विदेशी नागरिक भेटले. भारतीय कलेने भारावून गेल्याच्या त्यांच्या प्रतिक्रिया ऐकल्या व भारतात जन्म घेतल्याचा अभिमान वाटला. मुंबईकरांना आम्ही भावपूर्ण निरोप दिला. अश्रू डोळ्यांचे बांध सारखे पार करत होते.

तिसऱ्या दिवशी २४- २- ९३ ला सकाळी आवराआवर करून विरबालिका महाविद्यालयाचा राजस्थानी भगिनींचा, गुजराथी, आंध्र, कर्नाटक, बिलळाडा, अजमेर, चंदिगढ, पंजाब अशा देशाच्या अनेक भागांतून आलेल्या बंधू- भगिनींचा अश्रूयुक्त नयनांनी निरोप घेतला, आयुष्यात कधीही न विसरण्यासाठी. अशा प्रकारे हे अविस्मरणीय शिबिर संपल्याची हुरहूर घेऊन आम्ही गाडीत बसलो. त्या वेळी सगळ्यांनी महत्प्रयासांनी आवरलेले अश्रू पुन्हा बेलगाम होऊन वाहू लागले. आजुबाजूचे अपरिचित लोकही ते दृश्य पाहून स्तंभित झाले. १० दिवसांनी सगळी पाखरं आपापल्या घरट्याकडे जाण्यासाठी निघत होती.

आणि मनात म्हणत होते :

" अशी पाखरे येती, आणिक स्मृती ठेवूनी जाती ।
दोन दिसांची रंगत संगत, दोन दिसांची नाती ।
अशी पाखरे येती........"

# संगणक : आजची अनिवार्य गरज

**रवींद्र काळे**
कार्यालय, लेखाविभाग

सध्याचे युग हे संगणक युग म्हणून ओळखले जाते याची आपणा सर्वांना कल्पना आहेच. त्या दृष्टीने आपणही या प्रगत जगाबरोबर पावले टाकली पाहिजेत. आपल्याकडेही आज विविध क्षेत्रांत संगणकाचा वापर होत असला, तरी हा वापर योग्य पद्धतीने करण्यात आपण कुठे तरी कमी पडत आहोत. ह्या दृष्टीने आपण विचार केला तर खालील गोष्टी निदर्शनास येतात.

**संगणकाचा अभ्यास :**

आज संगणकाच्या अभ्यासाविषयी एक गैरसमज नेहमी होतो. तो म्हणजे, ह्या विषयाचा अभ्यास केवळ विज्ञान शाखेनेच करावयाचा. किंबहुना विज्ञान शाखेतल्या व्यक्तींनाच संगणकाचा अभ्यास करणे जरुरीचे आहे. म्हणून विज्ञानेतर शाखांमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती संगणकाच्या अभ्यासाविषयी उदासीन असतात, म्हणून त्यांचे संगणकाकडे पूर्ण दुर्लक्ष होते. तसे पाहिले तर, विकसीत देशांमध्येच नव्हे तर, भारतासारख्या विकसनशील देशातही सर्व क्षेत्रांमध्ये संगणकाचा वापर अनिवार्य झालेला आहे. ही सर्व क्षेत्रे आणि त्यात काम करणाऱ्या व्यक्ती केवळ विज्ञान शाखेशीच संबंधित आहेत असे नाही. ज्या व्यक्तीने १० वी किंवा १२ वी इयत्तेपर्यंत शिक्षण घेतले आहे आणि इंग्लिश व गणित ह्या विषयांचे ज्ञान आहे अशा व्यक्तींना संगणकाविषयीचे ज्ञान मिळविणे सोपे आहे. अर्थात ह्या सोबत थोडेसे तर्कशास्त्राचे (Logic) ज्ञान असणेही गरजेचे आहे. फक्त संगणकाविषयीचे ज्ञान मिळविण्यासाठी आवड निर्माण व्हावी लागते. एकदा आवड निर्माण झाली की ती व्यक्ती स्वतःच्या कल्पना विकसित करून आपल्याशी निगडित असलेल्या कामासाठी त्या ज्ञानाचा वापर करू लागते. त्यामुळे दैनंदिन कामात सुलभता व सुसूत्रता येऊन कामाची गती कायम राखली जाण्यास मदत होते.

**संगणक ज्ञानाचा हेतू :**

काही ठिकाणी संगणकाचे ज्ञान न मिळण्यामागचे कारण असे की, एकदा आपण हे ज्ञान आत्मसात केले, संगणक यशस्वी पद्धतीने हाताळू लागलो की, स्वतःबरोबरच इतरांची कामेही आपल्यालाच करावी लागतील, असा समज असतो. विशेषत: प्रशासकीय पातळीवर काम करणाऱ्यांमध्ये हा समज अधिक दृढमूल असतो. यासाठी पारंपरिक पद्धतीप्रमाणे आपले काम चालू ठेवण्याची प्रवृत्ती असते. 'मी फक्त माझे काम करीन. इतरांचे काम मी का करावे ?' असा समज असणे किंवा होणे भावनिक पातळीवर रास्त असले तरी, या प्रवृत्तीमुळे आपण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकत नाही.

दोन पावले पुढे जाण्यापेक्षा दोन पावले आपण मागेच येतो, याचा विचार आपण कधीच करत नाही. एवढेच नव्हे तर संगणकाचे ज्ञान घेण्याची इच्छा नसलेल्या व्यक्ती, ज्यांनी संगणकाच्या अभ्यास केलेला आहे, अशांच्या सहकार्यानेही काम करण्याचे टाळतात. इतरांना संगणकाचे ज्ञान मिळविण्यापासून परावृत्त करण्याचाच त्यांचा हेतू असतो. संगणक ज्ञानाचा मूळ हेतू त्यांच्या कधीच लक्षात येत नाही. पुष्कळ व्यक्ती अशा आहेत की, त्यांनी संगणकाबद्दल फारच थोडे वाचले आहे. गंमत अशी की, स्वतःचे ज्ञान अपूर्ण असतानासुद्धा ह्या व्यक्ती 'संगणक' हा चेष्टेचा विषय बनवितात. ह्या बाबतची काही विधाने फारच गंमतीशीर असतात.

उदा.: "संगणकाला नुसते सांगा, 'पेपर तपास' लगेच पेपर तपासून तयार ! संगणका, वडा दे ! आज्ञा द्या ...... लगेच वडा हजर !"

अशा पद्धतीने संगणकाची खिल्ली उडविण्यात ह्या व्यक्ती अग्रेसर असतात. बाकीचे बघे 'हसणारे' असतात.

मित्रहो, ह्या टिंगल करणाऱ्या लोकांना माहीत नाही की, त्यांनी चेष्टेच्या स्वरूपात केलेली विधाने खरी आहेत.

उदा. : बँकेच्या नोकरी संदर्भात ज्या परीक्षा घेतल्या जातात (Bank Recruitment Test) त्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका संगणकाच्याच सहाय्याने तपासल्या जातात.

**समन्वय :**

काही व्यक्तींना संगणकाविषयीचे ज्ञान मिळविण्याची इच्छा खूप असते परंतु हे ज्ञान मिळविण्यासाठी लागणारी जिद्द, सहनशीलता आणि सातत्य नसते. त्यामुळे अशा व्यक्ती संगणकाविषयी ज्ञान मिळवू शकत नाहीत. उदा. : एखादा PROGRAMME दिला की तो TRIAL & ERROR पद्धतीने करणे गरजेचे असते. खरे तर, संगणकावर काम करणाऱ्या व्यक्तीकडून त्याने PROGRAMME, OUT - PUT या सर्व गोष्टींविषयी पूर्ण माहिती घेणे आवश्यक आहे. संगणकाच्या मदतीशिवाय आपण काम करू शकू असा विचार करणाऱ्याने असे लक्षात घेतले पाहिजे की, ज्या कामासाठी आपल्याला साठ तास खर्च करावे लागतात, तेच काम संगणकाच्या सहाय्याने सहा तासात संपविता येते.

**निष्कर्ष :**

संगणक वापरण्याच्या संदर्भात आपल्या महाविद्यालयापुरता विचार करावयाचा असल्यास एका वर्षासाठी लागणाऱ्या वेळेच्या ४० टक्के वेळ आपण संगणकाचा वापर केला तर वाचवू शकतो. त्यामुळे आज प्रत्येकावर जो कामाचा अतिरिक्त ताण पडतो तो कमी होईल. महाविद्यालयीन कामाचा विचार केला तर ८० टक्के काम एकाच स्वरूपाचे असते. असे काम संगणकाच्या साहाय्याने केले तर ते अधिक सोपे होईल. उदा.: प्रवेश, पटक्रमांकाच्या याद्या, प्रत्येक शाखेची वर्गवार, विषयवार माहिती, गुणवत्ता यादी, परीक्षकांची गुणपत्रके, परीक्षेची बिले, लेखा विभागातील विविध कागदपत्रे, आयकर विवरण, हिशेबपत्रके इ.

आपल्या महाविद्यालयात संगणक विभाग आहे. संगणकाविषयीचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सुवर्णसंधी आहे. ह्याशिवाय 'मॉडर्न सेंटर फॉर करिअर गायडन्स' द्वारे छोटे छोटे अभ्यासक्रमही आपण चालवितो. संगणक विभागातील व विज्ञान शाखेतील तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचा फायदाही मिळतो. आपण पुष्कळशी वर दिलेली कामे संगणकाच्या मदतीने करीत आहोत.

एक गोष्ट नक्की, की आपण एकाच विषयात सर्वज्ञ असणे व्यावहारिकदृष्ट्या हितावह नाही. प्रत्येक क्षेत्राविषयी किमान ज्ञान असणे गरजेचे आहे. बाह्य जगात संगणकाचा वापर अनिवार्य होत असल्यामुळे आपणही हे ज्ञान मिळविलेच पाहीजे. A JACK OF ALL TRADES, MASTER OF NONE ह्या इंग्रजी म्हणीप्रमाणे या व्यावहारिक जगात राहणे अनिवार्य झाले आहे.



# शिकत राहा !

**जितेंद्र रामदास ओव्हाळ**
तृतीय वर्ष वाणिज्य (क)

मित्रांनो, महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण करून आपण महाविद्यालयातून बाहेर पडतो. आता आपले शिक्षण पूर्ण झाले. आता काही नोकरीधंदा मिळतो का यासाठी आपण खटपट करू लागतो. आणि पुस्तकांचे व आपले नाते संपते. बस ! आतापर्यंत् खूप शिकलो. शिक्षकांकडून खूप उपदेश ऐकले. आता आम्हास कोणाकडून काही शिक्षण नको. आम्ही आता सुशिक्षित झालो आहोत. उलट आम्ही दुसऱ्यांना शिकवू शकतो ह्या आविर्भावात आपण असतो.

पण नाही मित्रांनो, महाविद्यालयातील शिक्षण किंवा पदवी मिळाली म्हणजे आपले शिक्षण पूर्ण झाले असे होत नाही; तर जीवनातील शिक्षणाचा एक टप्पा आपण पूर्ण केलेला असतो. नोकरी, उपजीविका मिळवण्याचे साधन म्हणून आपण ह्या शिक्षणाकडे पाहिले जातेच. आपणास जीवनात खूप काही शिकायचे असते. त्यातून मोठे व्हायचे असते.

आपण जीवनाच्या ह्या शाळेत जेव्हा येतो, येतो कसे आपणास येथे आणले जाते ? तेव्हा आपण आनंदाने येत नाही; तर रडतो, किंचाळतो. पण आपणाला यावे मात्र लागते. आल्यानंतर पहिले शिक्षण आपणास आपल्या आईकडून मिळते. त्यानंतर आपण शालेय जीवनात, शालेय शिक्षण घेण्यास सुरुवात करतो. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण. आपण ते पूर्ण झाले की, एखादी बऱ्यापैकी नोकरी किंवा एखादा व्यवसाय करून आपल्या मार्गाला लागतो. हा झाला एक टप्पा.

ह्या नंतर आपणास जीवनात खूप काही शिकायचे असते. जेव्हा आपण महाविद्यालयाच्या मोहमयी दुनियेतून बाहेर पडतो, तेव्हा आपल्याला जीवन म्हणजे काय याची जाणीव होते. तेथे आपल्याला कोणीही मार्गदर्शन करायला नसते. सर्व समस्यांना, प्रश्नांना आपल्याला स्वत:ला सामोरे जावे लागते. अशा प्रकारे रोजच्या आयुष्यात ज्या ज्या समस्या येतात, त्यांना तोंड देत, त्यांना पार करीत आपण पुढे जात असतो. त्यातून शिकत राहत असतो. अशा समस्या पुढे निर्माण झाल्यानंतर त्या सोडवण्याची आपली क्षमता, आत्मविश्वास निर्माण होतो, वाढतो.

आपले स्वत:चे अनुभव, त्याचबरोबर आपल्या सहकाऱ्यांच्या अनुभवाने आपण खूप शिकत असतो. तेव्हा आपण सदैव, जीवनाच्या ह्या शाळेत एक विद्यार्थी म्हणून अध्ययन करीत राहिले पाहिजे. शिकून घेतले पाहिजे. आणि जेव्हा आपण ह्या जीवनात खूप शिकून मोठे होतो, म्हणजे वृद्धत्वाकडे वळतो, तेव्हा शरीराबरोबर आपले ज्ञान, बुद्धीही वाढलेली असते आणि आपण या शाळेची पदवी प्राप्त करतो. आणि मग इतरांना ह्या ज्ञानाचा फायदा देऊन इतरांना आपले अनुभव सांगून, त्यांना मार्गदर्शन केले जाते. तेव्हाच आपल्याला दुसऱ्यांना शिकविण्याचा, मार्गदर्शन करण्याचा हक्क प्राप्त होतो. जेव्हा आपण खूप शिकलेले असू, तेव्हा जीवनातील अनुभव, विविध पुस्तके वाचन करीत राहणे; विविध प्रकारचे लोक, त्यांचे स्वभाव, गुण, त्यांचे अभ्यास करणे आणि आपले व्यक्तित्व घडवित राहणे, शिकत राहणे अत्यावश्यक आहे. तेव्हा जीवनातील या शाळेतून कधीही बाहेर पडण्याचा प्रयत्न करू नये. नाही तर या ज्ञानास वंचित होऊ आणि मग आपल्यासारखे करंटे आपणच ठरू.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टिकोण

**जितेंद्र रामदास ओव्हाळ**
तृतीय वर्ष वाणिज्य (क)

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितोद्धारकच नव्हते, समाजसुधारकच नव्हते तर त्याचबरोबर ध्येयवादी विचारवंत, भारतीय घटनेचे शिल्पकार, प्रकांड पंडित होते. आंबेडकरांनी आयुष्यभर अखंड ज्ञानोपासना केली. ते एक नामवंत आणि विद्यार्थ्यांत अतिशय प्रिय असलेले प्राध्यापक होते.

आंबेडकरांपूर्वी महाराष्ट्रात शिक्षणाची चळवळ फार अगोदर सुरू झाली. तो हेतूच उदात्त ध्येयाचा होता. सन १८५१ साली महात्मा फुले यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा काढली. आणि शिक्षणकार्याला आरंभ केला. महात्मा फुले यांना शिक्षणाच्या परंपरेचे आद्य प्रणेते मानले जाते. त्यांची ही परंपरा पुढे लोकमान्य टिळक, आगरकर, महर्षी कर्वे, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सामाजिक व राजकीय परिस्थिती बदलून टाकली. ह्या देशातील क्षुद्र-अतिक्षुद्र यांना मानाने जगता यावे, त्याचप्रमाणे देशातील राजकीय गुलामगिरी देखील नष्ट करावी ह्या उद्देशाने चालविली. याच परंपरेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. ह्या देशातील शेकडो वर्षातील अस्पृश्यता नष्ट करावी व ह्या समाजामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रस्थापित करावी हाच त्यांच्या ह्या शैक्षणिक कार्यामधील मुख्य हेतू होता.

बाबासाहेबांनी आपल्या समाजकार्यात शिक्षणाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या विविध लेखांतून, भाषणांमधून त्यांचे शिक्षणविषयक विचार किती मौल्यवान होते याची जाणीव होते. समाज आणि शिक्षण यांचे अतूट नाते असते. शिक्षणामुळे समाजातील लोकांना एक सुसंस्कृतपणा येतो. समाजाचा दर्जा सुधारण्यासाठी शैक्षणिक स्तर सुधारला पाहिजे. शिक्षण हाच समाजाचा सांस्कृतिक उन्नतीचा आधार आहे, असे आंबेडकरांचे मत होते.

आपल्या समाजात - 'स्पृश्य अस्पृश्य असलेल्या समाजात'- जी विषमता आहे, तिच्या मुळाशी जाऊन आंबेडकरांनी विचार केला की, ही विषमता दूर करायची असेल तर समताधिष्ठित समाज-निर्मिती केली पाहिजे. त्यासाठी शिक्षणाखेरीज दुसरे साधन नाही. त्याचबरोबर पुढे मिळालेले स्वातंत्र्य, त्याचे रक्षण करायचे असेल, तर रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न करणे आवश्यक आहे. आणि ही शक्ती शिक्षणाशिवाय मिळणे शक्य नाही. त्यानंतर आत्मविश्वासपूर्ण व्यवहार त्या समाजाकडून होईल, आणि त्यासाठी आंबेडकरांच्या मतानुसार शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

" शिक्षण ही एक शक्ती आहे. ती प्रत्येक नागरिकाला मिळाली तरच राष्ट्र बलवान होऊ शकेल." " सामाजिक समता आणि स्वातंत्र्य यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आवश्यक असणारी शक्ती म्हणजे शिक्षण " !

ह्या वरील दोन विचारांवरून आंबेडकरांनी शिक्षणाचा किती व्यापक विचार केलेला आहे हे दिसून येते. शिक्षणाच्या बळावर देशातील सर्व नागरिक, सर्व जनता साक्षर होईल. त्यांच्यामध्ये देशप्रेमाची भावना जागृत होईल. तसेच समाज-परिवर्तनाचे विचार त्यांच्या मनाचा वेध घेतील. "शिक्षणातून समाज- परिवर्तन म्हणजेच सामाजिक व्यवस्था," धारणा व जीवन-मूल्य यांच्यातील बदलत्या संदर्भात काळाप्रमाणे होणारे बदल आणि शिक्षणाच्याद्वारे हे बदल

आंबेडकरांना अभिप्रेत होते.

" विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री ह्या पंचतत्त्वानुसार प्रत्येकाने आपले चारित्र्य घडवावे. ज्ञानाला करुणेची व मैत्रीची जोड पाहिजे. आणि सत्यशील होण्यासाठी नि:स्वार्थी, न्यायप्रेमी व व्यापक मनोवृत्तीचे बनावयास हवे. हा मार्ग अवघड आहे. ह्या मार्गाने एकट्याने जावे लागले तरी मनोधैर्य व निष्ठा राखून गेले पाहिजे. "

वरील विचारात आंबेडकरांनी ज्ञानाला पंचशीलाची जोड देऊन आपले चारित्र्य घडविण्यास सांगितले आहे. ज्ञानाला, विद्येला, शीलाची जोड हवी. जर विद्वानांची संख्या वाढली; पण त्यातील शीलवान कमीच असतील तर त्याचा उपयोग नाही. कारण असा समाज अधोगतीला जातो.

त्याचबरोबर ज्ञानाला करुणेची जोड हवी. ज्ञानाची महती सांगताना आंबेडकर म्हणतात – "ज्ञान हे दुधारी शस्त्राप्रमाणे आहे, किंवा ते एखाद्या धारदार तलवारीसारखे आहे. ह्या तरवारीच्या जोरावर आपण एखाद्याचे संरक्षण करू शकतो, किंवा याच तलवारीने दुसऱ्याचा शिरच्छेद करू शकतो. त्यामुळे करुणेवाचून असलेले ज्ञान हेही मानवी जीवनातील एक दु:खंतिका ठरण्याचा संभव असतो. " ज्ञानाला करुणेची आणि करुणेला ज्ञानाची जोड असणे आवश्यक आहे.

विद्येचे महत्त्व स्पष्ट करताना आंबेडकर म्हणतात, "विद्या ही अन्नासारखी असून सर्व मनुष्यास आवश्यक आहे. प्रत्येकाला तिचा लाभ झाला पाहिजे. उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाअभावी तो निर्बुद्ध राहिल्यास दुसऱ्याचा गुलाम होतो. "

आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांचा अभ्यास केला. तर अस्पृश्य हे आर्थिकतेमुळे दुर्बल झालेले नसून त्यांचामध्ये असलेल्या न्यूनगंडाच्या भावनेमुळे त्यामुळे त्यांची प्रगती खुंटलेली आहे. आंबेडकर म्हणतात, "खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्यांचे गुलाम व्हावे लागते, तो न्यूनगंड त्यांच्यापासून दूर करून, चालू समाजपद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले, त्याचे त्यांच्या स्वत:च्या व राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे, याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. शिक्षणाखेरीज, शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सामाजिक दुखण्यावर आमच्या मते हेच औषध होय. "

अशा प्रकारे आंबेडकरांनी शिक्षण हे समाजातील विषमता, दारिद्र्य ह्यावर औषध आहे हे सांगितले आहे. शिक्षणाच्या सहाय्याने व्यक्ती ज्ञानी बनते. तिचा स्वाभिमान जागृत होतो. स्व-अस्तित्वाची जाणीव त्यांना करून देते.

शिक्षणामुळे व्यक्तीला आपण स्वतंत्र आहोत, आपले अस्तित्व स्वतंत्र आहे याची जाणीव होते व ते स्वातंत्र्य रक्षण करण्याची प्रेरणा त्याला शिक्षणातूनच मिळत असते.

अस्पृश्यांबद्दल बोलताना आंबेडकर म्हणतात – "प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न हा अस्पृश्यवर्गाचा अगदी जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. आमच्याइतकी शिक्षणाची जरुरी दुसऱ्या कोणास आहे असे आम्हास वाटत नाही."

गरीब लोक जे केवळ हातावर पोट भरणारे असतात, ते मुलांचा केवळ सांभाळ करू शकतात. त्यांचे पोट भरू शकतात. पण त्यांच्या मुलांना शाळेत पाठवत नाहीत; कारण मुले जी कमावून आणतात त्यावर ते उपजीविका करतात. पण जर मुले शाळेत जाऊ लागले तर उत्पन्नाचा मार्ग बंद होईल आणि शाळेत गेले तर तिथे येणारा खर्च तो वेगळाच. आणि हे त्यांना परवडणारे नसते. त्यामुळे ह्या लोकांत शिक्षणाचा अभाव दिसतो. आणि त्यामुळे इतर उच्चवर्णीय अशा लोकांना त्रास देतात व ते अन्याय सहन करतात. आंबेडकर म्हणतात, 'शिक्षणाने समाजात स्वाभिमान सोडून साधलेली उन्नती कुचकामी स्वरूपाची आहे" त्यासाठी त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. म. फुले यांनी १८८१ साली हंटर कमिशनपुढे साक्ष देताना सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा ह्या देशामध्ये प्रथमच पुरस्कार केला होता. म. फुलेंचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने आंबेडकरांनी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद राज्यघटनेत केली.

आंबेडकरांनी अस्पृश्य व आदिवासींना प्राथमिक शिक्षण मोफत केले. त्याचबरोबर त्यांना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे म्हणून दरमहा शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे, अशी तरतूद भारताच्या राज्यघटनेत केली. आज त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत.

शिक्षणाचे राष्ट्रीय धोरणांबाबत आंबेडकर सांगतात- "सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न हा तुटक तुटक रीतीने सोडविण्याचा प्रश्न नव्हे, तर तो एकसूत्री धोरणानेच सोडविण्यात आला पाहिजे. कारण शिक्षण ही निरंतर चालणारी व प्रदीर्घ प्रक्रिया आहे. सर्व प्रांतिक सरकारनेच सर्व जबाबदारी आपल्या अंगावर घेणे आवश्यक आहे. "

शिक्षण ही बाब स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवू नये असे आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या मते तेथे निवडून येणारे पुष्कळसे सदस्य शिक्षणांवर ताबा ठेवण्यास अपात्र ठरतात. काही कळत नसताना उगीचच त्यांनी ढवळाढवळ करू नये.

राष्ट्रीय दृष्टीने शिक्षणाचे धोरण ठरविले जावे. प्रांतिक सरकारांना शिक्षणाच्या संदर्भात स्वायत्तता असावी. एकसूत्रीपणा शिक्षणात असला पाहिजे, असे शैक्षणिक धोरणाचे सूत्र आंबेडकर सांगतात.

शिक्षण देणारा शिक्षक — त्याबद्दल आंबेडकर म्हणतात, " शिक्षकवर्ग हा राष्ट्राचा सारथीवर्ग आहे. कारण त्याच्या हातात शिक्षणाच्या दोऱ्या असतात. यास्तव शिक्षक कोण व कसा असावा ह्या सारख्या समान हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न नाही "

तसेच शिक्षक व विद्यार्थी यांच्यात स्नेहाचे, आपुलकीचे संबंध असावयास हवे. शिक्षकांनी आपले उद्दिष्ट सुसंस्कृत विद्यार्थी निर्माण करावयाचे हे ठरविले पाहिजे. शिक्षणाने विद्यार्थ्यांत आत्मविश्वास जागविला पाहीजे, असे ते म्हणत.

शाळेबद्दलची त्यांची संकल्पना— " शाळेमध्ये नुसत्या बाराखड्या शिकवायच्या असत्या तर ती गोष्ट निराळी. पण शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करून त्यांना समाज हितास योग्य असे वळण लावायचे असते. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत. अर्थात ह्या कारखान्यांचा फोरमन जितका शहाणा, तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे."

स्त्री-पुरुष सहशिक्षणाचा आंबेडकारांनी पुरस्कार केला. ते म्हणतात, " स्त्रियांचा विनय आणि पुरुषांची नीतिमत्ता शाबूत राखण्यासाठी स्त्रियांचे व पुरुषांचे शिक्षण एकत्र होऊ नये असे पुराणमतवादी लोक सांगतात. स्त्री व पुरुष वेगवेगळे ठेवून नीतिमत्तेचा परिपोष करण्याचा हा प्रकार आम्हास तरी मोठा विलक्षण दिसतो ! स्त्रियांचे शिक्षण पुरुषांच्या बरोबर एकत्र असले पाहिजे. "

अशा प्रकारे आंबेडकरांनी शिक्षण क्षेत्राविषयी केवळ विचारच मांडले नाहीत, तर आपल्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची बैठक देण्याचा प्रयत्न केला. त्या दृष्टीने त्यांनी मुंबई येथे १९४५ साली सिद्धार्थ कॉलेज काढून आपल्या शैक्षणिक कार्याला आरंभ केला. त्यानंतर १९५० साली औरंगाबाद येथे मिलिंद विद्यालय काढून शैक्षणिक कार्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला.

आंबेडकरांनी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद भारतीय राज्यघटनेत केलेली आहे. पण आज समाजात आपण पाहतो, श्रीमंत लोक खाजगी इंग्रजी शाळांत मुलांना पाठवतात. आणि काही नगरपालिकांच्या, जिल्हा परिषदांच्या, शाळेत पाठवतात आणि काही गरीब मुले, ६ ते ११ ह्या वयोगटातील ही मुले रस्त्यावर फिरताना आढळतात. म्हणजे आजही सामाजिक विषमता आढळते. आणि आपण डॉ. बाबासाहेबांच्या विचारांपासून दूर जात आहोत की काय असे वाटू लागते. ४० वर्षांनंतरही आंबेडकरांचे हे स्वप्न साकार करू शकलो नाही.

डॉ. आंबेडकरांची विचारसरणी ही व्यापक होती. त्यांचे शिक्षणविषयक विचारही त्यांच्या व्यापक अशा जीवनाच्या तत्त्वज्ञानाचा एक भाग होता. आंबेडकरांचे हे विचार अतिशय मूलगामी स्वरूपाचे आहेत. एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे वर्षानुवर्षे ते आपल्याला मार्गदर्शक ठरणारे आहेत.

# शिक्षण क्षेत्रातील प्रदूषण

**मोरे संजीव सिताराम**
एम. कॉम. भाग - २

**शिक्षणाची उद्दिष्ट्ये :**

शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट्य म्हणजे, विद्यार्थ्यांना विविध ज्ञान देऊन त्या विषयाबद्दल त्यांच्या मनात आवड निर्माण करणे व विद्यार्थ्यांच्यामध्ये ज्ञान मिळविण्याचे सामर्थ्य निर्माण करणे हे आहे. शिक्षणाचे दुसरे उद्दिष्ट सत्य, शिव व सुंदर यांचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर घडवून त्यांचे चारित्र्य घडविणे हे आहे. शिक्षणाचे तिसरे उद्दिष्ट म्हणजे, विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनात चांगल्या रीतीने जगता यावे ह्यासाठी त्याला काही कौशल्ये प्राप्त करून देणे व जीवन-कलहाला निर्भयपणे तोंड देण्याचे मानसिक, बौद्धिक व शारीरिक सामर्थ्य त्याला प्राप्त करून देणे हे आहे.

ह्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी विद्यार्थ्यांवर प्रेम करणारा, त्यांना ज्ञानाची गोडी लावावी यासाठी कुशलतेने शिकविणारा, त्यांना ज्ञानाच्या क्षेत्रात स्वाश्रयी व जीवनात स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांच्या मनावर सुसंस्कार करणारा असा शिक्षकाचा वर्ग असणे आवश्यक आहे. असे शिक्षक, त्यांना प्रतिसाद देणारे विद्यार्थी व ज्ञानोपासनेस पोषक असे वातावरण निर्माण करणाऱ्या शिक्षण संस्था असल्या तरच शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य टिकू शकेल. अन्यथा शिक्षण क्षेत्रात सर्वत्र प्रदूषणच मोठ्या प्रमाणावर निर्माण होईल.

पूर्वीच्या काळी देखील विद्याज्ञानात प्रदूषण होते. ह्यात प्रामुख्याने सामाजिक बंधने होती. मात्र त्याचा परिणाम धनुर्धारि एकलव्य व सूर्यपुत्र कर्ण ह्यांना आपल्या आयुष्याला आहुती द्यावी लागली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचा प्रचार खेड्यापाड्यात बहुजन समाजात केला. त्यावेळी त्यांनी विनाअनुदान तत्त्वांवरच शिक्षण संस्था स्थापन केल्या, चालविल्या व माणसे घडविली. कर्मवीर अण्णांनी विद्यार्थ्यांकडून फी सुद्धा न घेता, उलट त्यांच्या राहण्या-जेवणाची सोय केली. सर्वसामान्यपणे लोकांनी अण्णांना त्यांच्या शिक्षण प्रसारात मदत केली. विद्यार्थ्यांनीही श्रम करून स्वावलंबी शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रात ही जी शिक्षण प्रसाराची श्रेष्ठ परंपरा साने गुरुजी व अण्णांपर्यंत चालत आली होती, ती खंडित करण्याचे काम गेल्या दहा वर्षांत सुरू झाले आहे. त्याची खालील कारणे आपणांस सांगता येतील :

**(१) संस्था :**

आताचे तथाकथित शिक्षण-महर्षि, झटपट शिक्षण-तज्ज्ञ व शिक्षण संचालक संस्था काढतात. त्यांचा हेतू शिक्षण विकास हा नसून केवळ पैसा मिळविणे हा असतो. विना-अनुदान तत्त्वांवर निघालेल्या कला, वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची पिळवणूक केली जाते. अशी कित्येक महाविद्यालये आजतागायत महाराष्ट्रात आहेत. विद्यार्थी डोनेशन देत नाहीत, त्यामुळे प्राध्यापकांना पगार नाही. फी ची जी रक्कम येईल, यातून मोठा हिस्सा संस्थाचालक स्वत:साठी काढून घेतात व उरलेल्या हिश्श्यात पगार वाटून घ्या असे सांगणारेही आज खेड्यापाड्यांत आहेत. कधीतरी संस्था अनुदान-पात्र होईल तेव्हा पूर्ण पगार मिळेल या आशेवर प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वर्षानुवर्षे काम करताना आजसुद्धा आढळतात.

( २) शासन :

शासनाजवळ पैसे थोडे आहेत. शिक्षणासाठी तर फारच थोडे आहेत; कारण त्यांच्या अन्य उपक्रमांसाठी भरपूर पैसा खर्च होत आहे. पैसा नाही म्हणून शिक्षणाचे सार्वत्रिकरण नाही. पैसे थोडे आहेत म्हणून ते आम्ही उत्तम मुलांना उत्तम शिक्षण देण्यासाठी खर्च करणार आहोत अशी शासनाची भूमिका आहे. सगळ्यांना चांगले शिक्षण-देण्याइतके पैसे नाहीत. मग उत्तम नसलेल्या मुलांनी शिक्षण कसे घ्यावे ?. त्यांच्या भविष्याचे काय ? त्यांनी विनाअनुदान शिक्षण संस्थात जावे ! तेथे डोनेशन देण्यासाठी पैसे नसतील तर त्यांनी काय जमीन, घर, दागिने, गुरे-ढोरे विकावी ! ज्यांना हे सर्व नाही, त्यांनी काय करावे ! त्यांनी उच्च शिक्षणाची अपेक्षा धरू नये !

चांगली वस्तू महाग असणारच हा बाजारचा नियम, त्यांनी शिक्षण-क्षेत्रात आणला आहे. शिक्षण प्रथम महाग करावयाचे व चांगले शिक्षण अतिमहाग पडणारच असे समर्थन करावयाचे अशी शासनाची नीती आहे. संस्था-चालक, शासन व धनिक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी पैसा हा निष्कर्ष मान्य करून शिक्षणात फार घातक प्रथा पाडण्यास प्रारंभ केला आहे. ह्या प्रदूषणाला वेळीच आळा घातला गेला नाही तर शिक्षण केवळ श्रीमंतासाठीच राखीव असे होईल.

दुसरा प्रश्न म्हणजे शिक्षकांच्या व्यवसायात पोटार्थी किती व ध्येय्यार्थी किती याची तपासणी करायला हवी. पोटार्थींना उत्कृष्ट पगार व बोनस दिल्यास ते ध्येयार्थी बनतील अशी आशा सरकार बाळगते असे दिसते. मात्र ही आशा फलद्रूप होईल असे खात्रीने म्हणता येत नाही. शिक्षण-क्षेत्रात जी माणसे फिरतात, त्यांची कागदोपत्रीची गुणवत्ता तपासली जाते. पण त्यांच्या अभिवृद्धीची तपासणी करूनच त्या क्षेत्रात प्रवेश दिला जातो, असे म्हणता येत नाही. अशी वृत्ती असणाऱ्यांना ज्ञान व कौशल्य देता येईल, पण ज्ञान व कौशल्य असणारांत अभिवृद्धी निर्माण करता येईलच असे सांगता येत नाही.

( ३) शिक्षक / प्राध्यापक :

गुरुची महती ही अगाध आहे. त्यामुळेच त्यांच्याबाबतीत गुरु ब्रम्हः गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः असे म्हणतात. कारण समाजास आवश्यक उत्कृष्ट विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षकच करतात. पूर्वीच्या काळी ही भूमिका खऱ्या अर्थाने शिक्षक/गुरुंनीच पार पाडली होती. नवा माणूस व नवा समाज घडविणे अगत्याचे आहे. त्या खेरीज तरणोपाय नाही हे द्रोणाचार्य, सानेगुरुजी, अण्णांनी व इतर थोर गुरुजनांनी पूर्वीच ओळखले होते. आपल्या भोवती विद्यार्थ्यांना आकृष्ट करून त्यांच्या आयुष्यात व व्यक्तित्वाला वेगळे वळण देण्याची संधी त्यांना जशी उपलब्ध झाली, तशी इतरांना झाली नाही.

मात्र आज ज्या अध्यापकांना आपल्या विषयांची नीट, सखोल व अद्यावत माहिती नसते आणि ती मिळविण्याचा जे प्रयत्न करत नाहीत ते अध्यापक अर्धवट ज्ञानाने मुलांच्या मनात गोंधळ निर्माण करतात. त्याचबरोबर एखादा विषय कोणत्या पद्धतीने शिकवावा, तो विषय सोपा करून कसा शिकवावा, विद्यार्थांच्या मनात ज्ञानाबद्दल आवड निर्माण कशी करावी हे ज्यांना जमत नाही, असे शिक्षक हे शिक्षण क्षेत्रात प्रदूषण निर्माण करणारे घटक असतात.

विद्यार्थ्यांना परीक्षेत मदत व्हावी ह्या दृष्टीने काही टिपणे (नोट्स) देणे अनेकदा आवश्यक असते. परंतु काही शिक्षक अशी छोटी-छोटी टिपणे मधून मधून देण्याऐवजी विद्यार्थ्यांना विषय समजून न सांगता, त्यांच्याशी त्या बाबतीत चर्चा न करताच, फक्त नोट्स (टिपण) देतात. इतकेच नव्हे तर काही काही ठिकाणी मी उतरून दिलेल्या नोट्स वाचल्यावर पुस्तक वाचण्याची जरुरी नाही असे प्रौढीने सांगतात. हे एका अर्थाने प्रदूषणच फैलावत आहेत असे आपणास वाटत नाही का ? विद्यार्थ्याला बारा-तेरा वर्षापासून स्वतः ज्ञान कसे मिळवावे हे हळूहळू समजू लागले पाहिजे. विद्यार्थी जसजसा मोठा होत जातो, तसतशी स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची सवय

लागली पाहिजे. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयात जाऊन वर्गातील अध्यापनास पूरक असलेले वाचन कसे करावे, संदर्भ कसे शोधावेत, स्वत: टिपणे कशी काढावीत, अध्यापनास पूरक असलेले अवांतर वाचन व माहिती कशी मिळवावी — हे सर्व समजून ते करता आले पाहिजे. अशा तऱ्हेने विद्यार्थ्यांना ज्ञानाची क्षितिजे शोधण्याचा छंद लावणारे प्राध्यापक व शिक्षक हेच गुरू ह्या संज्ञेस पात्र आहेत. अशा प्राध्यापकांची संख्या वाढत गेली तरच शिक्षण क्षेत्रातील प्रदूषण कमी होऊ शकेल.

( ४) विद्यार्थी :

विद्यार्थ्यांचे प्रथम कर्तव्य म्हणजे ज्ञानार्जन करण्याचे, परंतु आजचा विद्यार्थी स्वत:ला मुक्त पक्षी (फ्री बर्ड) समजतो. जेव्हा मनात येईल तेव्हा वर्गात तासाला बसायचे. एरव्ही महाविद्यालयाच्या बागेत किंवा कँटीनमध्ये मजा मारताना दिसतात. आज काय मूड नाही म्हणून संपूर्ण वर्गाला कॉमन ऑफ (Common Off ) घेण्यास सांगणारी मूठभर विद्यार्थीदेखील आहेत. हे आजचे आदर्श विद्यार्थी ! एवढेच नव्हे तर वर्षभर स्वत:चे ओळखपत्र (IDENTY CARD ) नसलेले देखील विद्यार्थी आज आहेत. शिवाय शिक्षण-क्षेत्रात सध्या 'कॉपी 'मुळे प्रचंड प्रदूषण निर्माण झाले आहे. काही विद्यार्थ्यांनी वर्षभर प्रामाणिकपणे तासाला बसून अभ्यास करायचा व काही गुंड विद्यार्थ्यांनी परीक्षेत कॉपी करून अधिक मार्कस् मिळवायचे ही परिस्थिती घृणास्पद आहे. दुर्दैवाने कॉपी ही आता संघटितरित्या केली जाते.

थोडक्यात, आज ज्ञानाच्या क्षेत्रात क्वचितच शिक्षक/प्राध्यापकांनी अव्वल दर्जाचा पराक्रम गाजवला आहे, ही बाब लक्षणीय आहे. त्यांच्या स्वाध्यायाकडे नजर टाकली तर असे दिसेल की, त्याची खोली, रुंदी व उंची फार सीमित आहे. कारण तो बहुंतांशी पढिक, पुस्तकी चौकटीत बंदिस्त राहतो. त्यांच्या विद्यार्थ्यांचे दैनंदिन जीवन, त्यातील विसंवादाच्या व स्फोटकतेच्या जागा, समस्या आणि विषयाला धरून वर्गातले शिकवणे यांचा संबंध जुळत नाही. बौद्धिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी ते जे चिकित्सक मापदंड वा कसोट्या वापरतात, त्या पुरेशा काटेकोर नसतात. या ठळक उणिवा व दुबळेपणा दूर करण्यासाठी समविचारी व समन्वयशील प्राध्यापकांनी सहकार्य केले, त्यामधून जर एक क्रियाशील बिरादारी अस्तित्वात आली, तर प्रदूषण आपोआप संपेल. मात्र प्रदूषण दूर करण्याची जबाबदारी केवळ शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींचीच नाही; तर राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील धुरिणांनीच ह्या भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन केले तरच शिक्षण क्षेत्रातील प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

## आम्ही सगळे अंधारात

आम्ही सगळे अंधारात भटकतोय
स्वत:चाच शोध घेत
अंधारान आम्हाला कैद केलंय
आमच्या जवळ नाही कंदील
जीवन असत्वानं तिडबिडलेलं
सगळं काही खोट आहे
अर्थहीन जीवन जगतोय आम्ही
सगळ्याच्यांच हृदयावर आहेत डाग
मनामध्ये आसू आणि चेहऱ्यावर हसू घेऊन
निर्लजपणे वावरतोय आम्ही
युद्धभूमीतील सैनिकांसारखे
हातात तुटकी तलवार घेऊन
विजयाची स्वप्नं पहात
आम्ही सगळे अंधारात......

**विजय पाटील**
तृतीय वर्ष, कला शाखा

# उद्योजक : एक विश्लेषण

**जितेंद्र रामदास ओव्हाळ**
तृतीय वर्ष, वाणिज्य - क

उद्योजक म्हणजे काय हे पाहात असताना अनेक तज्ज्ञांच्या व्याख्या ह्या संदर्भात पाहायला मिळतात. शुम्पीटर ( Schumpeter ) ह्या तज्ज्ञांच्या मते उद्योजक हा नवनिर्माता असतो. तो व्यवसायात काहीतरी नव-निर्मिती करीत असतो. पुढे तो असेही म्हणतो की उद्योजक हा बदलाचा एजन्ट आहे. तो भौतिक, नैसर्गिक आणि मानवी साधनसंपत्तीचे उत्पादन क्षमतेत रूपांतर करतो. शुम्पीटरला अभिप्रेत असलेल्या उद्योजकाचे नवनिर्मिती हे मुख्य कार्य आहे.

उद्योजक हा नवनिर्माता असतो म्हणून तो नवे उत्पादन बाजारात आणतो. अधिक ग्राहकवर्ग निर्माण करतो. वस्तू नव्या दर्जाच्या तयार करतो. उत्पादनाची नवी पद्धती सुरू करतो. नवी बाजारपेठ निर्माण करतो. उद्योग संस्थांचे संघटन नव्या प्रकारे करतो, ज्यायोगे परिणामकारकपणे पुढे जाऊ शकतो.

उद्योजकांच्या अंगी कोणते गुण असतात हे पाहाताना सर्वात प्रथम त्याच्या अंगी नवनिर्मिती करणारा नवनिर्माणशीलता, धोका पत्करण्याची तयारी, आत्मविश्वास, संधी शोधण्याची कला, अनुकरणशीलता, तांत्रिक ज्ञान, बदल स्वीकारणे, संघटन कौशल्य, नेतृत्व गुण, भूतकाळापासून शिकण्याची वृत्ती, नियमितपणा, प्रभावी व्यक्तिमत्त्व, अडचणींवर मात करणे, दूरदृष्टी, कष्ट करण्याची तयारी, जिद्द, हे व असे असंख्य गुण उद्योजकांत येतात. यशस्वी उद्योजक होण्यास ह्या गुणांची आवश्यकता असते. काही गुण उद्योजकांत जन्मजात असतात, तर काही गुण अनुभवाने, प्रयत्नपूर्वक आत्मसात करता येतात.

काहींचे असे म्हणणे असते की, उद्योजक हा जन्मावा लागतो. प्रशिक्षण देऊन किंवा परिश्रमाने गुण वाढवता येत नाहीत. हे मात्र खरे नाही. ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती पाण्यात पडल्याशिवाय पोहू शकत नाही किंवा त्यास पोहता येत नाही, त्याचप्रमाणे उद्योजकाचे आहे. उद्योगात पडल्याशिवय त्यास यशस्वी होता येत नाही.

उद्योजक हा मनाशी एक उद्दिष्ट ठेवून ते साध्य करण्यासाठी आपल्या अंगी असलेल्या गुणांच्या आधारे प्रयत्न करीत असतो. त्याच्याकडे यश मिळविण्याची व ते साध्य करण्याची आच, (Urge for success) जबरदस्त जिद्द असते. व त्या जोरावर प्रतिकूलतेवर मात करून व्यवसायात यश मिळवित असतो, संघर्ष करीत असतो व त्यातून अनुभवसंपन्न् होत असतो.

उद्योजक हा काही कुणी असामान्य गुण असलेला गुणांचा पुतळा, वगैरे असामान्य व्यक्ती नसते; तर ते आपल्यामधीलच एक व्यक्ती असते; पण त्याच्यामध्ये असलेले काही असामान्य, विशेष गुण जे इतरांमध्ये दिसत नाहीत, त्यामुळे तो उद्योजक होतो.

उद्योजक ह्या संकल्पनेचा विचार करीत असताना उद्योजकाचे अनेक प्रकार त्याच्या कार्यानुसार, वर्तनानुसार पडलेले दिसून येतात. ते म्हणजे नवनिर्मिता, अनुकरणशील, शिक्षित, अशिक्षित, शहरी, ग्रामीण, परदेशीय, भारतीय, पुरुष, उद्योजक, स्त्री उद्योजक वगैरे.

देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये उद्योजकाचे स्थान महत्त्वाचे आहे. उद्योजक हा नवनिर्मिती करीत असतो. नवे

उत्पादन निर्माण करीत असतो. त्याद्वारे तो अनेकांना रोजगार उपलब्ध करीत असतो. लोकांचे उत्पन्न वाढवत, तो नवे उत्पादन बाजारात आणतो. नवी बाजारपेठ वस्तूसाठी निर्माण करतो. रोजगार उपलब्ध झाल्याने लोकांचे उत्पन्न वाढते, तेव्हा ते वस्तूची मागणी करतात. त्यामुळे पुरवठा वाढतो. ह्यामुळे देशाचे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासात उद्योजक मोलाची भर टाकतात. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर अर्थ- व्यवस्थेच्या चाकांना गती देण्याचे काम उद्योजक करीत असतो. ह्यावरून उद्योजकांचे देशाच्या अर्थव्यवस्थेमधील महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. त्याचबरोबर उद्योजक हा देशाचा प्रादेशिक समतोल साधण्याचा प्रयत्न करतो. आयात कमी करून आयातीस पर्याय निर्माण करतो. त्याचबरोबर निर्यात वाढवून परकीय चलनसाठा वाढविण्यास त्याची मदत होत असते.

ह्या विविध कारणांमुळे सरकार देशात उद्योजकांनी उद्योग सुरू करावेत, नवीन उद्योजक देशात तयार व्हावेत म्हणून प्रयत्न करीत आहे. त्यासाठी उद्योजकांना विविध सवलती देऊ केल्या जात आहेत. उद्योजकता विषयाकडे सरकार नव्या दृष्टिकोणातून पाहात आहे.

उद्योजकता किंवा उद्योजक हे शब्द भारताला नवीन नाहीत. इतिहासात डोकावून पाहिले असता आपणाला हे समजून येते. प्राचीन काळात भारत म्हणजे पूर्वीची छोटी छोटी अनेक राज्ये, ही सर्व गोष्टींनी स्वयंपूर्ण होती. उद्योगक्षेत्रात आघाडीवर होती. मलमलीचे कापड, गालिचे, हे जगप्रसिद्ध होते. त्यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध होती. शेती-क्षेत्राबरोबरच औद्योगिक क्षेत्राचाही विकास झालेला होता. जुन्या काळातील काही वर्णनांवरून ह्या गोष्टींना आधार मिळतो. परंतु पुढे १८ व्या व १९ व्या शतकात ब्रिटिश भारतात आले तेच मुळात कावेबाज व्यापारी म्हणून. त्यांचे प्रगत तंत्रज्ञान, भांडवल, धाडसी प्रवृत्ती, व्यवस्थापन ह्या सर्व गोष्टीत ते भारतीयांच्या पुढे होते. तसेच भारतीयांचे काही व्यवसायही त्यांनी दडपून टाकले. तसेच जे काही होते ते ब्रिटिशांच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेल्या वस्तूंशी स्पर्धा करू शकत नव्हते. त्यामुळे भारतीय उद्योजक मागे पडले. पुढे ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणांचा नकळत भारतीय उद्योगाला फायदा झाला. शिक्षण पद्धतीमुळे देशाची सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती बदलली. इंग्रजांनी भारतात काही उद्योग सुरू केले. काही उद्योगात इंग्रजांना रस नव्हता. ते उद्योग इंग्रजांनी सुरू केले नाहीत. त्यात भारतीयांनी पुढे पाऊल टाकले व उद्योग सुरू केले. त्यात टाटा, बिर्ला, यांसारख्या उद्योजकांनी प्रतिकूल परिस्थिती असतानाही २० व्या शतकाच्या सुरुवातीस उद्योग सुरू केले. त्याच सुमारास पहिले व दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्या काळात इंग्रजांचे मित्र म्हणून भारतीय वस्तूंचा पुरवठा त्यांना होत होता. त्यामुळे उद्योगांना चालना मिळाली. स्वातंत्र्यानंतर हे उद्योजक पुढे गेलेच. शिवाय अनेक उद्योजक उदयास आले. परंतु आजमितीस उद्योजकांची संख्या इतर प्रगत देशांच्या तुलनेने कमी आहे. शिवाय जे उद्योजक आहेत, त्यातील यशस्वी उद्योजक हे बोटावर मोजण्याइतपतच आहेत.

परंतु देशाचा आर्थिक विकास साध्य करीत असताना उद्योजकांचे महत्त्व जाणून, सरकार नवीन उद्योजक निर्माण व्हावेत, त्यांना प्रोत्साहान मिळावे म्हणून अनेक योजना, उपक्रम राबवित आहे. तसेच विविध सवलती देत आहे.

उद्योजकांना व्यवसाय सुरू करीत असताना भांडवल मोठ्या प्रमाणावर लागते. ही गरज ओळखून सरकारने कोकण, प. महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ ही विभागीय विकास महामंडळे, तसेच महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (MSFC), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) वगैरे. व ह्याद्वारे विविध व्यवसायांसाठी कर्ज-पुरवठ्याच्या सोयी, विविध व्याज-दरावर केल्या जात असतात.

अनेक सुशिक्षित बेकार नव्याने व्यवसाय, उद्योग

सुरू करीत असतात. व्यवसायासाठी त्यांना भांडवल लागते. बँकेकडे गेल्यावर बँक मार्जिन मनीची मागणी करते. मार्जिन मनी म्हणजे व्यवसाय प्रकल्पाच्या २५ टक्के रक्कम त्या व्यक्तीची असली पाहिजे. बँक ७५ टक्के रक्कम देईल त्यावर तारण पाहिजे. परंतु सुशिक्षित बेकार तरुण हे बहुतेक गरीब कुटुंबातून आलेले असतात. त्यांच्याजवळ उद्योजकाचे गुण असतात, हुशारी असते. तेव्हा सरकार अशा लोकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे सुरुवातीचे भांडवल (SEED CAPITAL) पुरवते. हे एकूण प्रकल्पाच्या भांडवलांपैकी काही टक्के दिले जाते. काही आपण स्वत: भरायचे. दिल्यानंतर ७५ टक्के भांडवल जे प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के असते, त्यासाठी बँकेकडे जाता येते. सरकार धोका पत्करून अशा लोकांना बीज भांडवल पुरवते व बँकेच्या कर्जाचीही हमी घेते. कर्ज परत करते वेळी बँकेचे कर्ज परत केल्यानंतर मग बीज भांडवलाचे कर्ज परत करता येते. त्यावर ४ टक्के हा व्याजदर असतो. बीज भांडवल दिल्यापासून म्हणजेच उद्योग सुरू केल्यापासून सहा महिन्यापर्यंत उद्योजकाला शंभर रु. दरमहा स्टायपेन्ड दिले जाते. 'बीज भांडवल योजना' ही विविध विभागीय विकास महामंडळाद्वामार्फत राबविली जाते. ह्याचप्रकारे उद्योजकतेस प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजना या वित्तीय संस्थांमार्फत राबविल्या जातात.

उद्योगांना लागणारे तांत्रिक सहाय्य, सल्ला, मार्गदर्शन तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे, उत्पादन निवड वगैरेसाठी मदतीची, मार्गदर्शनाची गरज असते. ह्यासाठी सरकारने सल्ला-संस्थांची निर्मिती केली आहे. उद्योजकांना आपल्या उद्योगात येणाऱ्या अडचणी सोडविण्यास मदत होऊ शकते. ह्या संस्था म्हणजे महाराष्ट्र इंडस्ट्रियल अँन्ड टेक्निकल कन्सलटन्सी ऑर्गनायझेशन (MITCON) तसेच महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन लिमिटेड ( Meltron ) , महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (M C E D ) , इंडियन इन्व्हेस्टमेंट सेन्टर, स्मॉल इंडस्ट्रिज एक्सटेन्शन ट्रेनिंग इन्सिट्यूट ( SIET) वगैरे.

ह्या सर्व समाधानकारक बाबी असल्या तरी उद्योगात अनेक प्रकारच्या अडचणी येत असतात. अशा समस्याविना उद्योग होऊच शकत नाही. त्या समस्या हा उद्योग कोणता निवडावा यापासून व्यवसाय उद्योग सुरू करताना लागणाऱ्या परवान्यापर्यंत अनेक समस्यांना तोड द्यावे लागते. काही उद्योजक - उद्योजक म्हणण्याऐवजी संभाव्य उद्योजक म्हणू. तेव्हा हे संभाव्य उद्योजक उद्योग सुरू होण्याच्या अवस्थेतील समस्यांनीच गर्भगळीत होतात. आणि उद्योगाचा विचार सोडून देतात. जे ह्या समस्या सोडवतात. ते उद्योग सुरू करतात. त्यातही उत्पादनासंबंधी, बाजारपेठ-संबंधी अनेक समस्या निर्माण होतात. तेव्हा ह्या सर्व समस्या शांतपणे सोडविल्यानंतर तो उद्योजक हा एक यशस्वी उद्योजक म्हणून गणला जाऊ शकतो. तेव्हा जे समस्यांना समर्थपणे तोंड देऊ शकतात, तेच उद्योजक यशस्वी होतात.

काही यशस्वी उद्योजकांची चरित्रे, आपण पाहिली तर त्यात सहजपणे त्यांचे परिश्रम, त्यांची जिद्द, उत्साह दिसून येतो. ह्या उद्योजकांत नवलमल फिरोदिया, शंतनुराव किर्लोस्कर, आबासाहेब गरवारे, पुण्याचेच डी. एस. कुलकर्णी ह्या विविध कौटुंबिक परिस्थितीत, वेगवेगळ्या पार्श्वभूमी असलेल्या उद्योजकांत कष्ट करण्याची जिद्द होती व आहे. संक्टांशी सामना करण्याचे, ते अनुभवातून शिकले. काही सतत संघर्ष करत राहिले, तेव्हा कुठे यश मिळवू शकले. आपण चित्रपटात वगैरे उद्योजक, मोठी माणसे चैन करताना, पैसे खर्च करताना पाहतो; पण ते कष्ट करीत असताना पाहत नाही. ते कष्ट करत असताना इतक्या तन्मयतेने करत असतात की दिवस- रात्रीचेही त्यांना भान राहत नाही. त्यांनी केलेली मेहनत ह्यामुळेच ते यशाच्या शिखरावर पोहोचतात.

भारतातील उद्योजक आणि परदेशातील उद्योजक ह्या मध्येही खूपच फरक आहे. भारतीय उद्योजक हा परिस्थितीशी सामना करू शकत नाही. परिस्थितीशी तडजोड करू शकत नाही. तर इतर देशातील उद्योजक परिस्थितीशी सामना करतात. परिस्थितीशी वाटेल तेव्हा तडजोडी करतात. भारतीय उद्योजक जुन्या रुढी, परंपरा,



# मॉडर्न

१२-१३

# राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर : एक अनुभव

भंडारे रोहिदास

*राष्ट्रीय सेवा योजना : शिबीर वृतान्त*

दरवर्षी प्रमाणे १९९२ - ९३ ह्या वर्षी मॉडर्न महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी श्रमसंस्कार व व्यक्तिमत्त्व विकास शिबीर, मु. पो. मांडकी, ता. पुरंदर, जि. पुणे ह्या ठिकाणी १९ डिसेंबर १९९२ ते २८ डिसेंबर १९९२ या काळात संपन्न झाले.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविणे आणि त्यांच्यात सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेने जे वेगवेगळे कार्यक्रम, उपक्रम राबविले, त्यामध्ये श्रमदान, समूहजीवन, संस्कारपर व्याख्याने यांचा समावेश होता. ह्या व्याख्यानांतून विद्यार्थ्यांची मानसिक जडण- घडण होते. त्याच बरोबर त्यांच्या विचारशक्तीला चालना देऊन एक वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक व्याख्यानातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली.

१९ डिसेंबर १९९२ रोजी संध्याकाळी ७ वाजता सर्व शिबिरार्थींचे आगमन होऊन संध्याकाळी ७ वाजता मांडकी गावचे सरपंच श्री. नारायणराव किन्हाळे यांच्या अध्यक्षतेखाली पाटील मारुतराव जगताप यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. प्रत्येक दिवशीचा एक दिनक्रम ठरत असे. त्यानुसार गट पाडण्यात आले. एक व्यवस्थापन मंडळ करण्यात आले. साधारणत: दररोज सकाळी ८.३० ते ११.३० श्रमदान, त्यानंतर २.३० ते ५.३० व्याख्याने असा प्रत्येक दिवशी कार्यक्रम असे. दररोज सकाळी ७ वाजता प्रार्थनाही होत असे.

दि. २०-१२-९२ रोजी मॉडर्न महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. गोसावी सर यांचे ' भावी आयुष्याचे नियोजन व स्पर्धा परीक्षा ' ह्या विषयावर व्याख्यान झाले. त्यासाठी स्पर्धा परीक्षांना कसे तोंड देता येईल ह्या विषयावर मार्गदर्शन केले.

दि. २१-१२- ९२ रोजी प्रा. डॉ. गोरे अे. पी. ( संख्या शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ ) यांनी 'बकरीहून बोर्निओपर्यंत' ह्या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी महाभारतातील इंद्रप्रस्थ शहराची स्थापना कशी झाली, तसेच भारतातील वेद, मंत्र, पुराणातील काही पुरावे हे या देशात सापडतात. ते मवाळ विचारांच्या काही लोकांनी मेंढी किंवा बकरीवरून प्रवास करून तिकडे नेले असे पुराणात दाखले देण्यात आले आहेत असे त्यांनी आम्हाला व्याख्यानात सांगितले. त्याच दिवशी श्री. प्रसाद चांदेकर व श्री. गायकवाड ( मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, येरवडा ) व्यसनास सुरुवात कशी होते आणि त्या व्यसनापासून आम्ही कसे दूर झालो व आमच्यामुळे किती जण सुधारत आहेत हे त्यांनी त्यांच्या अनुभवकथनात सांगितले. 'व्यसनमुक्ती ह्या विषयावर श्री.वैद्य ( मुक्तांगण, येरवडा ) यांनी व्याख्यान दिले. त्यामध्ये प्रामुख्याने व्यसनापासून होणारे तोटे ग्रामस्थांना समजावून सांगितले. रात्री महाराष्ट्रातील धरणे ह्यावर श्री. पाटील यांचे व्याख्यान झाले.

दि. २२-१२- ९२ रोजी प्रौढ साक्षरतेवर मांडकी गावच्या हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक श्री. शिंदे यांनी व्याख्यान दिले. त्यांनी केलेल्या साक्षरतेच्या कामाचा आढावा दिला. 'जलसिंचन आणि सामाजिक बांधिलकी' ह्या विषयावर अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, सासवड, रा. से.

यो. कार्यक्रमाधिकारी श्री. प्रा. तळेकर यांनी व्याख्यानात देणाऱ्यांच्या शक्तीपेक्षा घेणाऱ्यांची शक्ती आज कमी पडत आहे, अशी खंत व्यक्त केली. त्यामुळे पाण्याचा साठा कमी होत आहे. संध्याकाळी ६.३० वाजता श्री. निकम संयोजक (रा.से. योजना, पुणे विद्यापीठ) यांनी शिबिरस्थळी भेट देऊन मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. श्रमातून संस्कार कसे घडतात .या विषयी माहिती सांगितली. रात्री ९-०० वाजता श्री. एम. डी. पावगी यांचा भावगीतांचा कार्यक्रम झाला. त्याला साथ दीपक उपाध्ये, बिपीन इनामदार यांनी दिली व स्नेहल पाठकने निवेदन केले.

दि. २३- १२- ९२ रोजी शिबिरार्थींनी ग्रामसंपर्क करून कुटुंबातील अडीअडचणी समजावून घेतल्या.

दि. २४- १२-९२ रोजी आमच्या महाविद्यालयाचे संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख व माजी प्राचार्य श्री. प. स. चिरपुटकर यांनी संतांचे सामाजिक कार्य ह्या विषयावर व्याख्यान दिले. आमच्या संस्थेचे सचीव प्रा. रायकर यांनी आपल्या व्याख्यानात मानव हा निसर्गाचे एक अपत्य आहे असे सांगितले.

दि. २५- १२- ९२ रोजी नाताळ मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. त्याचबरोबर सिनेकलावंत श्री. शरद तळवलकर यांची मुलाखत मॉडर्न महाविद्यालयाचे डॉ. वि. भा. देशपांडे यांनी घेतली. ते ह्या क्षेत्रात कसे उतरले, उतरल्यानंतर त्यांनी केलेली कार्ये, बालपण, कॉलेज जीवन ह्या विषयींचे अनुभव मुलाखतींमधून मिळाले. मा. प्राचार्य गंभीर सरांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या.

दि. २६- १२- ९२ ह्या दिवशी एक दिवसीय सहल जेजुरी, मोरगाव, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना व सोमया कारंजे या ठिकाणांना भेटी दिल्या.

श्रमदानामध्ये प्रामुख्याने शोषखड्डे, ग्रामसफाई, बांधबंधिस्ती, रस्तेदुरुस्ती, गवत काढणी, वृक्षारोपण असे श्रमदान केले. वीर या ठीकाणी 'लेप्रसी' विभागात जाऊन वृक्षारोपणासाठी खड्डे घेण्यात आले व वृक्षारोपणही केले. दि. २६-१२-९२ रोजी रात्री ९ वाजता मांडकी गावात सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यामध्ये प्रामुख्याने 'महाराष्ट्राची लोकधारा' नाटक, कोळी नृत्य, निरनिराळ्या गाण्यावरती बसविलेले नाच, तसेच गावातील मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शिबीरस्थळी शिबिरार्थींनी 'दारुबंदी' ह्या विषयावर सलग दोन वेळा पथनाट्य सादर केले. त्या पथनाट्याला गावातील ग्रामस्थांचा व त्याबरोबर स्त्रियांचा- मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. त्या ग्रामस्थांनी असे ठरविले की, व्यसनमुक्ती केंद्राची स्थापना या गावात लवकरच करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

दि. २७ डिसेंबर १९९२चा दिवस उजाडून वरती येत होता. तसे शिबिरार्थींच्या मनातील आनंदाचे वातावरण काहीसे अंधुक होत होते. तो दिवस निरोपसमारंभाचा होता. प्रा. शहा व प्रा. एम. ए. कुलकर्णी सरांचे व्याख्यान झाले. त्या व्याख्यानाचा खरोखर मुलांना उपयोग होणार आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व त्यांनी सांगितले. निरोपसमारंभाच्या अध्यक्षस्थानी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. वसंत काका जगताप हे होते. गावातील मंडळाच्या वतीने व ग्रामपंचायतीच्या वतीने आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. दीक्षित, प्रा. साळुंके, प्रा. वनकळस व प्रा. आल्हाट यांचे सत्कार करण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थी प्रतिनिधि म्हणून रोहिदास भंडारे व विद्यार्थिनी प्रतिनीधी म्हणून स्नेहल पाठक यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये आमच्या शिबिरार्थींसंबंधी ज्या व्यक्तींनी सहकार्य केले, त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये जगतापसाहेब, सरपंच पाटील, मुख्याध्यापक यांचा समावेश होता. शिबिरार्थींचे जेवण उत्कृष्ट रीतीने ग्रामस्थांतर्फे बनविण्यात आले. शक्यतो कोणीही आजारी पडले नाही. एकंदर शिबीर व्यवस्थित पार पडले. स्वयंपाकीण स्त्रियांचाही त्यात सहभाग होता, तेव्हा त्यांचाही सत्कार करण्यात आला. ३१ विद्यार्थी व ३७ विद्यार्थिनी शिबिरामध्ये सहभागी झाले होते.

# पर्यावरण व प्रदूषण

संजीव सिताराम मोरे
एम. कॉम. भाग - २

ह्या पृथ्वीतलावर पर्यावरण व प्रदूषण यांचे एक विशिष्ट नातेच सध्या आपणास पाहावयास मिळते. प्रदूषणाचा पर्यावरणावर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. म्हणून सर्वत्र ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा केला जातो.

**अर्थ** : पर्यावरणासंबंधी विचार करताना दोन विचार प्रवाहाला सामोरे जावे लागते व ते करण्याआधी पर्यावरण ह्या शब्दापासून काय अपेक्षित आहे हे पाहिले पाहिजे. पाश्चात्य विचार प्रभावाखाली असलेली मंडळी, मानव हे प्राधान्य ठेवून पर्यावरणाचा विचार करतात. जे मानवाच्या उपयोगाचे असेल तेवढेच स्वीकारणीय व बाकीचे त्याज्य अशी त्यांची विचारसरणी आहे

परंतु भारतीय किंवा वैदिक विचारसरणी यांच्या विचारप्रभावाखालील व्यक्ती, पर्यावरणांचा विचार करताना मानवाचा विचार प्राधान्येकरून न करता तो या चराचर सृष्टीचा एक भाग असा विचार करून, मानवाकडे निसर्गाचे संगोपन करणे हे काम अभिप्रेत धरले आहे.

**स्वरूप** : पर्यावरण ह्या शब्दाला आज अगदी जो प्राधान्याचा मान मिळतो त्याची भारतातील सुरुवात १९८० या दशकात झाली असे म्हणावयास हरकत नाही. हिमालयाच्या परिसरातील जंगलतोड चालू केल्याने, त्या प्रदेशातील रहिवाशांचे मन अस्वस्थ होऊ लागले. बेसुमार जंगलतोड व त्यामुळे अनुभवास येणाऱ्या आपत्तींपासून बचाव करण्यासाठी तेथील स्थानिक रहिवाशांनी झाडाला चिपकून राहाण्याचे आंदोलन चालू केले. त्यातून 'बहुगणा' नावाच्या स्थानिक रहिवाशाने आपल्या अन्य रहिवाशांच्या समवेत "चिपको" या आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर गती दिली व चिपको आंदोलन आंतरराष्ट्रीय स्तरांवर नेवून ठेवले. ह्या आंदोलनाचा मुख्य उद्देश नैसर्गिक संतुलन सुधारण्यासाठी बेसुमार होणारी जंगलतोड वाचवावी, एवढ्यापुरताच त्यावेळी मर्यादित उद्देश होता. भारतात पर्यावरण पर्वाला सुरुवात झाली ती ह्या चळवळीने.

पृथ्वीच्या नैसर्गिक विघटनाला सुरुवात झाली ती १९३९ ते १९४८ च्या दरम्यान महायुद्धाला लागणाऱ्या गरजपूर्तीसाठी बेसुमार जंगलतोड, रासायनिक द्रव्यांचा वापर, आण्विक अस्त्रांचा वापर ह्या कारणाने निसर्गाचे संतुलन पार बिघडून गेले.

महायुद्धानंतरच्या काळातही थोड्या युद्धांच्या कारणाने शस्त्रस्पर्धा, गतिमान वाहनांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन, त्यासाठी पृथ्वीच्या पोटात असलेले इंधन व अन्य खनिज द्रव्यांसाठी पृथ्वीचे उत्खनन ह्या सर्वांचा समुच्चय परिणाम म्हणजे पृथ्वीच्या मूळ प्राकृतिक सुदृढतेचे विघटन, ह्या बाबी पृथ्वीच्या असंतुलनाला ज़बाबदार ठरल्या.

महायुद्धानंतर मानवाची निसर्गावर मात करण्याची घोडदौड चालूच राहिली व त्याचा परिणाम असा झाला की, नैसर्गिक विघटनाला पोषक अशीच कृत्ये पृथ्वीवर चालू राहिल्याने संरक्षण कवचाला छेद जाऊन विवर पडले व त्या विवराच्या पोकळीतून सूर्याचे तीव्रतम किरण पृथ्वीवर येऊन नैसर्गिक विघटनास सहाय्यभूत होऊ लागले. ही नैसर्गिक क्रिया मानवाच्या नजरेस येण्यास आठ दशकांचा शेवट उजाडावा लागला आणि तोपर्यंत निसर्गाची वाताहत ही नियंत्रणाबाहेर जाण्याचा धोका निर्माण झाला.

**पूर्वपीठिका** : वातावरणामध्ये 'ओझोन' नावाचा वायू पृथ्वीच्या कवचाचे काम करतो. त्याला छेद गेल्याने सूर्याची प्रखर किरणे पृथ्वीवर येऊन पृथ्वीवरील सर्वांनाच ती

घातक ठरत आहेत. त्यामुळे वातावरणातील तापमान वाढले आहे. तसेच कर्करोगासारखे अनेक भयानक रोग मोठ्या प्रमाणावर झाल्याचे आढळतात.

भारतीय तत्त्वज्ञानात चराचर सृष्टीचा विचार केला आहे. त्यात मानवाबरोबर अन्य सजीव व चेतनाहीनांचाही विचार केला आहे. पर्यावरणाचा विचार करता त्या नुसत्या मानवी गरजा असता कामा नयेत, तर चराचर सृष्टीला काय लाभ होईल, याचाही जेव्हा विचार होईल तेव्हाच पर्यावरणाची पूर्ती होईल. या दृष्टीने महात्मा गांधींनी एके ठिकाणी म्हटले आहे, "पृथ्वी मानवाला जे जे पाहिजे ते ते पुरवते, फक्त मानवाने हव्यास टाळावा."

पर्यावरणाचा दुसरा पूरक विचारही त्यांनी सांगितला. "विपुल उत्पादनाऐवजी विपुलांनी केलेले उत्पादन हेच खरे." दोन्ही विचारांचा मथितार्थ एकच. जर मानवाला पृथ्वीवर सुखसमृद्धीने जगावयाचे असेल तर त्याला पृथ्वीपेक्षा अलगत्व येता कामा नये व यांत्रिक शक्तीद्वारे होणारे उत्पादन हे केव्हाही मानवाला सौख्य देणारे नसून, विपुल मानवांनी केलेले उत्पादनच पृथ्वीवरील संतुलन राखू शकेल.

**पर्यावरण व मानव :** पृथ्वीच्या निर्मितीपासून अनेक घडामोडी झाल्या. त्यातूनच सजीव सृष्टी निर्माण झाली. वृक्ष, वेली, कीटक, जलचर, पशू-पक्षी निर्माण झाले. मानव त्या सजीव सृष्टीचाच एक भाग; परंतु ही सर्व पृथ्वी जणू आपल्यासाठीच निर्माण झाली असे समजून बुद्धीच्या जोरावर त्याने निसर्गाच्या सर्व घटकांवर वर्चस्व गाजविण्यास सुरवात केली. फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी त्याने निसर्गाच्या मूलभूत तत्त्वांचेही पालन केले नाही.

**प्रदूषणाची कारणे :** प्रदूषण निर्माण होण्याची अनेक कारणे आपल्या दररोजच्या व्यवहारात दिसतात. प्रामुख्याने महत्त्वाची कारणे पुढीलप्रमाणे :

१. प्रदूषण हा एक गूढ शब्द आहे. तो बऱ्याच अर्थाने वापरला जातो. मानवाकडून अतिरिक्त पदार्थ किंवा ऊर्जा वातावरणात टाकली जाते व त्यामुळे वातावरणाची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रूपाने हानी होते, तिलाच प्रदूषण असे म्हणतात.
२. आपल्या शेतावर मारलेले कीटकनाशक द्रव्य जर नदीच्या पाण्यात जास्त प्रमाणात वाहून गेले, तर नदीचे पाणी प्रदूषित होते.
३. एखाद्या कारखान्याच्या धुराड्यापासून मोठ्या प्रमाणावर बाहेर पडणाऱ्या धुरामुळे आसपासचे वातावरण प्रदूषित होते.
४. वातावरणात विषारी वायूचे प्रमाण वाढल्यामुळे एक प्रकारचे प्रदूषण निर्माण होते.

अशा रीतीने प्रदूषण हा मोठा व्यापक अर्थाने वापरला जाणारा शब्द आहे.

**निसर्गातील दुष्ट परिणाम :** निसर्गातील घटकांचे संतुलन बिघडत आहे. केवळ विसाव्या शतकाच्या उदयापासून फक्त महाराष्ट्र राज्यातीलच सस्तन प्राण्यांच्या २०, पक्ष्यांच्या १२, तर सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ६ जाती दुर्मिळ झाल्या आहेत. मानवाने राहण्यासाठी घरे बांधली. शहरे, झोपडपट्ट्या निर्माण केल्या. शेतात अमाप खते व जंतूनाशके वापरून धान्याचे उत्पादन वाढविले. नद्यांवर धरणे बांधून पाण्याची उपलब्धता वाढविली. कारखान्यांतून विविध वस्तू निर्माण केल्या. शाळा, कॉलेज, दवाखाने निर्माण केले; पण सर्व अपुरे पडले. अन्न, वस्त्र, निवारा या जीवनावश्यक गोष्टींची चणचण भासत आहे. याचे एकमेव कारण म्हणजे मानवाने अतीलोभाने आपल्या स्वार्थासाठी केलेला निसर्गाचा नाश.

पृथ्वी नामक सुंदर नील रत्नासारख्या चमकदार ग्रहावरील प्रदूषणाचे संकट दूर करण्यासाठी जून १९९२ रोजी १७८ देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी आपल्या राष्ट्रातील पर्यावरण तज्ज्ञांसह ब्राझिलची राजधानी "रिओ - द - जानिरो' येथे एकत्र येऊन सत्तावीस कलमांचा एक जाहीरनामा व दोन महत्त्वपूर्ण ठराव सर्वसंमतीने मान्य केले. या पृथ्वी शिखर बैठकीत पृथ्वीस होणारे महत्त्वाचे खालील धोके मांडले आहेत :

१. भारत व श्रीलंकेत पावसासाठी आवश्यक वनक्षेत्र नष्ट झाल्याने मोठे नुकसान पोहोचणार आहे.

२. ऑस्ट्रेलियात २३% टक्के जमीन वाळवंटात बदलत आहे.

३. मलेशियात सन २००० पर्यंत सर्व वनक्षेत्र नष्ट होण्याची भीती आहे.

४. झेकोस्लोव्हाकियात हवेतील प्रदूषणामुळे ७० % वृक्षसंपत्तीस धोका.

५. उत्तर अमेरिकेत ८० % शेतजमीन वाळवंट झाली आहे.

६. कोलंबियात या शतकाच्या अखेरपर्यंत उरलेली १/३ जंगले संपुष्टात येणार.

७. ब्राझिलमध्ये दरवर्षी ५३५५ चौरसमीटर मैल वनक्षेत्र नष्ट होत आहेत.

औद्योगिकतेमुळे प्रचंड उपभोगवादी संस्कृती धनसमृद्ध राष्ट्रात निर्माण झाल्याने पृथ्वीच्या पर्यावरणाचा विनाश मोठ्या प्रमाणावर होत आहे, हेही शास्त्रज्ञांनीच मान्य केले आहे. म्हणूनच पर्यावरणाचा विनाश टाळण्यासाठी मुख्यत्वे विकसीत धन समृद्ध व उपभोगवादाचा कळस गाठणाऱ्या राष्ट्रांनीच पुढाकार घेतला पाहिजे. त्याचबरोबर पृथ्वीवरील जंगलांचा व अन्य हिरव्या छत्र्यांचा; तसेच जंगल स्रोतांचा (नद्या, सागर इ.) प्रदूषणामुळे जो प्रचंड विनाश होतो आहे, त्यामुळे त्यांच्या आधारानेच जगणाऱ्या लक्षावधी सजीव सृष्टीचा समूळ वंश-संहार आज होऊ लागला आहे. त्यात मानवी जीवनाला उपयुक्त अशी अन्नधान्याच्या महत्त्वपूर्ण जाता-औषधी-कीटकादी जीव साखळ्यांचा समावेश आहे.

माणसाच्या बेबंदपणामुळे त्यांचा जो नाश होत आहे, त्यामुळेच पृथ्वीवर अन्नाचे दुर्भिक्ष, हवामानाचे पराकोटीचे फेरफार, दुष्काळ, पाण्याची भीषण टंचाई, रोगराई यांचे थैमान सुरू आहे. जैविक ( BIO - DIVERSITY) बहुविधतेचा तोल ढासळल्यामुळेच हे सारे घडत आहे. पृथ्वीवरील पर्यावरणदृष्ट्या परस्पर सामंजस्याचे मुख्य सूत्र म्हणजे निसर्गाचा विनाश होऊ न देता पृथ्वीवरील समस्त माणसांना त्याच्या किमान गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा व रोजगार उपलब्ध करून देणे. त्यासाठी पर्यावरणसुसंवादी आर्थिक धोरण आखले पाहिजे.

**प्रदूषणाचे विविध प्रकार :**

**१) वायू प्रदूषण :** वातावरणातील धूळ, डांबर व कोळशाचे छोटे कण इ. मुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढते. प्रदूषणामुळे केव्हा, कोठे व किती प्रमाणात नुकसान होत आहे हे मोजण्याचा मापदंड नाही. परंतु नुकसान दृष्टोत्पत्तीस आले नाही तरी त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. कधी कधी तर कायमचे नुकसान होऊ शकते हे निश्चितच. अशा प्रकारे प्रदूषणामुळे मानव, प्राणी व वनस्पती यांचीच केवळ हानी होते असे नाही, तर त्याचबरोबर माती, पाणी व सागरी वातावरणही दूषित होत असते. इतकेच नव्हे तर प्रदूषणामुळे दृष्टीसुद्धा कमी होऊ शकते. अशा प्रकारच्या घटना अमेरिका, जपानमध्ये निदर्शनाला आल्या आहेत. तसेच एका अंदाजाप्रमाणे इ. स. २००० पर्यंत वातावरणातील कर्बाद्विप्रणिल वायूचे प्रमाण २० टक्केपर्यंत वाढेल व यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सरासरी तापमान वाढेल.

कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या वायू-प्रदूषणाचा परिणाम म्हणून आजारी पडलेल्यांची संख्या आज मोठी आढळते. उदा. : भोपाळ दुर्घटना, इराण-इराक युद्धामुळे तेलाचे व इतर प्रदूषणामुळे शरीरावर होणारे विपरित परिणाम. परंतु या समस्येवरसुद्धा उपाय आहेत. झाडे-झुडपे व विशेषत: वने, प्रदूषण नियंत्रणाच्या बाबतीत मानवाला मोठ्या प्रमाणावर सहाय्यभूत होत आहेत. तसे पाहिले तर वने, विविध प्रकारच्या प्रदूषणांवर नियंत्रण ठेवतात. उदा. वृक्षांची पाने, कर्बवायू ग्रहण करून त्याबदली प्राणवायूंचा पुरवठा करतात. एक वृक्ष एका तासात सरासरी २२५० किलो कर्बवायू शोषून घेऊन त्या मोबदल्यात १७०० किलोपेक्षा अधिक प्राणवायू वातावरणात सोडत असतो. अशा प्रकारे वनांमुळे वातावरणातील प्राणवायूंचे प्रमाण कायम ठेवण्यात व कर्बवायूच्या वाढत्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यात अतिशय मोलाची मदत होते. यावरून असे दिसून येईल की, केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातही विपुल प्रमाणात झाडे लावली तर

आपल्याला बऱ्याच अंशी शुद्ध हवा मिळू शकेल.

२) **ध्वनी प्रदूषण :** वायू प्रदूषणाइतकाच चिंताजनक दुसरा प्रकार म्हणजे ध्वनी प्रदूषण. विशेषत: विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे, गर्दीने गजबजलेले रस्ते, अधिक वाहने असलेले भाग यामध्ये ध्वनीप्रदूषणाची तीव्रता अधिकच जाणवते. कित्येकदा बहिरेपणा येण्याची भीती असते. साधारणत: आपल्या आसपासच्या सामान्य वातावरणात ४० डेसिबल (40 DBA) इतक्या तीव्रतेचा ध्वनीनिर्माण होत असतो व तो ऐकण्याची आपल्याला सवय असते. परंतु विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे इ. ठिकाणी निर्माण होणाऱ्या ध्वनीची तीव्रता ९० डेसिबल (90 DBA) पर्यंत असू शकते व त्यामुळे आपली श्रवणशक्ती कायमची गमावली जाण्याची भीती असते. ६५ ते ७० डेसिबल तीव्रतेचा आवाजही तापदायक व हानीकारक समजला जातो. परंतु या बाबतीतही वृक्षांचा आपल्याला उपयोग होतो. वृक्षांमुळे ध्वनीला अडथळा निर्माण होतो व त्याची तीव्रता बऱ्याच प्रमाणात कमी होते. उदा. : चीनमध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूने वडासारखी मोठमोठी वृक्ष लावली आहेत. त्यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर टळणार आहे. या वृक्षांच्या रांगा जर सुनियोजित पद्धतीने लावल्यावर आवाजाची तीव्रता जवळजवळ आपल्या घरगुती वातावरणाइतकी कमी होऊ शकते. पर्यावरणाच्या रक्षणासाठी चीन, जपान सारख्या राष्ट्रांनी खूपच दक्षता घेतली आहे. चीनच्या सरकारने कोणताही नवा कारखाना सुरू करताना व जुन्याचे आधुनिकीकरण करताना प्रदूषण रोखणारी यंत्रणा त्यात उभारण्याची सक्ती करण्यात आली आहे.

३) **रासायनिक खते व प्रदूषण :** शेतीचे उत्पन्न वाढावे म्हणून मानवाने केलेल्या बेसुमार खतांच्या वापरामुळे गोड्या पाण्याचे तलाव, सरोवरे, झरे आटून गेले. पाणी साठून राहिल्याने काही रोग व आजार वाढले. अनेक पशू-पक्षी नाहीसे झाले. जंगली जनावरे कमी झाली. इजिप्त, अफ्रिका, आशिया, दक्षिण अमेरिकेतील वायव्येकडील भाग येथे तर विविध रोगांचा प्रादुर्भाव धरणामुळे मोठ्या प्रमाणावर झाला. पाण्यात काम करणाऱ्या अनेक कामगारांना आतडी व लघवीमार्फत होणाऱ्या रोगांमुळे कामगार शक्तीहीन होत जातात. या रोगाने २० कोटी लोकांना पछाडले आहे. रासायनिक खते वापरली की, ती शेतीमध्ये नियंत्रित न होता, सरोवरे, नद्यानाले यामध्ये पसरतात. त्यामुळे पाणी साठून एक प्रकारचा त्याला वास येतो व हळूहळू झरे आटतात. पाणी मुरते. सरोवरे, तळी नाहीशी होतात. कारण त्यातील मासे व इतर जीवजिवाणू जे पाण्यातील घाण कमी करतात तेही नाहिसे होतात.

४) **जंतूनाशके व प्रदूषण :** जंतूनाशके म्हणजे उपद्रवी किडे, जीवजिवाणूंचा संहार करण्यासाठी तयार केलेली रासायनिक मिश्रणे असतात. परंतु बरीचशी जंतूनाशके पर्यावरणात साठून राहू लागली. त्यामुळे त्याचा परिणाम इतर प्राण्यांवरही होऊ लागला. तसेच त्याचा परिणाम मानवावरही होऊ लागला. या रासायनिक जंतूनाशकामुळे व तणनाशकामुळे जंगल, मनुष्य व प्राणिमात्रावरही विषारी परिणाम झाला. ड्राय ऑक्सन पोटात गेल्याने जन्मत:च काहींना पंगूपण येते. पर्यावरणातील प्रदूषण बराच काळ टिकते. अनेक जनावरे मरण पावल्याचे आढळून येतात.

या सर्व प्रदूषणावर व पर्यावरणावर एकच उपाय अतिशय लोकप्रिय आहे व अत्यंत आवश्यक आहे तो म्हणजे वनसंरक्षण.

**वनसंरक्षण :** सध्या जगात दर मिनिटाला ४० हेक्टर जमिनीवरील वृक्षअच्छादन नष्ट होत आहे. जळाऊ व इमारती लाकडांची गरज भागविण्यासाठी जंगलांची अमाप तोड होत आहे. भाकड जनावरांच्या चराईमुळे जंगलांचा ऱ्हास होत आहे. ही परिस्थिती अशीच राहिल्यास सर्व जमीन वैराणहीन म्हणजे वाळवंटरूपी होण्यास वेळ लागणार नाही. निर्धूर चुलीच्या वापराद्वारे जळाऊ लागडाची गरज कमी करणे व सूर्यचुलीद्वारे पर्यायी इंधनाचा वापर करणे. अशा उपायांची आवश्यकता आहे. शाळा, देवालये, ग्रामपंचायत, खाजगी जमिनी व सरकारी पडिक जमिनीवर वृक्ष लावले पाहिजेत. कारण सर्वांना आज पर्यावरण-संतुलन बिघडल्याने येणाऱ्या

भावी संकटाची चाहूल लागली आहे. सर्व जगभर अधिकाधिक झाडे लावून पर्यावरण पुन्हा संतुलित राखण्याचे उपाय योजले जात आहेत.

**पर्यावरण संरक्षणात वनांचे कार्य :** पर्यावरण संरक्षणात वृक्ष महत्त्वाचे आहेत. पावसाचे थेंब जमिनीवर जोराने पडल्याने व वाहून जाणाऱ्या पाण्यामुळे जमिनीची धूप होते. हा परिणाम डोंगर-पर्वतासारख्या तीव्र उताराच्या जमिनीवर विशेष होतो. तथापि वृक्षाच्छादित प्रदेशात पावसाचे थेंब प्रथम झाडांवर पडून त्यांचा वेग कमी होतो. ते पानांवरून वेली-गवतांवरून शेवटी जमिनीवर हळूवार पडतात. जमिनीवर पडलेले पाणी झाडांच्या मुळाद्वारे सछिद्र झालेल्या जमिनीत मुरते. झाडांच्या गळून पडलेल्या पालापाचोळ्यांमुळे वाहून जाणाऱ्या पाण्यास अटकाव होतो. त्यामुळेच जंगलातून वाहणारे नदी-नाल्याचे पाणी बारमाही असते. झाडे श्वासोच्छ्वासासाठी हवेतील कार्बनडाय ऑक्साइड घेतात व प्राणवायू सोडतात. एक चांगले पोसलेले झाड एका वर्षात अंदाजे एक टन प्राणवायू देते. इतका प्राणवायू कारखान्यात तयार करण्यास रुपये ५०००/— इतका खर्च येतो. शासनाच्या धोरणानुसार एकंदर भौगोलिक क्षेत्रापैकी १/३ क्षेत्र वनाखाली असणे आवश्यक आहे. मात्र भारतात फक्त ११ टक्केच भूमी जंगलव्याप्त आहे.

**विद्यार्थ्यांची भूमिका :** विद्यार्थ्यांनी गंभीरपणे हे धोके लक्षात घेऊन प्रदूषणाच्या रक्षकाला पाठिंबा दिला पाहिजे व लोकमत जागृत करावे. कारण तरुणांना यापुढे प्रदूषणात आयुष्य काढायचे आहे. त्यामुळे त्याविरुद्ध लढणे हे त्यांना आवश्यक आहे. काही पर्यावरणाच्या मूळ तत्त्वांना धरून जर आर्थिक उन्नती हातात हात घालून येतील, तेव्हाच जमिनीचा सधन (योग्य) उपयोग प्रदूषणाला आळा घालण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होईल. मात्र त्यासाठी पूर्व नियोजन करणे सर्वच दृष्टीने फायद्याचे होईल.

## कविता

कविता मनातून येते, उमलते
तिला शब्दरूप लाभते, मग ती
नादमधुर स्वरात बांधली जाते
आणि तिचं लोभस गाणं होतं
ते कानात साठून राहतं
हृदयाला जाऊनही भिडतं
आणि ओठांवर येऊन रेंगाळतंही
आणि म्हणूनच कुठेतरी ढग
काळवंडून येतात आणि एखाद्या
क्षणी आवेगानं पाऊस कोसळायला लागतो.

**अनिता गुरव**
प्रथम वर्ष कला

# साक्षर जनता, भूषण भारता

**साधना प्रल्हाद भोसले**
तृतीय वर्ष कला

*"ज्ञान ज्योती तेवत्या ठेवा,*
*जिथे अज्ञान आहे,*
*उजळू द्या*
*अंधारलेली वाट ही वैरिण आहे."*

आज आपल्या भारतातील ३६ टक्के जनता निरक्षरतेच्या अंध:कारातून बाहेर पडली आहे. उरलेले सर्व अज्ञानरूपी अंधारात खितपत पडली आहेत. भारत हा देश कृषीप्रधान आहे. शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शेतकरी हा ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू असतो. शेतकऱ्यांना अजून शिक्षणाचे महत्त्व कळलेले नाही. त्यामुळे ते स्वत:ही शिकत नाहीत व आपल्या मुलांनाही शिकवत नाहीत. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास होत नाही. म्हणून तर म्हणतात —

*"निरक्षर प्रौढ लिहिती वाचिती,*
*हीच युवा शक्तीची प्रचिती."*

जेथे पुरुष शिकत नाही, तेथे स्त्रियांची काय दशा असणार ? पुरुष नेहमी म्हणत असतात की —'शिकलेली आई घराला पुढे नेई.' परंतु तीच जर अज्ञान राहिली तर ती आपल्या बालकाला संस्काराचे बाळकडू कसे बरे पाजू शकेल? शिक्षणाचे महत्त्व कळले ते फक्त महात्मा फुले यांना ! त्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनीही सहभाग घेतला. त्या लोकांना म्हणत — "तुम्ही मला दगड मारता; परंतु एके दिवशी तुमच्या दगडाचा नेम चुकेल; परंतु माझा शाळेत जाण्याचा नेम चुकणार नाही !" अशा प्रकारे दगड, शेण, खरकटे पाणी याप्रकारचे त्रास सोसले. महात्मा फुले शिक्षणाबाबत म्हणतात की, —

*''विद्ये विना मति गेली, मति विना गति गेली,*
*गति विना नीती गेली, निती विना वित्त खचले,*
*एवढे अनर्थ एका अविद्येने केले."*

शिक्षणाच्या प्रसारात कर्मवीर भाऊराव पाटील यांचासुद्धा सिंहाचा वाटा आहे. ते केवळ सहावी शिकले होते. परंतु त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले होते. म्हणून तर त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली व त्यांच्या पारंब्या सगळीकडे विखुरलेल्या आहेत. यात शाहू महाराजांनी थोडी मदत केली म्हणून मी स्मरते —

*"गुरुने दिला ज्ञानरूपी वसा,*
*आम्ही चालवू हा पुढे वारसा."*

रंगीबेरंगी फुलांच्या मनमोहक वेली, रोपटी हे बागेचे भूषण, चित्ताकर्षक कलाकुसरीने घडविलेली मूर्ती हे कारागिरीचे भूषण; मन धुंद करणारे सौंदर्य हे युवतीचे भूषण, सुदृढ, बुद्धिमान सुपुत्र हा मातेचे भूषण, तद्वतच 'साक्षर जनता' हे भारताचे भूषण ठरेल यात शंका नाही.

ज्या देशाला संस्कृतीचा उच्चतम वारसा लाभलेला आहे, जो देश सुजलाम, सुफलाम सस्यश्यामलम या गौरवास पात्र आहे, आणि लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता ज्या देशाचा जगात दुसरा क्रमांक आहे. अशा या भारत देशाचा बारकाईने विचार केल्यास, निरीक्षण केल्यास मनात खेद होतो. ओळखा पाहू ही खेददायक बाब !

'माझा भारत महान !' या शब्दाचा उच्चार आपण सर्वच भारतीय मोठ्या अभिमानाने करतो. पण या महानतेला बाधा आणणारी खेदाची बाब म्हणजे या देशातील लोकांची निरक्षरता ! या देशातील ७० टक्के लोक ग्रामवासी आहेत. एवढेच नव्हे तर भारत बहुअंशी खेड्यांचा देश म्हटला तरी चालेल. या खेड्यांच्या विकासावरून भारताच्या विकासाचे उज्ज्वल स्वप्न अवलंबून आहे. खेड्यांचा विकास

साधावयाचा असेल तर प्रथमतः येथे राहाणाऱ्या खेडूत लोकांच्या जीवनाकडे सर्वांचे लक्ष लागले पाहिजे.

शेतातून हिऱ्या-मोत्यांसारखे धान्य पिकविणारा आमचा शेतकरी राजा आणि त्याचे कुटुंब जर आपण पाहिले तर मन सैरभैर झाल्यावाचून राहणार नाही. शेतकऱ्यांचे ते चंद्रमौळी घर ! त्याची ती लंकापार्वती पत्नी ! आणि फाटक्या लक्तरातील त्याची ती कृशकाय मुले ! चार ॲल्युमिनियमच्या भांड्यांचा संसार ! वा, रे वा ! आमचा भारताचा 'शेतकरी राजा !' हे असे का ? विचारा मनाला आणि शोधा त्याचे उत्तर याचे एकमेव उत्तर आहे निरक्षरता !

निरक्षरता हा माणसाच्या जीवनातील महाभयंकर शापच आहे. पण हा शाप परमेश्वराने दिलेला नाही. तो माणसाने आपल्या हातानेच मिळविला आहे. या शापाने अतोनात नुकसान होत आहे. 'काला अक्षर भैस बराबर' अशी अवस्था निरक्षर जनतेची होते. असा माणूस जीवनाची सोनेरी स्वप्नेच रंगवू शकत नाही. राब राब राबणे व कशी तरी दोन वेळची भाकरी मिळविणे, एवढेच निरक्षर माणसाच्या जीवनाचे ध्येय बनते. दिवसेंदिवस फुलणाऱ्या, बहरणाऱ्या जनजीवनापासून हा निरक्षर माणूस खूप दूर-दूर राहतो.

निरक्षरतेचा धुमाकूळ जर हद्दपार करावयाचा असेल, तर परमपूज्य महात्मा गांधी यांच्या तत्त्वाचा पुरस्कार करून साक्षरतेचा झेंडा हाती घेऊन, खेड्याकडे मार्गक्रमण केले पाहिजे. शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे. विशेषतः शासनाने या बाबींकडे विशेष लक्ष पुरवले पाहिजे. अडचणींवर मात करून शिक्षणाचा प्रचार केला पाहिजे. त्यासाठी लागणारा पैसा, शैक्षणिक साहित्य, मनुष्य बळ यांची उणीव भासता कामा नये.

भारतातील शंभर टक्के जनता साक्षर झाल्यास मनुष्य जीवनात सर्व सुखांचा वर्षाव झाल्यावाचून राहणार नाही. ज्ञान व शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. या डोळ्यांच्या प्राप्तीने वाचन, लेखन, कलाकौशल्य, व्यापार, उद्योग, शेती या सर्वच क्षेत्रात माणूस नेत्रादीपक यश संपादन करू शकेल. ज्ञानाच्या प्रगतीची कवाडे प्रत्येकांच्या स्वागतासाठी सुसज्ज राहतील. साक्षरतेचा व लोकसंख्येचा अगदी निकटचा संबंध आहे.

शिक्षणाचा प्रसार प्रथम इंग्लंडमध्ये झाला. साक्षरतेचा प्रसार It is never to late व अक्षरधारा या टी. व्ही. च्या कार्यक्रमांद्वारे जोरात प्रयत्न चालू आहेत. खेड्याखेड्यांतून प्रौढ साक्षर वर्ग चालू आहेत. वरील सर्व प्रयत्नांना साथ देण्यासाठी निरक्षर जनतेने मनापासून हजर राहिले पाहिजे. कामातून सवड काढून लिहिण्या-वाचण्याकरिता रुची घेतली पाहिजे, तरच जीवनातील खरा आनंद लुटता येईल. साधे पत्र वाचण्यासाठी दुसऱ्याची विनवणी करावी लागणार नाही. सावकारांच्या फुगत जाणाऱ्या व्याजाला बळी पडणार नाही. हातात वर्तमानपत्र उलटे धरण्याची वेळ येणार नाही.

प्रत्येक गाव, घर जर साक्षरता मोहिमेने झपाटले, तर नक्कीच निरक्षरतेची 'भूतबाधा' पळून जाईल. या मार्गाने भारत मातेचा विकास होईल. तिचा ऊर या बदलत्या चित्राने भरून येईल. आणि मगच 'मेरा भारत महान' या शब्दांचा उच्चार सार्थक ठरेल.

म्हणून मी मनोमन प्रार्थना करते —

*"एक एका साक्षर करू,*
*अवघे धरू सुपंथ"*

यावरून खरोखरच लक्षात येईल, "साक्षर जनता, भूषण भारता !"

# स्पर्धा

**अंजली कानडे**
प्रथम वर्ष शास्त्र

आज सकाळपासूनच रमाबाई फार अस्वस्थ होत्या. मनोमन फार खचल्या होत्या. काळजी त्यांच्या चेहेऱ्यावरून ओसंडत होती. आज आपण हरल्याचे दु:ख त्यांना बेचैन करत होते. त्यांच्यातली "आई" आज त्यांच्या मुलांना घडविताना कमी पडल्याचे अपार दु:ख त्यांना होत होते. अजूनही सकाळी घडलेला तो प्रसंग दुपारी आडव्या झाल्यावर त्यांच्या डोळ्यासमोरून सरकत होता.

तसे रमाबाईंचे आयुष्य अगदी रेखीव व सुबक रांगोळीप्रमाणे. त्यात त्यांना त्यांच्या आयुष्याचा जोडीदार मनोहरच्या सहाय्याने सुंदर रंग भरून त्याचे सौंदर्य वाढवले होते. त्यांच्या प्रेमळ जीवनात त्यांच्या जाई, जुई या दोन फुलांनी सुगंधाचा शिडकावा केला होता. जाई ही मोठी मुलगी जात्यातच हुशार. प्रत्येक बाबतीत यश तिला मिळालेच पाहिजे हा तिचा हेका व मनोहरपंतांच्या योग्य मार्गदर्शनाने यशाच्या मंदिराच्या ती एकेक पायऱ्या चढत होती. निसर्गाने तिला बुद्धी बरोबर सौंदर्यही मुक्त हस्ताने बहाल केले होते. त्यामुळे कौतुकात तिचे बालपण चिंब भिजत होते. याच कौतुकाचा परिणाम अथवा हुशारीचा मान यांना तिला गर्विष्ठ बनवले होते. स्वत:ला तिने सामान्य समजणे केव्हाच सोडून दिले होते. आपण सुंदर व हुषार आहोत या भावनेने तिच्यातल्या अस्मितेला झाकून टाकले होते.

आणि अगदी याच तिच्या हेकट स्वभावाने ती नकळत सर्वांना दुखावत होती. तिला त्याबद्दल तिळमात्रही दु:ख नव्हते. याउलट 'जुई' अगदी जणू नाजूक जुईचे फूलच ! हात लावताच दुखावेल काय असे वाटणारे. जाईप्रमाणे ती देखील हुशार, खेळात, अभ्यासात सतत पुढे; पण मागच्यांचा नेहमी विचार करणारी, कोणालाही अगदी शब्दाने दुखविणे तिला जमत नसे. आणि याच लाघवी स्वभावामुळे ती शिक्षकांची व सर्व मित्र-मैत्रिणींची आवडती बनली होती. मैत्रिणी एक क्षण देखील तिच्यापासून दूर राहू शकत नसत.

रमाबाईंनी दोघींनाही अगदी तळहातावरील फोडाप्रमाणे जपले होते. त्यांच्यावर योग्य संस्कार घडवले होते. पण त्यांच्या या संस्कार घडविण्याच्या कामात त्या आज अपयशी ठरल्या होत्या. नकळत त्यांच्याकडून जाईच्या मनात गर्वाचे घर बांधणाऱ्या राक्षसाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले होते. आणि म्हणूनच आज त्यांना त्या हरल्यासारखे वाटत होते. या गर्वाच्या राक्षसाने जाईला पूर्णत: बदलून टाकले. तिला जुईचा सख्ख्या बहिणीचा द्वेष वाटू लागला. आपल्या कौतुकात तिला सामील झालेली पाहाताना तिचा संतापाचा पारा चढत असे. शिक्षक व मित्रमैत्रिणीतील तिचे वाढते स्थान बघताना तिचे मन तिला बेचैन करीत असे. तिला खेळातील, अभ्यासातील बक्षिसे पाहून तर जाईला अगदी वेड लागत असे. ती मोडून टाकावीत असे तिला वाटत असे. त्याचा थांगपत्ता देखील जुईला नव्हता. आणि त्यामुळे आपली सर्व गुपिते, गंमती तिला जाईला सांगाव्याश्या वाटत आणि ती सांगत असे. तिचा प्रत्येक बाबतीत सल्ला विचारत असे. जाई तिला सल्ला तर देतच नसे पण उलट तिच्यावर चिडत असे. सर्वजण तिला रागावतील याची कारणे शोधत बसे.

जाईचा १२ वीचा रिझल्ट आज लागला. मुळातच हुशार जाईने बोर्डात १० नंबरचे स्थान पटकावले होते. सगळयांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. सगळीकडून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत होता व त्यामुळे तिच्या अहंकाराचा नाद गारुड्याने पुंगी वाजवावी व नागाने आनंदाने डोलावे तसा डोलावू लागला होता. जग जिंकल्याचा आनंद झाला होता. या आनंदातच तिने मनोहरपंताची इच्छा

इंजिनिअरला ॲडमिशन घेऊन मोठे इंजिनिअर व्हावे, ह्या इच्छेला फाटा देऊन मेडिकलला ॲडमिशन घेतले. पण मनोहरपंतानी त्याचे वाईट वाटून न घेता मुलीच्या आनंदातच आपला आनंद मानला.

यथावकाश दिवस जात होते. जुई देखील मोठी झाली होती. तिला १२ वीला ९६ टक्के गुण मिळाले होते. सगळ्यांचा आनंद अगदी दुथडी भरून वाहात होता. सगळ्यांच्या इच्छा आपण पूर्ण करू शकल्याचा आनंद जुईच्या चेहऱ्यावरून ओसंडत होता. आता तिला देखील मेडिकल शाखेत प्रवेश मिळू शकला असता; पण तिने मनोहरपंतांची इच्छा पूर्ण करण्याचे ठरविले व इंजिनिअर शाखेत प्रवेश घेतला. जाईने जरी कॉलेजत टॉप स्कॉलरचा मान मिळवला असला तरी तिच्या स्वतःच्या तुसड्या स्वभावाने मित्र-मैत्रिणी मिळविण्याची किमया साधली नव्हती. तिने फक्त एकटीचेच जग निर्माण केले होते. या उलट लाघवी जाईने चटकन स्वतःच्या प्रेमळ स्वभावाने मित्र-मैत्रिणींच्याच नव्हे तर शिक्षकांच्या हृदयातदेखील स्थान पटकावले. कोणालाही लगेच आकर्षून घेण्याची किमया तिला चांगली साधली होती. तिचे जग येथे आणखीनच व्यापक बनले होते. त्यात रोज नवीनच भर पडत होती. एकाच कॉलेजात असल्याने जाईला तिचे कौतुक सतत डोळ्यासमोर दिसत होते आणि आता तर तिला सर्वजण जुईची बहीण म्हणून ओळखू लागले. तिला स्वतःची अशी ओळख राहिली नाहीच आणि आता ती जुईला जणू एक मोठा प्रतिस्पर्धीच समजू लागली. प्रत्येक बाबतीत तिला कमी लेखू लागली. ज्याप्रमाणे गुप्त हेराने शत्रूचा कमजोरपणा शोधून त्याच भागावर हल्ला करावा, त्याच प्रमाणे ती सतत तिच्या चुका काढण्यात वेळ घालवू लागली आणि तिची एकतर्फीच जुईशी स्पर्धा सुरू झाली.

जाई आता शेवटच्या वर्षाला असल्याने मनोहर पंतांना व रमाबाईंना तिच्या लग्नाचे वेध लागले होते. ते तिच्याकरीता स्थळे बघू लागले होते. पण मुळी अहंकारी जाई तिच्याकरीता आलेल्या प्रत्येक स्थळात दोष काढू लागली. जाईने कितीतरी स्थळे नाकारली होती. तिला पती नकोच होता. तिला हवा होता एक चालता बोलता बाहुला, जो येता जाता सतत तिचे कौतुक करेल. जो तिच्याच एवढा शिकलेला असेल. पण प्रत्येक बाबतीत तिचाच सल्ला योग्य मानेल. आणि या सर्व तिच्या अटींमुळे आता तिच्याशी लग्न करण्यास कोणी तयार होईनात. या बाबतीत जुई मात्र अतिशय नशिबवान होती. तिच्याच कॉलेजातील एका प्रोफेसरांना ती मनापासून आवडली होती. त्यांनी मनोहरपंतांजवळ तिच्याशी लग्न करण्याचा मनोदय व्यक्त करताच मनोहरपंतांना अतिशय आनंद झाला. रमाबाई तर अगदी वेडावून गेल्या. जुईच्या मनात वसंत ऋतूतल्या मोराचे नृत्यच सुरू झाले. आणि अजित होताच तसा स्वभावाने अगदी मनमिळावू, हुशार तो स्वतः एक कुशल इंजिनिअर होता.

पण आज सगळ्यांच्या आनंदाला गालबोट लावले जाईने. रमाबाईंना वाटले होते ही बातमी ऐकताच ती आनंदाने वेडी होईल पण झाले उलटेच. ती वेडी झाली ती रागाने आणि या रागाच्याच भरात तिने सकाळी नाश्त्यासाठी डायनिंग टेबलवर भरून ठेवलेल्या पाण्याचा जग जोरात आपटून फोडला. जणू काही ती जुईलाच मारत आहे. आणि ती जे बोलली ते ऐकून तर रमाबाईंच्या पायाखालची जमीन सरकली. आपल्यातील आई तिच्या पिल्लांना घडवताना कमी पडल्याचे त्यांना जाणवले. ती जुईला वाटेल तशी बोलली आणि जाता जाता म्हणाली, "माझ्या आगोदर तिचे लग्न केले तर मी जीव देईन हा हक्क आधी माझा आहे. ती . . . ती माझी प्रतिस्पर्धी आहे. मी तिला कधीच जिंकू देणार नाही." आणि पाय आपटतच आपल्या खोलीत निघून गेली. तिच्या या वागण्याने मनोहर पंतांना व रमाबाईंना तर दुखावलेच पण जाता जाता जुईच्या काळजात न मिटणारा ओरखडा ओढला गेला होता. ती जणू पार कोलमडलीच होती.

दिवस जातच होते. जाईने घरात कोणाशीही बोलणे सोडून दिले. जुई तिच्या ताईला तिच्यामुळे होणारा त्रास व तिची वागणूक पाहून पार घाबरून गेली होती; एक प्रकारच्या उदासीनतेने तिला घेरले होते मुळातच हसऱ्या जुईच्या चेहेऱ्यावर उदासीनतेचा बुरखा चढला होता . रमाबाई आणि मनोहरपंत देखील ह्याच उदासीनतेच्या छायेत वावरत होते. मनोहरपंत पार खचून गेले होते. स्वतःच्या रक्तातले दोन भिन्न

गुणधर्म पाहून फार फार दु:खी झाले होते ! एका सुखी घराला उदासीनतेनं आपल्या पदराखील झाकून टाकले होते. एक हात सडला म्हणून तो कापावा लागला ! तर दुसरा देखील चांगला हात कोणी कापत नाही. त्यामुळे त्यांनी मनाशी अगदी ठाम निश्चय करून, जाई कॉलेजला गेल्यावर जुई व अजितला घरी बोलावले. जुईला पूर्णत: तो योग्य असल्याची खात्री झाल्यावर त्यांनी त्या दोघांना लग्नाला परवानगी दिली. त्या दोघांनी रजिस्टर लग्न केले. जाई लग्नाला आली नाही; पण तिनें आत्महत्या देखील केली नाही. दिवसभर स्वत:ला खोलीत कोंडून घेऊन विरोध व्यक्त केला. आपण हरल्याचे तिचे मन तिला सांगत होते. पण ती ते स्वीकारत नव्हते.

काळ कोणासाठीही थांबत नाही. दोघीही बहिणी आपल्या विश्वात गुंग होत्या. जाईने एम. बी. बी. एस. केले. नंतर तिने एम. डी. चे शिक्षण घेतले. एक हुशार, कर्तबगार डॉक्टर म्हणून नाव मिळविले. समाजात स्वत:चे स्थान निर्माण केले. जुईने व अजितने एकत्र एक छोटा उद्योग सुरू केला. दोघांच्या प्रयत्नांनी तो वाढवला. आपल्या दोन छोट्या मुलांना सांभाळून जुई अजितला उद्योगात तर मदत करीतच होती; पण एकीकडे समाजाचे ऋण देखील फेडीत होती. तिने कामगारांच्या मुलांकरिता एक छोटी शाळा काढली होती व त्यात त्या मुलांना अत्यंत अल्प फी घेऊन शिकवत होती. तसेच रमाबाई व मनोहरपंतांच्या निधनामुळे झालेली मायेची पोकळी भरून काढण्याच्या प्रयत्नात ती वृद्धाश्रमात जाऊन तेथील वृद्धांची सेवा करीत असे.

आज जाईच्या नोकरीचा शेवटचा दिवस होता. तिच्या आयुष्यातले एक पर्व आज यशस्वीरित्या संपत होते. तिच्या सहकाऱ्यांनी तिला एक प्रेमपूर्वक निरोप दिला. सकाळीच जुईने जाईला फोन करून तिला आपल्या घरी बोलावले व आजच्या या आयुष्याच्या वळणावर जाईला प्रथमच जुईकडे जावे असे मनापासून वाटले.

आज जुईला मनावरचे एक ओझे जणू कमी झाले आहे असे वाटले. प्रथमच तिला एवढा हलकेपणा जाणवत होता. पती-पत्नीचे आपसात नाते काय असते याची जाणीव तिला आज जुईच्या घरी झाली. नाते या शब्दाचा खरा अर्थ आज तिला समजला. आईच्या भूमिकेचा अर्थ तिला जुईत दिसला. तिला तिच्या मुलांशी होणारा संवाद पाहून खूपच आनंद झाला.

जेव्हा दुपारच्या वेळेस जाई-जुई शांतपणे गप्पा मारीत होत्या, तेव्हा त्यांच्या संवादातून एक आठवणींचे फवारेच जणू उडत होते. जाईला आज आपण हरल्याचे जाणवत होते. पण त्यातही तिला आनंद होत होता. आज तिने जुईजवळ जणू आपल्या मनावरचा भार कमी करण्याचे ठरवलेच होते. आज ती वक्ता होती आणि बडबडी जुई प्रेक्षक होती. ती बोलत होती. चुका कबूल करीत माफी मागत होती व स्वत:लाच शोधण्याचा प्रयत्न करीत होती. ती जुईला म्हणाली, "अगं मी डॉक्टर आहे. जरी मी रोग्याला ठणठणीत बरे केले ना, तरी त्याचे श्रेय मला नाही त्याच्या घरच्यांना आहे, कारण माझ्यापेक्षा त्यांनीच त्यांच्या दुखावलेल्या मनाला मलमपट्टी करून त्याला नवी उमेद दिलेली असते. त्यामुळे तो आजारातून लवकर उठतो पण त्याचे श्रेय आम्हाला मिळते. पण आज मला कळले की श्रेय आमचे नसतेच आणि मला तरीही आज आनंद होत आहे कारण मी ते सत्य स्वीकारले आहे."

"जुई, आजवर मी तुला प्रतिस्पर्धी समजत होते. तुला कधीही मी माझी जोडीदार समजले नाही आणि तिथेच मी चुकत होते. जुई, आज मी मनापासून माफी मागते. आणि आज प्रथमच मनापासून माझी स्वत:ची अशी वस्तू म्हणजे माझी संपत्ती मी तुझ्या समाजकार्याला देत आहे. तू त्याला नाही म्हणणार नाहीस, याची मला खात्री आहे."

आणि जाई हळूच उठून भरलेले डोळे पुसत आपल्या खोलीत गेली आणि जाता जाता म्हणाली. "मी स्पर्धा हरले पण मी सुखी आहे .... सुखी आहे."

जुई तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात म्हणाली, "ताई, खरंच तू मला कधीच समजली नाहीस, पण खरेच तू खूप मोठी आहेस ! "

# देव आहे की नाही ?

राजश्री व्ही. फाटक
प्रथम वर्ष शास्त्र

फार नाही परंतु ४-५ वर्षांपूर्वीचीच गोष्ट आहे. दर रविवारी सकाळी ९ च्या सुमारास बाहेर नजर टाकली तर असे दिसून यायचे की, जो तो आपला दूरदर्शनवरच्या पुढ्यात आहे. कशासाठी माहीत आहे ? त्यावेळी गाजलेली मालिका 'रामायण' पाहाण्यासाठी. खरं तर रविवारी कोणी लवकर उठण्याच्या भानगडीत पडत नाही. पण त्या मालिकेचा सामान्य जनतेवर इतका प्रभाव पडला होता की श्री रामाचे टी. व्ही. वर दर्शन घेण्यासाठी आंघोळ न करता बसणे लोकांना अपवित्र वाटायचे. विशेषतः स्त्रिया 'रामायण' सुरू व्हायच्या आधी घरातल्या सर्वांनी आवरून मगच टी. व्ही. समोर बसावे याबाबत कटाक्ष ठेवू लागल्या. 'प्रभु श्रीरामाचे' असंख्य भक्त आजही आहेत. फक्त हिंदू धर्मातच नव्हे, तर परधर्मीय बरेच लोकही श्रीरामाला मानतात. वास्तविक पुराणात डोकावले असता बऱ्याच लोकांचे असे मत आहे की राम हा देव नाही, माणूस म्हणून जन्माला आला होता. परंतु श्रीरामाच्या व्यक्तिमत्त्वातील एकवचनी, एकपत्नी, एकबाणी, दयाळू, क्षमाशील, नम्र, आज्ञाधारक आदि गुण त्याला देवाच्या स्थानावर नेऊन पोहचवतात. त्यामुळेही असेल; पण 'श्रीरामा' ची ही पवित्र प्रतिमा आजही जनसामान्यात अती प्रिय आहे.

प्रभू श्रीराम खरंच कोण होता ? तर भगवान 'श्री विष्णूंचा' ७ वा अवतार. ह्या पृथ्वीवर पसरलेल्या दुष्टांचा नाश करण्यासाठी श्री विष्णूंनी दहा अवतार घेतले असे म्हणतात. त्यालाच दशावतार असे मानतात. परंतु ही रूपे खरेच घेतली होती की नाही हा काही टीकाकारांच्या मते वादाचा मुद्दा होऊ शकतो. परंतु १० वा अवतार अजून जन्माला यायचा आहे, असेही म्हटले जाते. खरंच, आजची सामाजिक परिस्थिती पाहता असा विचार मनात येतो की, श्री विष्णु आपला १० वा अवतार केव्हा घेणार ? आज ह्या समाजात हिंसाचार, भ्रष्टाचार व दहशत इतकी फोफावली आहे की, सामान्य माणूस पार हादरून जातो. इतके की, रोजचे वर्तमानपत्र जरी वाचायचे म्हटले तरी, पहिल्यांदा दृष्टीस पडतात ते रोज पडणारे हजारोंचे निष्पाप बळी, स्वार्थापायी निर्घृण खून आणि हुंड्यांसाठी नव विवाहितांची आत्महत्या.

ह्या सगळ्याला जबाबदार कोण आहे ? हे सगळे का घडते ? ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळणे जरा कठिणच आहे. एक म्हण आहे, 'जसा राजा तशी प्रजा'. पूर्वी रामराज्यात सुजलां सुफलां होते . पण आज ? आज जी अधोगती दिसते आहे, तीही मर्यादेच्या बाहेर जायला फार वेळ लागणार नाही असे दिसते. ज्या पुढाऱ्यांनी, नेत्यांनी निःस्वार्थीपणाने देश सांभाळायला पाहिजे, देशाची उन्नती करायला पाहिजे, ज्यांच्याकडे लोक अपेक्षेने पाहतात, तेच नेते पैसा व खुर्चीच्या मागे हावरटासारखे धावतात ! सत्तेसाठी काहीही किंमत मोजायला तयार असणारी ही माणसे व त्यांचे पराक्रम या जगाच्या कानाकोपऱ्यात धुळीसारखी इतकी पसरली आहेत की, त्यांना आवरणे आवाक्याबाहेरचीच गोष्ट झाली. देवाशिवाय हे काम कुणी करू शकणार नाही. सद्दाम हुसेन हे अलीकडचेच ह्या क्रूरतेचे उदाहरण म्हणायला हरकत नाही. ह्या साऱ्या अमानुषतेला आवर घालण्यासाठी देवाने १० वे रूप घेण्याची खरंच गरज निर्माण झाली आहे.

आपला भारत देश मुळातच धार्मिक [illegible] भारतात सहस्र कोटी देव नांदत[illegible] ब्रह्मा, विष्णु व म[illegible]

की, त्यात आढळणारी विविधता परदेशात अभावानेच आढळेल. प्रत्येकाचे कुलदैवत वेगळे असते. अमुकच एखाद्या देवावर श्रद्धा असू शकते. फार पूर्वीपासून भारतीय स्त्रिया आजही परंपरेला अनुसरून व्रत-वैकल्ये, उपास वगैरे करतात. नवस बोलतात. आपल्या व आपल्या कुटुंबाच्या हितासाठी श्रद्धा ठेवणे ही एक शक्ती झाली, पण ती अंधश्रद्धा असू नये. आपला हितचिंतक आजारी असल्यास त्याचे नातेवाईक डॉक्टरांवर विश्वास ठेवतात व एखाद्या गंभीर आजारातून रुग्ण वाचला तर त्याच डॉक्टराला पूज्य मानले जाते. लोकांना डॉक्टर देवच आहे असे वाटू लागते. होय ! बरेच निःस्वार्थी डॉक्टर ऑपरेशन यशस्वी व्हावे म्हणून देवाजवळ प्रार्थना करतात. एक अदृश्य दैवी शक्ती आपल्या पाठीशी आहे या भावनेने एकाग्रता आणण्याचा प्रयत्न करतात व ऑपरेशन यशस्वी करतात. पण त्यात त्यांची मेहनत, चिकाटी सामावलेली असते व माणुसकीही; पण त्या भावनेत अंधश्रद्धेचा लवलेशही नसतो.

आणि जर अशाच डॉक्टरांच्या हातून जर रुग्ण मरण पावला तर त्याची स्थिती फार लज्जास्पद होते. लोक अशा डॉक्टराला नावे ठेवतात. वेळ आलीच तर रस्त्यावरही आणतात. अशा वेळी देव कुठे असतो ? डॉक्टरांची श्रद्धा उडून जायला वेळ लागत नाही. माणुसकी, नशीब व न्याय यांचा अशा वेळी विसर पडलेला असतो; तर मग एखाद्या डॉक्टराला रस्त्यावर आणणारे लाक सत्तेपायी लाचार झालेल्या नेत्यापुढे का कचरतात ? तेव्हा त्यांचा आत्मविश्वास कुठे जातो ?

माणुसकी जगवायची असेल तर कुठल्याही धर्मात जगवता येते. शेवटी सर्व देव एकच. कुणी त्याला राम म्हणतात, कुणी कृष्ण, कुणी रहिम, अल्ला तर कुणी गॉड ! पण भिन्नरूपी देव शेवटी एकच जो सर्व विश्वात व्यापून राहिला आहे. आणि जर असे असेल तर एकमेकांच्या देवाला, देवस्थानाला नष्ट करण्याची चढाओढ का ? आज बाबरी मशजिद - रामजन्मभूमी वाद इतक्या टोकाला पोहोचला आहे की त्यातून काय निष्पन्न होणार आहे हेच कळत नाही. ज्या ठिकाणी पूर्वी राममंदिर होते तेथे मुसलमानांनी बाबरी मशिद बांधली. तीच मशिद हिंदू धर्माच्या हक्कासाठी जमीनदोस्त करण्यात आली. अगदी परवाच ही गोष्ट आहे. त्यात दिसतो तो हिंदूंचा स्वाभिमान ! पण तरी ह्या सगळ्या प्रकारातून उठलेल्या प्रक्षोभाने समाजात एक ठिणगी पेटली आहे. कधीही कोणत्याही क्षणी पेट घेऊ शकणारी, कदाचित कधीही न विझणारी !

सहिष्णू हिंदू लोक पुन: राममंदिर बांधण्याच्या तयारीला लागले आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यात हजारो कारसेवक एकत्र आले आहेत, पण ते मंदिर कधी पूर्ण होणार कुणास ठाऊक? कारण आमची मशिद पाडली म्हणून मुसलमानांची संघटना राममंदिर पुन्हा उभारू देण्याच्या विरोधात ठामपणे उभे आहेत. त्यात हिंदू-मुसलमान भांडण विकोपाला जाऊन उठणाऱ्या दंगलीत हजारो निरपराध बळी जात आहेत. गोळीबार, बॉंबस्फोट होत आहेत. ह्या भांडणांना अंत नाही. भांडण लावून द्यायला वेळ नाही लागत, पण ते मिटणे, महाकठिण ! शेवटी ना मंदिर, ना मशिद व मधल्या मधे देवांचे (मुख्य - श्रीराम ज्यांचे मंदिर उभारायचे आहे) हाल. त्यात श्रीरामाची पवित्र श्रद्धा व निस्वार्थ भक्ती राहिली बाजूला, पण स्वत:च्या हक्कासाठी कोणी माघार घ्यायला तयार नाहीत !

पूर्वी त्या जागी मंदिर खरंच होते का त्याचा पुरावा किती जणांना ठाऊक आहे ? आणि जरी त्या जागी मंदिर असले तरी आताची सामाजिक परिस्थिती पाहता, मशिद पाडून काय मिळाले ? मात्र घेतले गेले अनेकांचे बळी ! काही विचार करून नसता का प्रश्न सोडवता आला. अगदी मशिदी शेजारी राममंदिर बांधले असते तरी मुसलमानांची हरकत नव्हती.

म्हणजे त्या बाबतीत अमुकच एकाची बाजू घेतली जातेय असे मुळीच नाही. पण समाजाची विचार करून निर्णय घेण्याची वृत्तीच दिवसेंदिवस कमी होत चालली आहे व त्या प्रकारात सरकारलाही जबाबदार धरले जाते . आता लोक सरकारलाही पाडायच्या विचारात आहेत.

इथे देवाची श्रद्धा यापेक्षा अती स्वाभिमान व अंधश्रद्धेचेच सध्या राज्य चालते. स्वतःचा हट्ट कोणीही सोडत नाही.

इथे देवाची जागा मात्र कोणी हिरावून घेऊ शकत नाही. आधीच म्हटल्याप्रमाणे देवावर श्रद्धा असणे पाप नाही; पण अंधश्रद्धा असू नये. तरी जग थोड्याबहुत प्रमाणात नास्तिक होत चालल्याचे दिसून येते. विशेषतः तरुण पिढीत.

परंतु उल्लेख केल्यावाचून राहता येत नाही. अशी अनेक उदाहरणे आहेत की कुठे तरी कधी तरी देवाचे अस्तित्व मनाला पटत असो वा नसो, मान्य करावेच लागते. पूर्वी संतांना देवाचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला. आजच्या कलियुगात देवाची महानता अप्रत्यक्षपणे दृष्टीस पडते. एक उदाहरण डोळयापुढे येते. ३-४ वर्षापूर्वीचीच गोष्ट. अमेरिकेतली एक सत्य घटना ! 'न्यू जर्सी' येथे घडलेली. तेथील एका वस्तीत एका कुटुंबातील एक दोन-अडीच वर्षाची छोटीशी मुलगी आपल्या सवंगड्याबरोबर खेळत होती. खेळता खेळता जवळच असलेल्या एक ट्युबवेल मध्ये ती अचानक पाय घसरून पडली. त्या अरुंद ट्युबवेलमध्ये तिची अवस्था इतकी विचित्र होती की ती अडकूनच पडली. एक पाय अर्धवट वर अशा स्थितीत ती अडकली. आरडाओरडा झाला. सर्व जमले. तिला बाहेर काढण्याचे निष्फळ प्रयत्न झाले.

पण व्यर्थ ! तिच्या आईचा धीरच सुटला. ती धाय मोकलून रडू लागली. फायर ब्रिगेडला बोलावण्यात आले. अखेर ४८ तासांच्या अविश्रांत व शर्थीच्या प्रयत्नानंतर त्या छोटीला बाहेर काढण्यात यश आले. अक्षरशः ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. अनेक वृत्तपत्रकार, फोटोग्राफर वगैरेंची एकच गर्दी झाली. दरम्यान तिची अवस्था फारच नाजूक झाली होती. ती जवळ जवळ बेशुद्धावस्थेतच होती. तिला नलिकेद्वारे द्रवपदार्थ - दूध, फळांचा रस, इ. पुरवण्यात आले होते. बाहेर काढल्यावर नामवंत डॉक्टरांनी तिला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न केले व अखेर सर्वांच्या मेहनतीनंतर तसेच स्वतःच्या जबरदस्त इच्छाशक्तीवर ती छोटी सुखरूप बचावली. ही बातमी तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्षापर्यंत पोहोचली होती. त्यांनी स्वतः येऊन तिची व तिच्या आईवडिलंची भेट घेऊन अभिनंदन केले. खरंच ही घटना सर्वांना थक्क करून सोडते. म्हणतात ना, 'देव तारी त्याला कोण मारी ?' म्हणजे खरंच देव आहे तर !

आणि समजा ही घटना भारतात घडली असती तर ? दुर्लक्षच केले गेले असते. कोणी मनापासून मदतीला धावून आले नसते व अशी छोटी कदाचित स्वार्थाला व भांडणाला बळी पडली असती. कल्पनाच करवत नाही ! तिच्या सुखरूप बचावण्यामागे देवाची कृपा होती हे जरी दिसून येत असले, तरी प्रथम तिची जबर इच्छाशक्ती व तेथील माणसांचे तिला वाचविण्यासाठी अविश्रांत परिश्रम होते, हेही विसरून चालणार नाही.

शेवटी प्रयत्नांती परमेश्वर हेच खरं ! यश हे आपणहून चालून येत नाही. परिश्रम करणाऱ्याला देव नक्कीच मदत करतो. कोणाला पटो वा ना पटो, पण कुठेतरी देवाचे अस्तित्व मान्य करावेच लागते. पण त्यासाठी परिश्रम, माणुसकी, निःस्वार्थीपणा हवा. त्याग करण्याची तयारी हवी. चांगले वागणाऱ्याला देव नक्कीच मदत करतो.

*परमेश्वर अनंत आहे,*
*परमेश्वर अमर आहे,*
*तो सर्वव्यापी आहे !*

पण जे लोक त्याच्या नावाचा दुरुपयोग करून समाजात भांडणे लावून देतात, त्यांच्या हृदयात त्याचा अजून जन्म झालेला नाही ...... !

# शिक्षण सामाजिक विकासाशी निगडित हवे

**शिवाजी बाराते**
द्वितीय वर्ष साहित्य

शिक्षण हे मानवी विकासासाठी मानवी जीवनाचे अविभाज्य अंग झाले आहे. शिक्षणाने विकास होतो. विकासातून नवनिर्मिती होते. जिज्ञासा वाढते व जिज्ञासेमुळे अनेक प्रश्नांची उत्तरे शोधली जातात. त्यामुळे तीच जिज्ञासा मानवाला उपायकारक ठरते. शिक्षणाशिवाय मानवी विकास, वैज्ञानिक वृत्तीची जोपासना, योग्य दिशेने होणारा सामाजिक बदल, तरुणांची होणारी योग्य दिशेकडे वाटचाल ह्या गोष्टी अशक्य आहेत, हे शिक्षणाने भूतकाळात सिद्ध केले आहे. शिक्षणाने समाज सुशिक्षित होतो व सुशिक्षित नागरिक ही देशाची फार मोठी उत्पादक शक्ती आहे. देशात सामाजिक न्याय, राष्ट्रनिष्ठा, समता, राष्ट्रऐक्य या गोष्टींची जोपासना करण्यासाठी आवश्यक अशी परिस्थिती निर्माण करणे शिक्षणाशिवाय अशक्य आहे. शिक्षण हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असे साधन आहे.

आज देशातील शैक्षणिक पद्धती, शैक्षणिक वातावरण पाहता असे लक्षात येते की, शिक्षण सर्व थरापर्यंत पोचविण्याचा आपला प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाला असला तरी उद्दिष्टाधीन माणूस घडविण्याचा आपला प्रयत्न अयशस्वी होत आहे. शैक्षणिक नीतिमूल्यांचा ऱ्हास होत आहे. प्रवेशापासून परीक्षेपर्यंत भ्रष्टाचार चालू आहे. विद्यार्थी हा विद्यार्थी न राहता परीक्षार्थी झाला आहे. त्याचा बौद्धिक, आत्मिक, मानसिक विकास स्थगित झाला आहे. शिक्षणाने ज्या गोष्टी साध्य करण्याचे ठरविले होते, त्या विरुद्ध परिस्थिती निर्माण झाली आहे. या सर्व गोष्टीस आपली कालबाह्य अनुकरणाची, चुकीची अशी शैक्षणिक पद्धती जबाबदार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला एकाच साचेबंद आकृतीत घडविले जात आहे व त्या आकृतीची व्यापकता मार्क मिळविण्याइतकीच मर्यादित आहे. पैशाच्या बळावर मिळणारे शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश, यामुळे शिक्षणाला बाजाराचे स्वरूप आले आहे. तत्त्वहीन, स्वार्थी, राजकारणी व्यक्तींचा शैक्षणिक क्षेत्रावर प्रभाव निर्माण झाला आहे.

शिक्षण ही तपस्या नसून पैशाने विकत घेण्याची वस्तू झाली आहे. या सर्व गोष्टींमुळे विद्यार्थ्यांची शिक्षणावरील श्रद्धाच नष्ट झाली आहे व श्रद्धेशिवाय कोणतेही उद्दिष्ट गाठणे अशक्य आहे. आज देशातील शिक्षकांमध्ये काही अपवाद वगळता शिक्षकांना आवश्यक असणाऱ्या गुणांचा अभाव आहे. त्यामुळे शिक्षकांमध्येच ते गुण नाहीत तर विद्यार्थ्यांमध्ये कसे उतरणार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आजचा विद्यार्थी बेशिस्त, परावलंबी, सार्वजनिक गोष्टींबद्दल अनादर, असा निर्माण होतो आहे. नम्रता, आदर, अभ्यासूवृत्ती, निर्भयता, सहनशीलता, संयम, जिद्द या गुणांचा त्यामध्ये अभाव आहे. जातीवर व धर्मावर आधारित निर्माण होणाऱ्या विद्यार्थी संघटना, अनेक बाबतीत असणारी तटस्थता, वाढती गुन्हेगारी, भोवतालच्या परिस्थितीचे विद्यार्थ्यांकडून होणारे चुकीचे मूल्यमापन हे या गुणाचेच अपत्य आहे. नापास झालो तरी पुढच्या वर्गात प्रवेश द्या ही विद्यार्थ्यांची व्यथा आहे. दरवर्षी वाढत जाणारे वेतन व वाढ न झाल्यास होणारे संप ही शिक्षकाची कथा आहे.

देशातील शैक्षणिक वातावरण इतक्या खालच्या

थराला पोचण्याची अनेक कारणे आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे तत्त्वहीन, चारित्र्यहीन, स्वार्थी व्यक्तींच्या हातात गेलेल्या शैक्षणिक संस्था, शिक्षकांमध्ये असलेल्या गुणांचा अभाव, शैक्षणिक क्षेत्रात शिरलेले राजकारण, दीड दमडीच्या राजकारण्यांनी चालवलेल्या शैक्षणिक संस्था, पाश्चात्य शैक्षणिक पद्धतीचे अंधानुकरण, अनावश्यक गोष्टींचा अभ्यासक्रमामध्ये होणारा समावेश, राजकीय विचारांचा शैक्षणिक क्षेत्रावर होणारा प्रभाव, नैतिक मूल्यांचे झालेले अवमूल्यन, भ्रष्टाचाराने कोलमडून पडलेली शैक्षणिक पद्धती, राजकीय, सामाजिक, आर्थिक तत्त्वज्ञानाचा अयोग्य पाया व या सर्व गोष्टी थांबविण्यासाठी व बदलण्यासाठी आलेले अपयश, बेजबाबदार व्यक्तींची होणारी शैक्षणिक क्षेत्रात नेमणूक या सर्व गोष्टी कारणीभूत आहेत.

एक गोष्ट येथे मुद्दाम नमूद कराविशी वाटते की, महाराष्ट्रात काही संस्थांमध्ये शिक्षणाला बाजाराचे स्वरूप आलले आहे. अपवाद वगळता या सर्व संस्था राजकीय व्यक्ती चालवीत आहेत. त्यांनी शिक्षणाला एक व्यावसायिक स्वरूप प्राप्त करून दिले आहे. बाजारातील वस्तूंचे भाव ज्याप्रमाणे ठरलेले असतात, त्याप्रमाणे तेथे प्रवेश देण्यासाठी पैशाची रक्कम टरत आहे.

कोणी म्हणेल तुमच्याकडे काय पुरावा आहे ? वाईट गोष्टींचे पुरावे मिळत असते तर वाईट गोष्टी घडल्या नसत्या. पुरावे नष्ट करून वाईट गोष्टी केल्या जातात. पुरावे मागणारेच पुरावे नष्ट करीत असतील तर ?

आज समाजाला सर्वांग परिपूर्ण अशा शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाच्या सहाय्याने बौद्धिक, आत्मिक परिपूर्णता येऊन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिकांची जिद्द निर्माण व्हायला हवी. समाजात आत्मनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, चारित्र्यनिष्ठा, समाजनिष्ठा निर्माण व्हायला हवी. असत्याचा बुरखा फाडून सत्यापर्यंत पोचण्याची एक भेदक दूरदृष्टी निर्माण व्हायला हवी. सभोवताली घडणाऱ्या गोष्टींचे योग्य मूल्यमापन करून त्यावर योग्य ती प्रतिक्रिया निर्माण व्हायला हवी. त्यात आपली भूमिका काय आहे, याचे प्रत्येकाने भान ठेवून आचरण करायला हवे. प्रत्येकाला वास्तवाचे ज्ञान व्हायला हवे व तो कल्पनांच्या मागे न धावता वास्तवाला सामोरे जाण्यास शिकला पाहिजे. साध्य कितीही उच्च असले तरी ती गाठण्यासाठी वापरण्यात येणारी साधने तितकीच उच्च, निष्कलंक, निरुपद्रवी असावीत. याची प्रत्येकाला जाणीव व्हायला हवी. व्यक्ती - व्यक्ती, धर्म-धर्म, जाती-जाती यामधील दरी नष्ट होऊन समाजात सुसंवाद निर्माण व्हायला हवा. पैशामुळे बरेच काही मिळत असले तरी मानवाचे अंतिम उद्दिष्ट पैसा नाही. माणसासाठी पैसा आहे, पैशासाठी माणूस नाही याची प्रत्येकाला जाणीव करून द्यायला हवी. कालबाह्य धर्मसंकल्पनांचा पगडा नष्ट व्हायला हवा. मूल्यमापनाच्या सहाय्याने परिस्थितीअनुरूप अशा नव्या संकल्पना निर्माण व्हायला हव्यात. शिक्षण हे समाज-परिवर्तनाचे फार मोठे महत्त्वाचे माध्यम आहे. पण हे माध्यम सामाजिक विकासाशी निगडित असायला हवे. शिक्षणाने आम्हाला अंधारातून प्रकाशाकडे, अपूर्णत्वाकडून पूर्णत्व गाठण्याचा प्रयत्न करता येईल. अशा मार्गावर असत्याकडून सत्याकडे, अगतिकतेकडून कृतीशीलतेकडे, अन्यायाकडून न्यायाकडे तसेच स्वावलंबनाबरोबर स्वाभिमानाकडे, अधिकाराबरोबर कर्तव्याकडे न्यायला हवे. असे शिक्षण सर्व काही करू शकते. पण ते शिक्षण योग्य साधनाद्वारे, योग्य व्यक्तीकडून योग्य व्यक्तीकडे, योग्य वेळेवर संक्रमित व्हायला हवे व ती संक्रमण क्रिया निरपेक्ष असायला हवी.

# जाहिरातीची कला

**गीतांजली अरुण कोटलकर**
अकरावी वाणिज्य

माणूस हा सर्व प्राण्यांत अतिशय बुद्धिमान म्हणून ओळखला जातो. अशा या मानव प्राण्यात विविध कलागुण असणे साहजिकच आहे. कला या विविधअंगी तसेच चांगल्या किंवा वाईट अशा दोन्ही प्रकारच्या असू शकतात. आपल्यामध्ये विशिष्ट प्रकारचा गुण असणे व त्याला विशिष्ट साचा व वळण लागणे यालाच कला म्हणता येईल. काहींना चित्रकला अवगत असते, तर काहींना संगीतकला. याखेरीज आवाज, शब्दरचना, लेखन, काव्य अशा विविध कला आपणास माहीत आहेतच. पण या सर्वांचा सुंदर संगम कोणता असेल तर तो म्हणजे "जाहिरातीची कला !"

जाहिरातीची कला ही सध्या सर्वमान्य आहे. ही पासष्टावी कला मानली जाते. वास्तविक पाहता मूळ ही जाहिरातच, हळू-हळू ही जाहिरात-कलेच्या रूपाने नावारूपाला आली. या जाहिरातीचे प्रकारही अगणित आणि विचित्र आहेत. बोलकी जाहिरात, मुकी जाहिरात, लेखी जाहिरात, चित्रमय जाहिरात — एक ना अनेक ! देशात ज्या विविध वस्तूंचे उत्पादन होते, त्यांचा जास्तीत जास्त खप होण्यासाठी जाहिरात हा प्रकार उदयास आला. पण सध्या त्यांचे स्वरूप इतके विशाल झाले आहे की, जनतेला द्यावयाचे संदेशही जाहिरातींच्या रूपात दिले जातात. या जाहिरातींचा अतिरेक होत चाललाय. प्रमाणबद्ध जाहिरातींचा सुळसुळाट होत चाललाय. जिथे बघावे तिथे जाहिरातीच जाहिराती. रेडिओ किंवा दूरदर्शन, एवढेच नव्हे तर एस्. टी., बस, त्यांचे थांबे, रेल्वे, रेल्वेस्टेशन्स, दुकाने अगदी घरांच्या भिंतीदेखील ! आपण म्हणतो की सध्याचे युग हे जाहिरातींचे युग आहे. म्हणूनच की काय हल्ली घरोघरी हा चर्चेचा विषय आहे. एखाद्या घरामध्ये जाऊन पाहिले तर तेथील टी. व्ही., कपाटे, आरसे, भिंती सर्वच वस्तू जशा काही जाहिरातींचे प्रदर्शनच करतात. एक म्हणजे एका विशिष्ट कंपनीच्या त्या वस्तू असतात आणि ते कमी की काय म्हणून निरनिराळ्या जाहिरातींची कात्रणे, (अर्थात पेपर, मासिक यांमध्ये छापून आलेली) स्टीकर आणि अनेकविध रंगाढंगातील चित्रे लपवलेली असतात. त्यांची रचना तर एखाद्या प्रदर्शनाला लाजवेल अशी असते.

'नवे ते हवे' ही सर्वसाधारण माणूसप्राण्याची नेहमीच सवय असते. मग बाजारात उपलब्ध होणारी प्रत्येक नवी वस्तू का नाही खरेदी करणार ? त्याच्या या गुणाला वाट मिळते ती जाहिरातींच्या रूपाने. प्रत्येक जाहिरात ही आपापल्या परीने प्रत्येक व्यक्तीवर चांगला किंवा वाईट प्रभाव पाडत असते. "केवळ पाँच दिनों में आपकी त्वचा निखर आए" (अर्थात हे सर्व . . . ) झाले ! दुसऱ्या दिवशी तरुण तरुणींच्या घरोघरी त्या क्रिम्स, पावडर, लिपस्टिक्स आणखी अनेक सौंदर्यप्रसाधने येऊन पडतात. (तिसऱ्या दिवशी परिणाम दिसतोच) एखाद्या सिनेमाची रेडिओवर जाहिरात ऐकली की, 'चित्रपट चालेल की पडेल हे आगोदरच निश्चित होते. ज्या जाहिराती लोकप्रिय होतात, त्या वस्तूंचा खप अर्थातच वाढतो. मग जाहिरातीद्वारे साधला जाणारा हेतू संपन्न होतो. दूरदर्शनवर आपला आवडता चित्रहार पाहावयाला (वेळात वेळ काढून) आपण बसतो व त्यावेळी जेव्हा जाहिरातींचाच हार आपल्या गळयात पडतो, तेव्हा मात्र आपण अर्थातच चिडतो व जाहिराती कडू वाटायला लागतात. आपण त्यांचा द्वेष करतो. मग त्या वस्तूवरील परिणाम माहीतच आहे. अशा रीतीने व्यावसायिकांच्या या व्यवसायावर अनेक प्रकारचा परिणाम होतो. फायदे-तोटे अनुभवास येतात.

पण याचा ग्राहकावर काय परिणाम होतो, याचा कधी विचार केलाय ? आजकाल ज्या वस्तू विक्रीसाठी बाजारात येतात, त्या १०० टक्के खऱ्या कशावरून असतात ? नाहीच

ना ! पण तरीदेखील "आपण नाही बुवा जाहिरातींच्या आहारी जात." असे म्हणणारी भली भली माणसेसुद्धा आकर्षणापायी त्याला बळी पडतात. आपले आवडते सिनेतारका एखाद्या विशिष्ट वस्तूची जाहिरात करू लागताच आपणाला मोह होतो. कपिलदेव "पामोलिव का जवाब नही !" असे म्हणताच आपण देखील त्याच्याच सुरात "कपिलदेव का जवाब नही" म्हणत ती क्रीम घेणारच ! 'डाबर आवला' श्रीदेवी लावते असं दिसल्यावर "मी देखील श्रीदेवीचे डाबर आवला कालच आणले." अशी वाक्ये कानावर पडायला वेळ लागत नाही. मग भले कालच्या डाबर आवलाने आज-उद्या केस गळायला लागले तरी हरकत नाही. का कोण जाणे पण तरुण पिढीवर या जाहिरातींचा फार मोठा प्रभाव असतो. मग त्यांची केशभूषा, वेशभूषा, वागण्या-बोलण्याच्या पद्धती सारे काही जाहिरातीयुक्त होते.

बालपिढीवरही त्याचा अमल असतो. लहान मुलांना गणितातील 'एक दोन तीन'पेक्षा प्रावडरच्या जाहिरातीतील 'एक, दोन... ' चांगले पाठ होतात. मराठी उत्तमरीत्या अवगत नसलेला (परंतु मराठीच !) मुलगा इंग्रजीतील जाहिराती न चुकता, ओळन् ओळ अगदी खाडखाड (इंग्रजी वंशज असल्यासारखा) बोलून दाखवतो. त्याही अगदी तालासुरात ! गाण्याच्या तासाला घातलेली मुलगी शास्त्रीय संगीताऐवजी 'विको टरमरी ......' कशी म्हणते बघा. तबल्याचे शिक्षण नसले तरी, जाहिरातींच्या तालावर बाके, खुर्च्या, टेबले अगदी व्यवस्थित वाजवले जातात. रस्त्याने एखादा लहान मुलगा चालला की त्याला एखाद्या दुकानाचा पत्ता विचारा , " काका, मला त्या दुकानचे नाव 'परफेक्टली ' माहीत नाही, पण ती कोलगेटची 'ॲडव्हरटाइज' आहे ना तिथे बघा !" हे उत्तर वास्तविक त्या काकांना परिचित असतेच. शाळा-कॉलेजमध्ये त्या ऐकायला मिळतात. बसच्या रांगेत उभे राहा, जाहिरात ! रेल्वेमध्ये बसायला जागा नसेल तरी चालेल पण जाहिरात म्हणून दाखवताना माझा आवाज डब्यातील शेवटच्या माणसापर्यंत गेला पाहिजे ही दक्षता तरुण प्रवासी नक्कीच घेतात. महाविद्यालयातील स्नेहसंमेलनप्रसंगी 'फिशपॉन्ड' नावाचा विद्यार्थीप्रिय खास कार्यक्रम असतो. त्यात देखील 'आपके काले, घने, लंबे बालों का राज ?" असा एखादा गोड फिशपॉन्ड एखाद्या मुलीवर पडतोच. जमाना नवीन आहे. त्यामुळे ती मुलगी 'ब्राम्ही आंवला केश तेल' एवढे म्हणायला सुद्धा कमी करणार नाही.

सध्याचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. जाहिरातींच्या बाबतीतदेखील हे तितकेच खरे आहे. कारण पहिली गोष्ट म्हणजे व्यावसायिक, दुसऱ्यापेक्षा आपणाला वरचढ ठरविण्यासाठी या जाहिरातींवर लाखोंनी खर्च करीत असतात. दुसरे म्हणजे ग्राहक शेजाऱ्यांकडे जर एका विशिष्ट कंपनीची वस्तू असेल; तर आपणाकडेही त्यापेक्षा जास्त वरचढ वस्तू कशी आणता येईल याचा ग्राहक विचार करीत असतो. पण त्यात त्याची फसवणूक किती होते याचा तो विचार करीत नाही. ज्या वस्तूमुळे नुकसान होते, तीच वस्तू जाहिरातींच्या प्रभावामुळे दहा रुपयाऐवजी शंभर रुपयांनादेखील घ्यायला तो तयार होतो. अशा वेळी खरं पाहता त्याची सुबुद्धता उफाळून यायला पाहिजे; पण तसे होत नाही.

हा सर्व झाला जाहिरातींच्या फायद्यातोट्याचा विचार, पण जेव्हा आपण या जाहिरातीकडे कलेच्या दृष्टिकोणातून पाहतो, तेव्हा आपल्या मनात प्रथम विचार येतो तो म्हणजे या जाहिराती बनवतात कोण ? खरोखरच जे या जाहिराती बनवत असतील, ते आपल्यापेक्षा नक्कीच वरचढ असतील. कारण एक तर जे दूरदर्शन किंवा रेडिओवरील जाहिराती रचतात, त्यांची कल्पनाशक्ती कितीतरी सुंदर असते. जे जाहिरातींचे फलक रंगवतात, त्यांची चित्रकला व पेंटिंगदेखील छान असते.

आपण दूरदर्शनवर ज्या जाहिराती पाहतो, त्यामध्ये कामे करणाऱ्या व्यक्ती काही वेळी आपल्याला आवडतात तर कधी नावडतात. आपण बसल्या जागेवरून दोनच कामे करू शकतो. एक म्हणजे त्यांना नावे ठेवणे व दुसरे म्हणजे प्रशंसा करणे. यामुळे त्यांना फरक पडत नाही. त्यांना आपले काम जास्तीत जास्त चांगले करण्यासाठी किती तरी परिश्रम घ्यावे लागतात. ते अधिक परिश्रम घेत असतात. जरी आपण त्यांना चांगले किंवा वाईट म्हटले तरी देखील.

आजकाल जिकडे तिकडे जाहिरातींचे स्तोम माजले असले तरी देखील आपण त्यांच्याकडे एक कला म्हणून पाहावे, त्याला उत्तम दाद द्यावी, पण आहारी मात्र जाऊ नये.

# मी केलेला प्रवास

**निशीगंधा नारायण डोणकर**
प्रथम वर्ष शास्त्र

भटकंती हा माणसाचा छंद आहे. नाविन्याची ओढ प्रत्येकास असते. काहीतरी नाविन्यपूर्ण पाहावयास मिळावे असे प्रत्येकास वाटत असते आणि अर्थात मीही त्याला अपवाद नाही. काही तरी वेगळे, अद्‌भुत असे नवीन पाहायला मिळेल, या हेतूनेच मी अजंठा-वेरूळ पाहावयास गेले.

प्रवास अगदी छान झाला. मैत्रिणींबरोबर गप्पा मारत असताना एवढंच जाणवत होतं की, आपण कुठल्या तरी मूर्ती पाहाणार आहोत की ज्यांच्याविषयी आपण ऐकलंय किंवा पुस्तकात ज्यांची चित्रं पाहिली आहेत. मैत्रिणींच्या गोंधळातून थोडंसं बाहेर पाहिले तर काय, एक छोटासा निळा ठिपका दिसू लागला. जवळ गेल्यावर लक्षात आलं की, निळ्याशार पाण्याचे ते एक तळे होते. ते पाहिले आणि वाटले हे तळे नाहीच, जणू पृथ्वीसारख्या रमणीस दृष्ट लागू नये म्हणून परमेश्वराने कोरलेला तीळच आहे जणू ! या आणि अशाच सुंदर गोष्टी पाहात शेवटी मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचलो.

भारतात अनेक आश्चर्ये आहेत आणि ही आश्चर्ये मानवानेच निर्माण केली आहेत. अजंठा अन वेरूळ या ठिकाणांना जागतिक आश्चर्ये का म्हणतात, हे मी ती ठिकाणे पाहिली आणि जागतिक आश्चर्ये या शब्दाची व्याख्या समजली. प्रचंड काळ्याकभिन्न पाषाणांमध्ये कोरलेल्या मूर्ती पाहिल्या आणि डोळे धन्य झाले ! तेथे असलेल्या स्त्री-पुरुषांच्या मूर्ती पाहिल्या, की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, त्या काळी समाजामध्ये असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्या वेळी स्त्री-पुरुषांचे शरीरसौष्ठव कोणत्या प्रकारचे होते याचेही ज्ञान मिळाले.

'मॅचिंग' हा शब्द आपणास नवीन नाही. आम्हा स्त्रियांमध्ये तर मुळीच नाही. परंतु हा शब्द आताच रूढ झालाय असं मात्र नाही. ही परंपरा अगदी पूर्वीपासून चालू आहे. तेथील भिंतींवरील चित्रं पाहिली आणि खात्री पटली. तेथे काढलेल्या स्त्रियांची आणि पुरुषांच्या वस्त्रांची रंगसंगती पाहिली आणि चित्रकाराच्या चाणाक्षपणाची साक्ष पटली. अत्यंत सुंदरपणे त्यांनी वस्त्रांची रंगसंगती रेखाटली आहे. त्यामुळे हेच दिसून येते की, त्या काळीही चित्रकार इतकी सुंदर रंगसंगती जाणत होते. ज्याला आपण आता 'मॅचिंग' म्हणतो, ती मॅचिंगची परंपरा अगदी पूर्वीपासून चालू आहे.

आणखीन एक गोष्ट प्रकर्षानं लक्षात आली. तिथे ज्या मूर्ती निर्माण केल्यात, त्या प्रत्येक मूर्तीवरील कोरलेले अलंकार खूपच विविध प्रकारचे आहेत. प्रत्येक अलंकाराची जडणघडण वेगळी आहे. त्यांनी केलेली केशभूषा, त्याही नानाविध प्रकारच्या. या विविधतेवरून त्या महान कलाकारांच्या कल्पनाविश्वाची कल्पना येते. त्यांच्या मनात ज्या नाना, विविध कल्पना होत्या, त्याच त्यांनी मूर्तीरूपाने जिवंत केल्या. भगवान बुद्धांच्या मूर्ती आणि त्यांच्या जीवनावर आधारित असलेले आणि रेखाटलेले काही चित्रप्रसंग अगदी अप्रतिम आहेत. त्यामुळे भगवान बुद्धाच्या जीवनाविषयी माहितीही मिळते, आपल्या भारतीय संस्कृतीचे दर्शनही होते आणि ते निश्चितच सुखावह होते. अत्यंत प्रचंड मोठ्या शिळांमधून निर्माण केलेल्या प्रचंड मूर्ती आणि अगदी लहान मूर्ती, दोन्हीही सुंदर होत्या. ते पाहून मन आणि डोळे दोन्हीही तृप्त झाले.

शून्यातून विश्व निर्माण करावे त्याप्रमाणे एवढ्या प्रचंड दगडांमधून मूर्तरूपाने जिवंत केलेले विश्व खरोखरच अप्रतिम आहे. आणखी एक गोष्ट लक्षात आली. आता या

स्वार्थी जगात माणूस प्रत्येक गोष्ट स्वार्थासाठी करतो. अगदी लहानसे चित्र रेखाटले तरी मनुष्य स्वतःचे नाव कोपऱ्यात कोठेतरी लिहितोच. माणसाची प्रत्येक कृती स्वार्थासाठी असते. ती करण्यामागे त्याचा काहीतरी उद्देश असतो. कुणाला पैसा हवा असतो; तर कुणाला प्रसिद्धी हवी असते. पण एवढी प्रचंड लेणी ज्यांनी निर्माण केली, त्यांचा मात्र नामनिर्देश कुठेच आढळला नाही ! आणि वाटलं, ज्या लोकांनी या लेण्यांचे निर्माण फक्त लौकिकासाठी न करता, मानसिक समाधानासाठीही केले असेल, तर ते खरोखर किती महान असतील ! परंतु आपण मात्र त्यांच्या पुढे किती लहान आहोत कीर्तीने, विचाराने आणि बुद्धीनेही.

खरे तर फक्त गंमत म्हणून मी या सहलीस गेले होते. पण एवढे काही मी पाहिले आणि मनात साठवले, जे मी कधीही विसरणार नाही. या प्रवासानंतर माझ्या विचारात आलेली प्रगल्भता माझी मला जाणवू लागली आणि नंतर कुठलाही प्रवास मी गंमत म्हणून न करता, काही तरी नवीन पाहावयास मिळेल या हेतूने केला. ज्या प्रवासामुळे माझ्यात एवढा बदल झाला, तो माझ्या आयुष्याच्या वाटेवरील हा सुखद प्रवास मी कधीही विसरणार नाही.

## धागे

मनी जतन केलेत अजूनही ते धागे
काही सुखाचे तर काही दुःखाचे
काही आसवांत चिंब भिजलेले
तर काही हास्यात तळाशी बुडालेले
आहेत काही या जन्मीच्या मैत्रीचे
तर आहेत काही जन्मोजन्मीच्या ऋणानुबंधांचे
आहेत काहींवरती कवचकुंडले तिच्या प्रेमाची
साठली आहेत काहींवरती पुटं माझ्या व्यथेची
हव्याहव्याशा नकोनकोशा वाटणाऱ्या त्या आठवणी
गुंफलेल्याच आहेत एकमेकांत अजुनी
काही झालेत दुःखाच्या ओझ्याने जीर्ण
तर काही झालेत प्रेमाच्या शिडकाव्याने उल्हासित
जरी हे सर्व " असे " असले तरी
काहीच धागे सुखाचे बाकी धागे दुःखाचे

**बिपीन र. इनामदार**
कला, प्रथम वर्ष

## शोध

हे परमेश्वरा ! तू इतका जवळ असूनही दूर का आहेस ?
मी हाक मारूनही तू अदृश्य कसा आहेस ?
सेवा, धर्म, सत्य, अहिंसा
ह्या तुझे दर्शन घडविणाऱ्या वाटा आहेत;
पण आज प्रत्येक जण ते विसरून
तुला नयनांनी शोधण्याचा निरर्थक प्रयत्न करीत आहेत !
तू कोणाच्या मनात राहिला नसून
मनाच्या नाटकात तात्पुरता राज्य करीत आहेस.
परमेश्वरा ! हे परमेश्वरा ! तू इतका जवळ असूनही दूर
का आहेस ?
मी हाक मारूनही तू अदृश्य कसा आहेस ?

**पौर्णिमा अ. काळे**
प्रथम वर्ष, विज्ञान

# मुलाखत - सुभाष पुरी ( खेळाडू )

मनस्विनी गिरीश प्रभुणे
बारावी, कला

१९९२ या वर्षी जगात महत्त्वाच्या घटना घडल्या. काही चांगल्या काही वाईट. क्रीडारसिक ज्याची आतुरतेने वाट बघत असतात, अशी ऑलिम्पिक स्पर्धा ही होऊन गेली. बार्सिलोनाला या वर्षी ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या. तिथेच अपंग खेळाडूंची स्पर्धा झाली. काही जणांना तर माहिती नसते, की अपंग खेळाडूंचेही ऑलिम्पिक असते. या वर्षी ऑलिम्पिक मध्ये पुण्याचे एक खेळाडू खेळून आले आहेत. त्यांचं नाव श्री. सुभाष श्रीकृष्ण पुरी. श्री. सुभाष पुरी यांनी भालाफेक, थाळीफेक, पाचशे व आठशे मीटर धावणे, बुद्धिबळ अशा अनेक खेळांतून प्राविण्य मिळविले आहे. आपण नेहमीच वेगवेगळ्या खेळाडूंचे अनुभव वाचत असतो. तसेच श्री. पुरी यांना आलेले अनुभव, त्यांच्याबद्दलची माहिती आपण जाणून घेणार आहोत.

मी श्री. सुभाष पुरी यांच्या घरी मुलाखत घेण्यास गेले असता त्यांनी मिळवलेली बक्षिसे नजरेस पडली. यावरून असे समजते की, ते लहानपणापासूनच या क्षेत्राकडे वळले असावेत. त्यावरूनच माझा पहिला प्रश्न सहाजिकच हा होता :

***तुम्ही या क्षेत्राकडे कसे वळलात ?***

मी शाळेत असतानाच या क्षेत्राकडे वळलो. माझे शिक्षण आकुर्डी येथील शाळेत; तर महाविद्यालयीन शिक्षण मॉडर्न कॉलेजमध्ये झाले. शाळेत असताना मी आंतरशालेय स्पर्धांमध्ये भाग घेत असे. अनेक बक्षिसेही मिळवली. इयत्ता आठवीत असताना मी शारीरिक क्षमता चाचणी दिली होती. मला 'स्टार पदक' मिळालं. इथूनच माझ्या क्रीडाजीवनाला सुरुवात झाली. आकुर्डीच्या समाजसेवा केंद्रामार्फत मी एका महिन्याच्या प्रशिक्षणाला महाराष्ट्र मंडळात गेलो. तिथे शिवरामपंत दामले यांच्याकडून चांगले मार्गदर्शन लाभले. अशा प्रकारे माझ्या अंगातला खेळाडू आकार घेऊ लागला.

***तुम्हाला अपघात कसा झाला ?***

कॉलेजमध्ये असताना हा अपघात झाला. तेव्हा मी रोज लोकलने कॉलेजला जायचो. रेल्वेमधून पडलो आणि एक हात गमावून बसलो. तेव्हा मी बी. एसस्सीच्या द्वितीय वर्षाला होतो. एक हात गेल्याने माझा तर सगळा आत्मविश्वासच नाहीसा झाला. कॉलेजमधील प्रोफेसर, प्राचार्य यांनी धीर दिला. परंतु तरीही माझ्या मनात कुठेतरी ते दुःख होतेच. कॉलेजच्या बास्केटबॉल संघात मी होतो. हात गेल्याने तो खेळ सोडून द्यावा लागला. मग मी विज्ञानशाखा सोडून दिली आणि कला शाखेत प्रवेश घेतला. 'राज्यशास्त्र' घेऊन बी. ए. झालो. बी. ए. करत असतानाच मला पुणे महानगरपालिकेत नोकरी मिळाली.

***ही नोकरी तुम्हाला शैक्षणिक पात्रतेवरून मिळाली, की खेळाडू म्हणून मिळाली ?***

शैक्षणिक पात्रतेनुसार ही नोकरी मिळाली, खेळाडू म्हणून नाही. मला जरी हा अपघात झाला तरी मी माझ्या रोजच्या सरावाने काही अडथळा निर्माण होऊ दिला नाही. अजूनही रोज पर्वती ४ ते ५ वेळा पळत चढतो. उतरतो. मनात कुठेही अपंगत्वाची भावना ठेवलेली नाही.

***बार्सिलोना ऑलिम्पिकसाठी तुमची निवड कशी झाली ?***

एकंदरीत माझ्या कारकीर्दीवरून आणि कलकत्ता येथे बार्सिलोनाला जाण्यापूर्वी राष्ट्रीय स्पर्धा होत्या. त्या स्पर्धेत मी तीन सुवर्णपदकं मिळवली. यावरून माझी निवड झाली.

***आतापर्यंत तुम्ही कोणकोणत्या स्पर्धेत, किती बक्षिसे मिळवली ?***

जिल्हास्तरीय स्पर्धेत अनेक बक्षिसे मिळवली आहेत. राज्यस्तरीय स्पर्धेत एकूण १५ ते १६ बक्षिसे मिळवली आहेत. या वर्षी झालेल्या राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत ३ सुवर्ण, २ रौप्य, ३ कांस्य अशी पदकं मिळवली आहेत.

***बार्सिलोनाला जाताना तुम्हाला आलेले बरे वाईट अनुभव सांगा.***

बार्सिलोनाला माझी निवड झाली हे कळल्यावर आनंद तर खूपच झाला; परंतु माझ्यासमोर एक समस्या उभी राहिली ती म्हणजे आर्थिक समस्या. ऑलिम्पिकमध्ये नुसती प्रवेश फी ५६,५०० होती. आणि बाकीचा खर्च तर वेगळाच. एवढी मोठी रक्कम कुठून उभी करणार ? एरवी दान करणारे हात ऐन वेळेस कुठेही दिसेनासे झाले. सगळा वेळ तर पैशांची जमवाजमव करण्यात जाऊ लागला. माझ्या बरोबर ऑलिम्पिकला निवडले गेलेल माझे खेळाडू सहकारी बार्सिलोनाला रवाना झाले. तरी मांझी काही व्यवस्था होईना. मग मी संरक्षणमंत्री शरद पवार व मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांना जाऊन भेटलो. माझ्या अडचणी सांगितल्या. त्यांनी माझी अडचण समजून घेऊन मला मदत करण्याचे कबूल केले. युनियन बँकेनेही मदत कबूल केली. पण त्यांनी अट घातली की त्यांच्या बँकेच्या नावाचा बॅच लावून खेळायला उतरायचं. अखेर मला ते मान्य करावे लागले. श्री. पवार व श्री. नाईक, युनियन बँक व इतर लोकांच्यामुळे मी ऑलिम्पिकला जाऊ शकलो. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

***बार्सिलोनातील तुमच्या कामगिरीबद्दल माहिती सांगा.***

माझ्या अपेक्षेपेक्षा माझा खेळ खूपच वाईट झाला. मी काहीच बक्षिस मिळवू शकलो नाही. मनात तर सुवर्णपदकाची अपेक्षा होती; पण ते काही मिळवू शकलो नाही.

***पदक मिळवू शकला नाहीत याबद्दल काय वाटतं ?***

आर्थिक अडचणींची सोडवणूक करताना सरावाकडे दुर्लक्ष झाले. अगदी विमानात पाय ठेवेपर्यंत माझे जाणे निश्चित नव्हते. स्पर्धा जवळ आली तरी खेळाडूंच्या याद्या प्रसिद्ध होत नाहीत. त्यामुळे खेळाडूला सराव करता येत नाही. आपली निवड झाली आहे हे कळल्यावर एक जबाबदारी असते. आणि नेहमीपेक्षा जास्त सरावाला आपण लागतो. दुसरं म्हणजे खेळाडूंचे कसे हाल होतात हे तुला मी आत्ताच सांगितलं. आणि जरी हे सगळं असलं तरी चांगलं क्रीडांगण असणं जरूर असते. इथं आपण साध्या ट्रॅकवर सराव करतो. आणि एकदम स्पर्धेत चांगल्या सिंथेटिक ट्रॅकवर धावावे लागते. या अशा बाबतीत आपण मागे पडतो, असं मला वाटतं. माझ्या अपयशाला ही सगळं कारणं थोड्या फार प्रमाणात जबाबदार आहेत.

***तिकडच्या क्रीडा विषयक धोरणात व खेळाडूंमध्ये व आपल्याकडील खेळाडू व धोरणात काय फरक जाणवतो ?***

हो तर, फरक जाणवतोच. तिकडे परदेशात खेळाडूला त्याच्या खेळाबद्दल पगार, पैसे मिळतात. त्याने फक्त खेळावर लक्ष केंद्रित ठेवावे ही त्याच्याकडून अपेक्षा असते. फक्त खेळाशीच संबंधीत असावे. दुसरीकडे कुठेही नोकरी करू नये. अशा धोरणानेच ते जास्त यशस्वी होतात. आपल्याकडे उलट परिस्थिती आहे. खेळाडू हा फक्त खेळाडू म्हणून जगू शकत नाही. त्याला काही तरी उपजीविकेसाठी वेगळा मार्ग निवडावा लागतो. त्यामुळेच त्याचा दिवसातला

जास्त वेळ कामात आणि कमी वेळ सरावात जातो. खेळाडू हा फक्त स्पर्धा जवळ आल्यावर सराव करायला लागतो असे दिसते, त्यामुळेच तर आपले खेळाडू अयशस्वी होतात. उदाहरणच द्यायचं झालं तर, प्रसिद्ध ऑलिम्पिक कुस्तीपटू, कांस्य पदक विजेते श्री. कै. खुशाबा जाधव ह्यांचं घ्या ना. ह्यांनी फक्त कुस्तीसाठी आपले आयुष्य घालविले; पण त्यांची परिस्थिती काय होती. आजारी पडले तेव्हा औषधोपचाराला पैसे नव्हते. त्यांना घर दिले गेले (फक्त नावावर, प्रत्यक्षात नसलेले) पण ते सुद्धा त्यांच्या मृत्यूनंतर राज्य सरकारकडून काढून घेतले गेले. त्यांच्या बायकोला अजूनही पेन्शंन मिळत नाही. मुलांना कुठेही नोकरी नाही, अशी अवस्था त्यांच्या कुटुंबाची झाली.

***बार्सिलोनातील अनुभवाबद्दल सांगा.***

तिकडचे प्रेक्षक खरोखरच फार उत्साही आहेत. त्यांना प्रत्येक खेळाबद्दल उत्सुकता असते. आमचं स्वागतही असंच उत्साही वातावरणात झाले. "अपंगांचं ऑलिम्पिक" आहे असं वाटलंच नाही. इतके प्रेक्षक जमले होते की, त्यांची गणनाच करता येणार नाही. असे वातावरण मी आयुष्यात पहिल्यांदाच बघितले. जीवनातला अत्यंत आनंदाचा क्षण होता तो !

***तुम्ही भविष्यात काय करायचं ठरवलंय ?***

भरपूर खेळायचं, आपल्या खेळाशी निष्ठावान राहायचं. मला अजून यशस्वी बनायचंय. ही तर सुरुवात आहे. पुढे अपंग खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचा विचार आहे. त्यानुसार आत्तापासूनच कामाला लागलोय. अपंग क्रीडा पुनर्वसन संस्था, तसेच या संस्थेच्या इंडियन कौन्सिलचा मी सदस्य आहे.

***नवोदित खेळाडूंना काही संदेश द्या !***

जीवनात कितीही संकटे आली तरी त्याला सामोरे गेले पाहिजे. आपल्या खेळाशी कायम निष्ठावान राहिले पाहिजे. आपला खेळ चांगला व्हावा याचाच सतत प्रयत्न केला पाहिजे. बस इतकंच.

खरंच या तरुण खेळाडूचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. हा खेळाडू आता यशस्वी कारकीर्द करायला लागलाय. आता त्याच्याकडे सर्वांचे लक्ष जायला लागले आहे. जसं सूर्याच्या प्रकाशात ध्रुव तारा दिसत नाही; परंतु रात्री आपल्या प्रकाशाने सर्वांचे लक्ष आकर्षून घेतो. त्याप्रमाणे श्री. पुरींकडे आता बघायला लागली आहेत. पूर्वीची माणसं बदलली आहेत.

श्री. पुरींना खेळाव्यतिरिक्त इतरही छंद आहेत व ते वेळात वेळ काढून आत्मसात करतात. श्री. पुरींना ट्रेकिंगचे वेड आहे. ते गोल्ड ट्रेकर्स व सह्याद्री व्हेंचर्सचे सभासद आहेत. अनेक गिर्यारोहण मोहिमा आपल्या नेतृत्वाखाली त्यांनी काढल्या आहेत. महाराष्ट्रातील व बाहेरील सर्व किल्ले चढून झाले आहेत.

'फोटोग्राफी' हा त्यांचा एक आवडता छंद आहे. गिर्यारोहणाने निसर्गाशी जवळचा संबंध येऊन, सुसंवाद साधता येतो असे त्यांचे मत आहे. आणि त्याचाच उपयोग ते आपल्या छायाचित्रात करतात. वेगवेगळी मोहक छायाचित्रे त्यांनी आपल्या कॅमेऱ्यातून टिपली आहेत.

नाटकांची त्यांना आवडही आहे. शाळेत असताना एका नाटकातील भूमिकेबद्दल उत्तम अभिनयाचे बक्षिसही मिळवलेले आहे.

१० वी ला शाळेत सर्व मुलांमध्ये सर्वप्रथम येण्याचा मानही त्यांनी पटकावला आहे. अशा खेळाडूचे सत्कार विविध ठिकाणी केले जात आहेत. नुकताच 'पोलिस दिन' दिवशी पोलिस उपआयुक्तांकडून सत्कार करण्यात आला.

असं हे वेगळं व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणादायी व मार्गदर्शनीय ठरेल. श्री. सुभाष पुरींना त्यांच्या उज्ज्वल भविष्याबद्दल आपण शुभेच्छा देऊ.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

एस. आर. गायकवाड
एम. कॉम. भाग - १

१४ एप्रिल १८९१ ला भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. हा दिवस, ही जन्मतारीख म्हणजे भारताचे भवितव्य घडविणारा एक अत्यंत रोमहर्षक क्षण मानावा लागेल. आई भीमाबाई व वडील रामजी संकपाळ यांना प्राप्त झालेले हे पुत्ररत्न पुढे भारतरत्न म्हणून देशाची शान वाढवेल हे त्या वेळचे भाकित खरे ठरले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या चाळीस वर्षात, आज दलित समाज ज्या एका विशिष्ट टप्प्यावरती ताठ मानेने व स्वाभिमानाने उभा आहे, त्याचे सारे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषाकडे जाते. गेल्या दशकापासून अतिशय वेगाने फोफावलेल्या दलित चळवळीची मूळ बिजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात व शिकवणुकीत रोवली गेलेली आहेत. अस्पृश्यांचे महान नेते व दलितांचे कैवारी असलेले बाबासाहेब हे खरोखरच तत्कालीन सामाजिक परिस्थितीमध्ये देखील दलित व दीनदुबळ्यांचे आधारस्तंभ होते व आजही त्यांच्या विचारांपासून दलित समाज दूर गेलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचे विश्लेषण करायचे म्हटले तरी त्याला मर्यादा पडतील इतके ते अमर्याद आहे. सामाजिक आणि राजकीय अशा दोन्ही अंगांना छेदून जाणारी व या दोन्ही अंगांचा समन्वय साधून त्यातून दलित व दलितेतर, मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी भूमिका ज्यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली, त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वाटा सिंहाचा होता, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

२६ नोव्हेम्बर १९४९ हा दिवस भारताच्या इतिहासात जसा सुवर्णअक्षरांनी नोंदवून ठेवण्यासारखा आहे, त्याचबरोबर हा दिवस इतका महत्त्वपूर्ण करण्यासाठी ज्यांनी अपार मेहनत घेऊन भारताची राज्यघटना तयार केली, त्या डॉ. बाबसाहेबांच्या महान कार्याची नोंदही सुवर्णअक्षरांनीच लिहून ठेवायला हवी असे मला वाटते. भारतीय घटनेचे "शिल्पकार" म्हणून संपूर्ण जगात त्या वेळी त्यांचे नाव गौरविले गेले व आजही तमाम भारतवासीयांना त्यांच्या या महत्त्वपूर्ण कामगिरीबद्दल अभिमान वाटतो आहे. कुशाग्र बुद्धिमत्ता, व्यासंगपूर्ण अभ्यास, खडतर मेहनत, प्रगल्भ विचार या गुणांच्या जोरावर त्यांनी भारतीय राज्यघटना तयार करून एक अतिशय उचित, परिपूर्ण व योग्य अशी "राज्यघटना" तयार केली. म्हणून जगाला दाखवून दिले. राष्ट्रासाठी त्यांनी केलेली ही अजोड कामगिरी कुठल्याही भारतीयाला केव्हातरी विसरता येणे शक्य आहे काय ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या घटनेने समाजातील तळागाळातील, दलित व तसेच इतर मागासवर्गीयांना कायद्याने हक्क मिळवून देण्यात ते यशस्वी झाले. घरात, मंदिरात, शाळेत, इस्पितळात, सार्वजनिक विहिरींवर, तलावावर इतर ठिकाणी मागसवर्गीयांना तसेच दलितांना मुक्त प्रवेश मिळाला, त्याचे सारे श्रेय डॉ. आंबेडकरांकडे जाते. आज परिस्थिती अशी आहे की, त्यांनी दलितांना त्यांच्या हक्कसंदर्भात ज्या जाणिवा करून दिल्या, त्याचे फळ तळागाळातील लोकांना, समाजाला मिळू लागले आहे. अन्यथा स्वातंत्र्यपूर्व जी परिस्थिती या देशात होती, ती तशीच राहिली असती व दलितांच्या वाट्याला तेच भोग आले असते. परंतु तसे न घडता वेगाने बदललेल्या परिस्थितीने दलितांचे जीवन नक्कीच उंचावले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात दिशाहीन दलित समाजाला त्यांनी एकसंध करून, त्यांना 'सामाजिक बांधिलकी'चे तत्त्व आचरणात कसे आणावे याचा वस्तुपाठ घालून दिला. सवर्ण व दलित यांच्यामध्ये जी एक पोकळी निर्माण झाली होती, ती पोकळी भरून काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केला.

महाडचे चवदार तळे म्हटल्यानंतर चटकन नजरेसमोर येतात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. आपल्या कुशल नेतृत्वाने त्यांनी चवदार तळे येथील सत्याग्रह यशस्वी करून दाखविला. समता, बंधुभाव व एकता या त्रयींना इतक्या उत्तमरित्या गुंफणारे ते एक कुशल संघटक होते, असे मला वाटते. स्पृश्य-अस्पृश्य हा भेदभाव पूर्वापार या देशात चालत आलेला आहे, परंतु आज परिस्थिती इतकी झपाट्याने व वेगाने बदलत जात आहे की, स्पृश्य-अस्पृश्य यांच्यात शहर पातळीवर तरी कुठल्याही तऱ्हेची दुरी राहिलेली नाही असे म्हणायला हरकत नाही त्याचे व मानकरी ठरतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जोपर्यंत जिवंत होते तोपर्यंत संपूर्ण जनसमूह त्यांच्या नेतृत्वाने भारावून जात होता; परंतु त्यानंतर मात्र दलित चळवळीला अनेक फाटे फुटले. आजही दलित चळवळ यशस्वीपणे मार्ग काढीत असली तरी पण एकसंध नेतृत्व नसल्याने त्यांच्या यशाला मर्यादा पडल्या आहेत. विविध गट असूनही एकत्र येण्यास तयार नाहीत, ही खंत दलित नेत्यांना आहे. आंबेडकरी चळवळ आज सांस्कृतिक चळवळीत अडकलेली आहे. तिचे मध्यमवर्गीयकरण झालेले आहे. आंबेडकरांपासून तसेच त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन अनेक दलित साहित्यिकांनी सांस्कृतिक जीवनात मोलाची भर टाकली आहे. दलित साहित्याचा जनतेकडून व सरकारकडून गौरव होत आहे, कौतुक होत आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय या तिन्ही अंगांचा यथायोग्य परामर्श घेण्यात दलित साहित्यिक कुठेच कमी पडले नाहीत हे विशेष आहे.

मागासवर्गीयांना खरा न्याय, अस्मिता जर कुणी मिळवून दिली असेल; तर ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी. या समाजातील प्रत्येक व्यक्ती त्यांना देवासमान मानते ती याच कारणांमुळे. प्रत्येक घरी त्यांच्या फोटोची प्रतिमा, तसेच बुद्धांची मूर्ती देवाबरोबर पूजली जाते. त्यातच त्यांच्या कार्याची महती कळून येते. मी तर म्हणेन की हे यश बघायला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज हवे होते. त्यांचे मन देखील बदललेल्या परिस्थितीचा चेहरा-मोहरा पाहताना भरून आले असते. सगळ्यात मुख्य म्हणजे बाबासाहेबांनी या समाजाला ताठ मानेने जगायला शिकविले. लीन व दास्य वृत्तीचा त्यांना तिटकारा होता. स्वाभिमान जर बाळगला तर माणूस किती मोठा होऊ शकतो, हेच त्यांनी जगाला दाखवून दिले.

महाडच्या सत्याग्रहामुळे आणि बाबासाहेबांनी चालविलेल्या निरनिराळ्या दलितहितसंवर्धक कार्यांमुळे, दलितांना आपल्याच जातीत जन्माला आलेला मोटा वाली भेटल्याचा आनंद झाला होता. १९३०च्या मार्च महिन्यात नाशिक येथील प्रसिद्ध काळाराम मंदिरामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी हजारोंच्या संख्येने काढलेल्या मोर्चाचे नेतृत्व त्यांनी केले.

कोणत्याही विषयाचा सर्वांगीण व चौफेर अभ्यासाशिवाय ते बोलत नसत. लोक मंत्रमुग्ध होऊन तल्लीनपणे त्यांचे बोलणे ऐकत असत. सरकारी महाविद्यालयात प्राचार्य म्हणूनही त्यांची कारकीर्द चांगलीच गाजली. अल्पावधीत त्यांनी तेथे अनेक सुधारणा घडवून आणल्या. भारतीय घटना तयार करण्याच्या कामी तब्येत बरी नसतानाही अहोरात्र काम करून बाबसाहेबांनी ते कार्य पूर्ण केले. २६ जानेवारी १९५० हा दिवस त्यांच्या श्रमामुळेच "प्रजासत्ताक दिन" म्हणून भारतात फुलला गेला. बाबासाहेबांच्या प्रतिज्ञेप्रमाणे "मी हिंदू म्हणून मरणार तर नाही; बौद्ध म्हणून मरेन." त्यांनी ती प्रतिज्ञा पूर्ण केली. आणि अशा रीतीने ह्या महान देशाच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ६ डिसेंबर १९५६ ला आपल्यातून निघून गेले.

१९९१, हे डॉ आंबेडकर यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. उशीरा का होईना पण डॉ. आंबेडकरांना मरणोत्तर भारतरत्न देण्यात आला. पण दु:खाची गोष्ट म्हणजे जन्म-शताब्दी वर्षात तरी विद्यापीठ नामांतर प्रश्न सुटला असता, तरच खरी जन्मशताब्दी साजरी केल्याचे सार्थक झाले असते.

आजच्या काळातही दलित, हिंदू - मुस्लिम, शीख-इसाई सर्व भारतीयांना एक महत्त्वाची प्रेरणा घ्यावयाची आहे, ती म्हणजे येणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्याची. आजची पिढी तशी हुशार आहे. फक्त तिला योग्य दिशा देण्याची गरज आहे. आजच्या पिढीला संघटित ठेवून तिचे मनोधैर्य वाढविण्याचा प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

बाबासाहेबांच्या सर्व गुणावगुणांचा अभ्यास करून आजच्या पिढीला योग्य मार्गदर्शन करणे, ही आजच्या काळाची नितांत आवश्यकता आहे. कोणत्याही व्यक्तीने "माझे भले झाले, मला दुसऱ्याची काळजी करण्याचे काय कारण ?" असा स्वार्थी विचार मुळीच करू नये. कोणत्याही व्यक्तीने मनाने दुर्बल राहता कामा नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सारख्या थोर पुरुषाला सदैव डोळ्यासमोर ठेवून आजच्या पिढीने कार्यरत राहावे आणि हाच संदेश मनात जपून ठेवावा, हीच खरी आदरांजली.

## ॥ दिनकराचा पुनर्जन्म ॥

डोंगराने गिळलेल्या त्या दिनकराचा उदय जाहला ।
पुनर्जन्म जाहला, पुनर्जन्म जाहला ॥धृ. ॥

सभोवताली निळ्या, तांबड्या
छटा प्रकटल्या, छटा प्रकटल्या,
चंद्र लाजला, तारे लपले
शुभ्र चांदण्या शरमून गेल्या

रूप तयाचे तेजस्वी ते पाहून परिसर थक्क जाहला

हिरवा शालू नेसूनी जाता,
हर्षुनी गेली अवनी माता

मयूरवासिनी धरणीमाता, गाली हसली उमगुनी आता

विरू लागली पहाट दवमय
आगमनाने रवीकराच्या

तेजतिरीपरूपी सहस्त्र बाहूंसह अवतरला कुशीत भूमीच्या ॥
चाहूल घेती, जागृत होती, पशुपक्षी अन् वेली वनाच्या
आरंभ करिती नव्या जीवना उदय जाहला, उदय जाहला

**ललिता बारमुख**
प्रथम वर्ष, विज्ञान

## माझी आई

आहे दूर मी तुजपासुनी आई,
सदा आठवतेस तू 'माझी बाई'.
शिकण्यासाठी आलो मी दूर,
मनी असते नेहमी तुझी हुर-हूर.
आठवणीने तुझ्या कोसळते रडू,
पण लगेच दिसतो वर्गातला खडू.

भुर्र उडत येऊनी बोलावे वाटते,
पण शिक्षणाने सर्व काही खटकते.

रात्रंदिन घाम गाळुनी पाठविले शाळेत,
पुस्तके - पैसे पुरविले अगदी वेळेत.

तू नाही बघितलीस आई शाळा,
इच्छा मोठी 'खूप शिकविन माझ्या बाळा'

तुझ्यामुळेच पाहिले मी हे जग सारे,
आशीर्वाद दे जिंकिन चंद्र, सूर्य, तारे.

जन्म देऊनी केलेस उपकार आई,
कितींदा हाक मारू म्हणुनी तुला 'बाई'.

**सोपान गंगाधर गाडे**
प्रथम वर्ष, विज्ञान

# " आहे मनोहर तरी..."

**सविता केतकर**
द्वितीय वर्ष वाणिज्य

'आहे मनोहर तरी...' लेखिका सुनिता देशपांडे आणि 'नाच गं घुमा' लेखिका माधवी देसाई यांची ही दोन आत्मचरित्रं बाजारात आली आणि त्यांच्या बाजूने आणि त्यांच्या विरोधात प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. काहींनी त्यांचे समर्थन केले तर काहींनी त्यांचा कडाडून विरोध केला. आता खरं तर हे वादळ शमलं आहे. तरीही आज मला यावर का लिहावंसं वाटतंय ?

प्रस्तुत लेखाचा उद्देश हा कोणत्याही बाजूने मत मांडण्याचा नाही. मी कोणत्याही गटाची नाही. माझ्या सुदैवाने किंवा दुर्दैवाने मी ही दोन्ही पुस्तकं फार उशीरा वाचली. आधी दोन्ही बाजूंची मतं वाचनात आली. कोणत्याही गटाच्या प्रभावाखाली न येता, जे काही ही दोन पुस्तके वाचल्यानंतर वाटले तेच शब्दात उतरवण्याचा हा प्रयत्न. 'समीक्षा म्हणजे काय ?' खरं तर या प्रश्नाचे उत्तर माझ्यासारख्या वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या सामान्य मुलीपेक्षा आपल्याकडील मान्यवर समीक्षकच देऊ शकतील. तशी मराठी वाङ्मय सृष्टीत समीक्षकांची उणीव नाही. इथे मला कोणावरही टीका करायची नाही. फक्त कोणतेही पुस्तक बाजारात आले की वाचकांपर्यंत पोहचण्याची एक जी साखळी आहे, तिच्यातील त्रुटींचा मागोवा घ्यायचा एक छोटा प्रयत्न.

महाराष्ट्रीयन वाचक आणि वृत्तपत्रसृष्टी हे एकमेकांशी निगडित असे दोन घटक. मराठी माणूस सर्वसाधारणपणे कोणत्या तरी एका वृत्तपत्र गटाशी बांधील असतो. कारणे काहीही असू शकतील. त्याचप्रमाणे मराठी माणूस शक्यतो स्वतः पुस्तक विकत घेऊन वाचणाऱ्या गटात मोडत नाही. (अर्थात काही अपवाद असू शकतील.) यासाठी अनेक कारणे असू शकतील. म्हणजेच जेव्हा एखादे पुस्तक बाजारात येते, तेव्हा ते वाचकापर्यंत पोहचते, ते वृत्तपत्र अथवा मासिकांमधून येणाऱ्या समीक्षेद्वारेच. खरं तर ह्या साखळीत समीक्षण ही गोष्ट फार महत्त्वाची ठरते आणि परिणामकारक ठरते. दुर्दैवानं असं म्हणावंसं वाटतं की, ती गोष्ट काळजीपूर्वक केली जात नाही. आणि ते कसं ते स्पष्ट करावंसं वाटतं, ते ह्या दोन पुस्तकांच्या अनुषंगानं.

सौ. सुनिता देशपांडे आणि माधवी देसाई दोघीही प्रतिथयश आणि मराठी माणसांचे ताईत अशा लेखकांच्या पत्नी. त्यांच्या अनुभवांची ही दोन पुस्तके बाजारात येताच वाङ्मसृष्टीत वादळं उठली. एखादी वादविवाद स्पर्धा असावी आणि दोन माणसांनी आपापल्या मुद्द्यांचं समर्थन करत जावं अशी जणू स्पर्धाच सुरू झाली. आणि त्यात महत्त्वाची भूमिका बजावली ती वृत्तपत्रीय समीक्षेने.

खरं तर आज समाजात कितीतरी सुनिता देशपांडे आणि माधवी देसाई असू शकतील. फरक इतकाच की, समाजात आज पु. ल. आणि रणजीत देसाई मात्र कोणी असू शकणार नाही. आणि हेच खरं कारण आहे या वादामागचं. या दोन पुस्तकांचा विचार हा सुनिताबाई पु. लं. ची पत्नी असा न करता झाला असता तर काही वेगळेच घडले असते. आणि टीकेची झोड त्यांच्यावर उठली नसती. जी समीक्षा या दोन पुस्तकांवर झाली, ती एक तर प्रसिद्ध लेखकाची त्याच्या विरोधात लिहिणारी पत्नी, नाही तर एक स्त्री-मुक्तिवादी, अन्यायाचा प्रतिकार करणारी स्त्री — याच मार्गाने झाली. ज्यांनी पुस्तकाच्या विरोधात लिहिले, त्यांच्या डोळ्यांसमोर ते दोघे होते; तर ज्यांनी पुस्तकाच्या बाजूने लिहिले त्यांची सहानुभूती

या दोघींना होती.

पण ते थांबले पाहिजे. पुस्तकाचा एक कलाकृती म्हणूनच विचार झाला पाहिजे. मग ते कोणाचेही असो. पुस्तक हे पुस्तक आहे. व्यक्ती ही व्यक्ती आहे. आणि एखाद्या व्यक्तीचे अनुभवविश्व हे सर्वस्वी तिचे असते. जरी ती ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करत असेल तरीसुद्धा अशी वादळे निर्माण होता कामा नयेत. वाङ्मयीनदृष्ट्या जर त्रुटी असतील तर त्यावर जरूर टीका व्हावी; पण व्यक्तिगत अनुभवांवर मात्र होऊ नये. एखाद्याचे विचार असाच पुस्तकाचा विचार झाला पाहिजे. समीक्षेच्या रूपाने जे लोकांसमोर येते, त्यावर समीक्षकाच्या मतांचा प्रभाव कमी असावा. असा प्रभाव येणे हे अपरिहार्य आहे; पण कमीतकमी प्रभाव येऊ देणे हेच समीक्षकाचे काम आहे. पुस्तकांचे समीक्षण लिहिताना समीक्षकाने एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, ज्यांच्यामार्फत हे प्रसिद्ध होईल, त्या वृत्तपत्राचा अथवा मासिकाचा एक वाचकगट आहे. जे काही समीक्षणाच्या रूपाने प्रसिद्ध होईल, तो विचारधागा विचारात ठेवूनच तो एखाद्या पुस्तकाचे रसग्रहण करील. समीक्षा म्हणजे समीक्षकाचे व्यक्तिगत मत नव्हे, तर एखाद्या कलाकृतीचे बहुतांशी केलेल परीक्षण असावे. आज अशा प्रकारच्या परीक्षणाचा फार अभाव जाणवतो आहे.

या दोन्हीही स्त्रिया या स्वत:ला काहीतरी विचार दिशा असणाऱ्या आहेत. यातही सुनिताबाईंचा हा गुण प्रकर्षाने जाणवतो. पण पुस्तक लिहिताना आपल्यावर काही जगाविरहित अन्याय झाला आहे हे मनात ठेवून लिहिले गेले असे वाटत नाही. पुस्तकाच्या रूपाने जे काही समोर आले ते त्यांचे वैयक्तिक अनुभव आहेत. आपला पती हा समाजापुढे एक आदर्श असताना त्याची पत्नी म्हणून जगताना, जाणवलेल्या त्यांच्या गुणविशेषांचा केलेला विचार असंच या पुस्तकांचं स्वरूप आहे व याच पातळीवर त्यांचा विचार झाला पाहिजे. लोकांनी यापुढे जाऊन त्यांच्या आयुष्यातील घटनांची चिरफाड करू नये.

दुसरा मुद्दा म्हणजे सुनिताबाई ह्या जशा पु. लं. च्या यशात भागीदार आहेत, तसेच सुनिताबाई देशपांडे हे व्यक्तिमत्त्व बनण्यास पु. लं. ही थोड्या प्रमाणात कारणीभूत ठरले असतील. माधवी देसाई ह्या आता सौ. रणजीत देसाई नाहीत; पण रणजीत देसाई बरोबरच्या आयुष्याने त्यांच्या आयुष्याला एक आकार दिला. नाहीतर 'श्रीमती काटकर' म्हणून त्या आज काहीतरी वेगळं आयुष्य जगत असत्या.

म्हणूनच यांच्यापैकी कोणा एकाचे गुणवर्धन हे दुसऱ्यावर अन्याय करणारे होऊ नये. एकाचा उदो-उदो करताना दुसऱ्याच्या स्वभावाची चिरफाड करून, त्याच्या दोषांवरच बोट ठेवू नये. आज दोघेही जे काही आहेत, ते एकमेकांमुळेच. आणि हेच समीक्षेचे सूत्र असावे. हे सर्व लक्षात घेऊन कोणत्याही कलाकृतीचे समीक्षण केले जावे.

हे लिहिताना कोणावरही टीका करण्याचा उद्देश नव्हता, तर या दोन पुस्तकांवर उठलेल्या वादळात जे काही जाणवले ते शब्दरूपाने मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न.

## कोडे

*उत्तर — **नकाशा***

*विमानतळ आहे विमान नाही ?*

*लोहमार्ग आहे रेल्वे नाही ?*

*नदी आहे पण पाणी नाही ?*

*रस्ते आहे पण गाडी नाही ?*

**चंद्रकांत तिखे,**
द्वितीय वर्ष कला

# चुटके

**प्रविण दत्तात्रय मुरकुटे**
एम. कॉम. द्वितीय वर्ष

### भांडण

कामाला सुट्टी असल्यामुळे एक जोडपे बागेत फिरायला जाण्याचा विचार करतात. तेवढ्यात एक पाहुणा टपकतो आणि बाहेरील खोलीत बसतो. तेव्हा ते जोडपे ठरवते की, आपण खोटं-खोटं भांडण करायचं त्यामुळे पाहुणा वैतागून निघून जाईल. भांडण सुरू करून नवरा तिला मारू लागतो, तशी ती जोरात ओरडते. पाहुण्याला हा प्रकार पाहवत नाही. तो लगेच निघून जातो. पाहुणा गेला हे कळताच नवरा म्हणतो, " मी कसं खोटं-खोटं मारल्यासारखं केलं !" पत्नी म्हणते, " मी कसं खोटं - खोटं रडल्यासारखं केलं !"

पाहुणा आत डोकावत म्हणतो, " मी कसं खोटं-खोटं गेल्यासारखं केलं !"

### घरचा राजा

गोटूरामजी आपल्या मित्राला सांगत होते, " माझ्या घरात मी राजा आहे. माझंच म्हणणं घरात चालतं, बायकोचा आवाज आपण चालू देत नाही."

"अस्स" ! मित्राने आश्चयनि विचारले.

"हो तर !" छाती फुगवून गोटूरामजी म्हणाले, "कालच्या रात्रीची गोष्ट. मला गरम पाणी मिळालं नाही. मी सारं घर डोक्यावर घेतलं आणि ताबडतोब मला गरम पाणी मिळालं."

"खरं ?" मित्राच्या आश्चर्याला पारावार उरला नाही.

गोटूरामजी म्हणाले, "आपल्याला गार पाण्यानं भांडी धुवायला मुळीच आवडत नाही."

### कात्री

**गणेश :** अहो काकू, तुमची कात्री जरा द्या हो !

**काकू :** का रे, तुमची कात्री काय झाली ?

**गणेश :** आई म्हणते, आपल्या कात्रीने पत्रा कापू नको. जा शेजारच्या काकूंच्या जवळून कात्री आण.

### सुटलो बुवा

हॉकी खेळताना चेंडू लागल्याने हरनामसिंग याचा पाय दुखावला गेला. त्यावर त्याला डॉक्टरांनी "धावपळ करायची नाही, पायऱ्या अजिबात चढायच्या नाहीत," असे काही सल्ले दिले.

काही दिवसांनी तो आपला पाय दाखवायला दवाखान्यात गेला. डॉक्टरांनी तपासून सर्व ठिक असल्याचं सांगितले. तरीही खात्री करून घेण्यासाठी हरनामसिंगने विचारले, "डॉक्टर, आता मला पायऱ्या चढायला हरकत नाही ना ?"

डॉक्टर म्हणाले, "मुळीच नाही, पण का ?"

हरनाम म्हणाला, "सुटलो बुवा ! गेले दोन आठवडे पाईपवरून चढून घरात जाताना मला चांगलाच त्रास होत होता."



# बर्म्युडा ट्रँगल

**अरविंद आटकर**
द्वितीय वर्ष, विज्ञान

इ. स. १९४५ सालापासून या सैतानी सागरप्रदेशात शंभराहून अधिक विमानं नि बोटी नाहीशा झाल्या ! एक हजाराहून अधिक माणसे गूढपणे बेपत्ता झाली. मोठमोठ्या शोधमोहिमा राबहूनही कशाचाच काही मागमूस लागला नाही. या लोकविलक्षण घटनामागे परग्रहावरील लोकांचा तर हात नसावा ना ? अथांग सागरगर्भातली आपल्याला अज्ञात अशी आणखी एखादी अतिप्रगत संस्कृती तर ह्या प्रकारामागे नसेल ना ? समुद्रगर्भात गडप झालेल्या एके काळी भुपृष्ठावर अस्तित्वात असलेल्या 'अँटीलिस संस्कृती'चा तर या घटनांशी काही संबंध नसेल ना ?

बर्म्युडा ट्रँगल ह्या सागरी प्रदेशातील गूढ गोष्टींचा आपण जेव्हा मागोवा घेत जातो, तेव्हा मन सुन्न होऊन जाते, बुद्धी गोठून जाते. वाटते आपले शास्त्र आज एवढे पुढे गेले आहे. तरीसुद्धा शास्त्रज्ञांना ह्या सागरी प्रदेशातील गूढ उलगडू नये म्हणजे आश्चर्यच आहे. पण हे खरे आहे. अशा वेळी 'हॅल्डनच्या' कवितेतल्या ओळींची आठवण होते.

"हे विश्व केवळ आपल्या कल्पनेपेक्षा विलक्षण आहे असे नव्हे तर आपण कल्पना करू शकतो, त्याहीपेक्षा ते विलक्षण आहे. "

अटलांटिक महासागराच्या पश्चिमेस त्याच महासागराचा साधारणत: एक त्रिकोणी भाग आहे. हा भाग बर्म्युडा बेट, फ्लॉरीडा बेट, बहामा बेट व पुढे प्युटोरिका यांच्या दरम्यान आहे.

अमेरिकेच्या आग्नेय किनारपट्टीपासून काही अंतरावर पश्चिम अटलांटिक समुद्रात एक विशिष्ट असा त्रिकोणाकार सागरी प्रदेश आहे. उत्तरेकडे बर्म्युडा बेटापासून निघून ते दक्षिणेला फ्लोरीडापर्यंत जाणाऱ्या तिथून पूर्वेकडे बहामा बेटांमधून जात ४० अंश रेखांशावरून प्यूटोरिको मागे टाकून पून्हा बर्म्यूडाकडे येणाऱ्या तीन काल्पनिक रेषांपासून तयार झालेला हा त्रिकोणाकार भाग आहे. अविश्वसनीय नी अनाकलनीय घटनांनी भरलेला हा अद्‌भुत सागरी प्रदेश सामान्यत: "बर्म्युडा ट्रँगल" या नावाने ओळकला जातो.

१९४५ सालापासून या विलक्षण सागरी प्रदेशात शंभराहून अधिक विमानं नि जहाजं अक्षरश: हवेत विरघळून जावीत त्याप्रमाणे रहस्यमयरित्या नाहीशी झालेली आहेत. नंतरच्या सव्वीस वर्षात एक हजाराहून अधिक माणसं या प्रदेशात गायब झाली आहेत. आश्चर्याची गोष्ट अशी की, या अद्‌भुत सागरी प्रदेशात नाहीशा झालेल्या विमानांचे अथवा जहाजांचे अवशेष, किंवा गायब झालेल्या माणसांपैकी एकाचाही मृतदेह आजतागायत कुणाला आढळलेला नाही. दळणवळणासाठी हवाई मार्गाचा, जल मार्गाचा वापर आज सर्रास होऊ लागला आहे. हरवलेल्या, नाहीशा झालेल्या गोष्टीचा शोध आजच्या युगात बारकाईने नि अधिक सुक्ष्मपणे घेतला जातो. त्यांच्या तपशिलाची नोंद काळजीपूर्वक ठेवली जाते. असं असतानाही 'बर्म्युडा ट्रँगल 'मध्ये विमाने, बोटी नाहीशा होण्याचे प्रकार वाढत्या प्रमाणावर होत राहिले आहेत.

बर्म्युडा ट्रँगलमध्ये गडप झालेली विमानं त्यांचा विमानतळांशी अगदी नेहमीप्रमाणे रेडिओ संपर्क असताना आणि तोही अगदी शेवटच्या क्षणापर्यंत असताना नाहीशी झाली आहेत ! तर गायब होण्यापूर्वी काही विमानांच्या वैमानिकांकडून मोठे विचित्र संदेश आले आहेत. 'आमची उपकरणे नीट काम देत नाहीयेत ! दिशादर्शक यंत्राचा काटा वाट्टेल तसा भिरभिरतोय, आकाश धूसर धूसर आणि हिरवट

पिवळ्या रंगांचं दिसतंय ! (वास्तविक त्या दिवशी हवामान स्वच्छ व निरभ्र असतानाही) आणि समुद्र नेहेमीसारखा दिसत नाहीये ! (वस्तुत: त्या दिवशी समुद्र अगदी शांत असूनही) अशा प्रकारचे हे विलक्षण नि कोड्यांत टाकणारे संदेश आहेत. नेमका काय गडबड घोटाळा झाला आहे, याचे पुढे काही एक स्पष्टीकरण न देता विमानं अचानक अदृश्य झालेली आहेत !

५ डिसेबर १९४५ रोजी फोर्ट लॉडरडेल या नाविक विमानतळावरून "टी बी एम ॲव्हेंजर्स " जातीची पाच विमानं एका मोहिमेकरिता आकाशात झेपावली. बर्म्युडा ट्रँगलच्या परिसरातून जात असताना ही पाचही विमानं एकाएकी नाहीशी झाली. ती नियोजित स्थळी पोहोचलीच नाहीत. तेव्हा त्यांचा शोध घेण्याकरिता २० मिनिटांत "मार्टिन मरिनर" जातीचं एक विमान पाठविण्यात आलं. अन् आश्चर्याची गोष्ट अशी की शोध-पथकाचे शोध घेणार ते विमानदेखील बर्म्युडा ट्रँगल परिसरात गायब झालं. या प्रकारामुळे मोठीच खळबळ उडाली. नाहीशा झालेल्या त्या विमानांचा शोध घेण्यासाठी प्रचंड शोध-मोहिमा राबविल्या गेल्या. जमिनीवरून तसेच आकाशातून बारकाईनं तपास घेतला गेला. लक्षावधी चौरस सागरी मैलांचा प्रदेश अक्षरश: पिंजून काढण्यात आला परंतु नाहीशा झालेल्या त्या विमानांचा शोघ लागला नाही. समुद्रात कुठेही लाइफ बोटी आढळल्या नाहीत, विमानांचा अपघात झाला असं समजावं तर कुठेही तेलाचे तवंग आढळले नाहीत, विमानांचे अवशेषही कुठे आढळले नाहीत ! कशाचा काही मागमूस न ठेवता ही विमानं जणू आकाशात विरघळून गेली होती !

फ्लाईट नं. १९च्या रहस्याचा पाठपुरावा करणाऱ्या वार्ताहार, लेखक नि प्राध्यापक म्हणून काम केलेल्या 'आर्ट फोर्ड' नामक एका महाशयांनी १९४५ पासून त्याचा अभ्यास केलेला होता. २३ वर्षांनंतर म्हणजे १९७४मध्ये एका नॅशनल टी. व्हीट प्रोग्रॅममध्ये 'आर्ट फोर्ड' ने सांगितले की त्या फ्लाइट नं. १९ चे नेतृत्व करणाऱ्या लेफ्टनंट टेलरनं अखेरचा संदेश पाठविला होता. तेंव्हा पुढे तो असेही म्हणाला होता की, "आमच्या मागे येऊ नका...... अरेच्या ! हे लोक बाह्यावकाशातले परग्रहावरून आलेले दिसताहेत !" फ्लाइट नं. १९ च्या नाहीशा होण्याची घटना घडली त्याच वेळी एका हॅम रेडिओ ऑपरेटरकडून आपल्याला वरील अस्सल नि विश्वसनीय माहिती समजली असं आर्ट फोर्डने त्या कार्यक्रमात सांगितलं आणि ते सर्व खरं होतं. कारण लेफ्ट. टेलरनं पाठविलेल्या संदेशाच्या लेखी नकलेचा काही भाग पाहण्याची फोर्डला परवानगी मिळाली, त्या नकलेत वरील वाक्य होते, परंतु त्याला प्रसिद्धी देण्यात आली नव्हती. ह्यावरून बर्म्युडा ट्रँगलमध्ये नाहीशी होणारी विमाने, जहाजे व माणसे परग्रहावरील प्रगत व मानव पृथ्वीच्या कारभारात हस्तक्षेप करून नेत असावा काय ?

बर्म्युडा ट्रँगलच्या परिसरात केवळ विमानेच नाहीशी झाली असे नव्हे; तर ह्या गूढ प्रदेशात अनेक लहानमोठ्या नौकाही पाठीमागे काही पुरावा न ठेवता अदृश्य झाल्या आहेत. या नौकांना, तसेच ह्यावरील खलाशांना कुणीतरी आणखी एखाद्या मितीमध्ये खेचून न्यावं तद्वत तसे ते नाहीसे झाले आहेत. बर्म्युडा ट्रँगलने प्रचंड मोठी जहाजे देखील गिळंकृत केली आहेत. उदाहरणादाखल, "मरिन सल्फर क्वीन" हे सव्वाचारशे फूट लांबीचे प्रचंड मालवाहू जहाज याच सागरी प्रदेशात गडप झालं. दुसरी 'यु. एस. एस. सायक्लॉप्स' ही एकोणीस हजार टनी अजस्र नौका त्यावरल्या तीनशे नऊ माणसांसकट येथे नाहीशी झाली ! काही जहाजं नि बोटी या त्रिकोणाकार प्रदेशात एकाकी अवस्थेत भरकटताना आढळली. म्हणजें असं की एखादं जहाजं त्यावरील सर्व साधनसामुग्रीसहीत सुरक्षित आढळल फक्त त्यावरच्या खलाशी टोळीचा पत्ता नव्हता. क्वचित प्रसंगी अशा जहाजांवर एखादा कुत्रा किंवा सारिका पक्षी राहून गेलेले (जीवंत) आढळले. त्यांच्याकडून नेमका काय प्रकार घडला असावा हे कळणं केवळ अशक्य होतं. अपवादात्मक प्रसंगी, एका घटनेमध्ये बोलणारा पोपट मात्र खलाशांच्या टोळीसकट नाहीसा झाला.

जहाजं, विमानं नि त्यामधील माणसं नाहीशी होण्याचे प्रकार बर्म्युडा ट्रँगलमध्ये आजतागायत चालू आहेत. बर्म्युडा ट्रँगलमध्ये विचित्र अनुभव घेतलेल्या आणि त्याच्या तडाख्यातून बचावलेल्या काही वैमानिकांकडून आणि बोटीवरील कप्तानांकडून आलेले अहवाल, सागरी दंतकथांमध्ये नव्याने भर टाकणाऱ्या आहेत. तरीदेखील या सागरी प्रदेशात विमानांना आणि जहाजांना होणाऱ्या अनाकलनीय घातक उपसर्गामागचं नेमकं कारण काय? हे रहस्य पूर्वीइतकेच आजही कायम आहे. खरोखरीच हे काय गौडबंगाल आहे याचा शोध अनेक शास्त्रज्ञ व अभ्यासक आज करीत आहेत. त्यांच्या प्रत्येकांमध्ये मतभिन्नता आपणांस आढळून येते. उदा. १) भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या (अचानक) पर्वतप्राय लाटा जहाजांना समुद्रतळाशी नेत असाव्यात २) आकाशातील तेजोगोल (उल्का) विमानांवर आदळून विमानांचे स्फोट होत असावेत ३) समुद्रातील प्रचंड जलचर प्राणी जहाजांवर हल्ले करत असावेत ४) दुसऱ्या मितीकडे खेचून नेणारा काल-अवकाश ताण निर्माण होता असावा. ५) विद्युत चुंबकीय किंवा गुरुत्वाकर्षणाची शक्ती व गुरुत्वाकर्षणीय भोवरे यांच्यात सापडून विमान कोसळून नष्ट होत असतील आणि जहाजे समुद्रात नाहीशी होत असतील. ६) जलांतर्गत व अवकाशातून उडणाऱ्या तबकड्या परग्रहस्थ यानांद्वारे (U. F. O. - Unidentify - Flying - Objects) आपल्या विमानांचे, जहाजांचे अपहरण होत असावे. ७) जमिनीखाली बुडालेली ॲटिलांटिस संस्कृती ह्यास कारणीभूत असेल. कारण आज पाणबुड्यांनी केलेल्या सागरतळ संशोधनावरून हे स्पष्ट झाले आहे की, ही संस्कृती आजच्या मानवापेक्षाही अतिप्रगत होती. त्या काळी त्यांनी निर्माण केलेली अनेक मोठमोठी जनरेटर्स खोल समुद्रात कुठे तरी असतील व सागरजलाच्या प्रवाहांच्या हालचालींमुळे ही जनरेटर्स कधी कधी जागृत होत असावीत व प्रचंड मॅग्नेटिक फिल्ड तयार होऊन हे वरील अपघात संभवत असावेत. ९) किंवा समुद्रात खोलवर कुठेतरी एखादी प्रगत मानवी वसाहत असावी.

वरील सर्व मुद्द्यांचा योग्य-अयोग्यतेचा अभ्यास करता ६, ७, ८ ही विधानेच केवळ योग्य वाटतात. परंतु त्यापैकी नक्की कोणते, की सर्वच, हे मात्र अजून कोणीही शोधू शकले नाही.

दिव्यशक्तीच्या साहाय्याने रोगनिवारण करणाऱ्या 'एडगर केसी' ह्या संमोहन तज्ज्ञाने या संदर्भात एक सिध्दांत मांडला तो असा की, प्राचीन ॲटलांटियन्स शक्तीस्रोत म्हणून स्फटीकांचा (क्रिस्टल) वापर करत असत. त्यांनी तयार केलेला असाच एखादा शक्तीस्रोत (अतिप्रचंड) ॲन्ट्रोस समुद्राच्या पश्चिमेला सुमारे एक मैल खोलीवर बुडाला असेल नि याच शक्तीस्रोत प्रभावामुळे आपल्या आधुनिक विमानांमधील व जहांजावरील विद्युत - उपकरणे व इतर यंत्रणा, होकायंत्र अथवा दिशादर्शक यंत्रे निकामी होत असावीत. याचा प्रभाव बिमिनी बेट, बहामा बेट व टंग ऑफ ओशन ऑफ अँट्रोस' या परिसरात अधिक असावा. परंतु माझ्या मतानुसार जर असेल तर सागरतळ संशोधकांना हे अजून कसे सापडले नाही, किंवा होणारे अपघात हे केवळ बिमिनी बेट, बहामा बेट किंवा अँट्रोसच्या पाशी होतात असे नाही. हे अपघात संपूर्ण बर्म्युडा ट्रँगलच्या तथाकथित परिसरात कोठेही उद्‌भवतात. तसेच यंत्रे निकामी बनवण्याची क्रियाही तेथून जाणाऱ्या सर्वच विमानांच्या किंवा जहाजांच्या बाबतीत घडत नाही. त्यामुळे 'एडगर केसी' ने मांडलेला हा सिध्दांत येथे समर्पक वाटत नाही. हा संमोहन तज्ज्ञ १९४५ साली निवर्तला.

काहीही असले तरी या रहस्याचं स्पष्टीकरण अथवा निरसन हे समुद्राशीच निगडित असलं पाहीजे असं वाटतं. पृथ्वीवरच्या रहिवाशांना अजूनही घोटाळ्यात पाडणारे हे एकमेव नि अंतिम असं अतिविलक्षण रहस्य आहे. आज आपण अवकाशयुगाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. विज्ञानाच्या कक्षा रुंदावल्यानं जगाचा-कानाकोपरा आपल्याला परिचित झाला आहे. तेव्हा त्याबद्दल विशेष कुतूहल वाटत नाही. परंतु पृथ्वीवरीलच पाण्याने व्यापलेला तीन-पंचमांश भाग - तो अथांग सागर आज आपल्याला चंद्रावरच्या विवरांइतका व

सूर्यावरच्या डागाइतका अपरिचित आहे, ही गोष्ट सत्य आहे. अर्थात आजमितीला विज्ञानाच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे शास्त्रज्ञांनी सागरतळाचाही अभ्यास सुरू केलेला आहे. सोलर तंत्रज्ञान, पाणबुडे व बायीस्फिअरच्या मदतीने व आधुनिक जल यानांद्वारे शास्त्रज्ञांनी अज्ञात सागरतळाचा अभ्यास करण्यात यश संपादिले आहे. त्यामुळे विज्ञानाच्या जोरावर त्यांना अजूनही समुद्रात अधिक खोलीवर जाता येईल यात संदेह नाही.

शीतयुद्धामुळे अनेक प्रगत राष्ट्रे स्वतःच्या नाविक दलाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी म्हणून पाणबुड्यांचे ताफे बाळगतात. ह्या पाणबुड्यांच्या हालचाली बाबतीत नाविक दलाला भूमध्य समुद्रात व अमेरिकन व ब्रिटिश नौदलाला अटलांटिक महासागरात अनुभवास आलेले धोके लक्षात घेऊनसुद्धा त्यांनी त्यांना माहीत असलेली माहिती (समुद्र तळासंबंधी) उघड केलेली नाही. जर ही माहिती उघड केली तर आपल्या ज्ञानात निश्चितपणे मोलाची भर पडू शकेल. समुद्राचा खोल भाग आपणाला अजूनही अगम्य आहे. तिथं काहीतरी आश्यर्यकारक गोष्टी दडलेल्या असतील. समुद्राच्या त्या अज्ञात खोलीवर आपल्याला कल्पनाही येणार नाही असे प्राणीमात्र कदाचित अस्तित्वात असतील. १९३८ साली हिंदी महासागरात शास्त्रज्ञांना एक अती प्राचीन असा मासा आढळला. हा चतुष्पाद मासा सुमारे ६०,०००,००० वर्षांपूर्वी अस्तित्वात होता. या माशाचे अगदी शेवटून सापडलेले अवशेष ख्रिस्तपूर्व १३,०००,००० वर्षापूर्वीचे आहेत. हा मासा कोलाकॅथ या नावाने ओळखला जातो. स्कॉटलंडमध्ये सरड्यासारखा परंतु विचित्र आकाराचा एक प्राणी आढळतो. स्थानिक लोक त्याला ('नॅसी') या नावाने ओळखतात. हा प्राणी म्हणजे अतिप्राचीन इथ्योसॉरस या अतीप्राचीन विशालकाय मत्स्य- सरड्यासारखी लहान आवृत्ती आहे, असं प्राणिशास्त्रज्ञांच म्हणणं आहे. अॅटन ब्रून ह्या डॅनिश सागर-संशोधकाने लहान अवस्थेतील समुद्रसर्प पाहिला. ह्याची संपूर्ण वाढ झाली असती तर बहात्तर ते पंच्च्याहत्तर फूट लांब भरली असती. अनेक सागर संशोधकांना व निरीक्षकांना अनेकदा सागरात विशालकाय समुद्री प्राणी आढळले आहेत. ते समुद्रसर्प असावेत.

ह्या आपल्याला ठाऊक असलेल्या समुद्री प्राण्यांच्या संदर्भात त्यांच्या स्थलांतरांच्या आणि प्रजोत्पादनाच्या कितीतरी आश्चर्यजनक गोष्टी आढळतात. अमेरिकेच्या नि युरोपच्या आंतर्देशीय समुद्रात आढळणारे ईल मासे मिलनासाठी सारागासो समुद्रात येतात. तिथं पिलांना जन्म दिल्यानंतर हे मासे मरून जातात. परंतु त्यांची पिल्ले मात्र पुन्हा आपल्या जन्मदात्याच्या मूळ निवासस्थानांकडे अचूकपणे जातात. हा निसर्गाचा अजबच चमत्कार आहे ! ब्राझिलहून स्थलांतर करणारे टूनो मासे नोव्हा - स्कॉटिआपर्यंत प्रवास करतात नि तिथून युरोपात येतात. आणि नंतर त्यांच्यापैकी काही आणि काहीच मासे पुढच्या भूमध्यसमुद्रापर्यंत प्रवास करतात. युरोप खंडातील समुद्रातील लॉबस्टर मासे समुद्रतळातील कुठल्या तरी अज्ञात ठिकाणी जातात. ते नेमके कुठे जातात याचा काही ठावठिकाणा लागत नाही.

समुद्राच्या तळातील आणखी काही आश्चर्यकारक गोष्टीपैकी एक गोष्ट म्हणजे तिथल्या अतिप्रचंड दऱ्या होत. समुद्रतळातील बहुतेक सर्व दऱ्यांची खोली कल्पनाही करता येणार नाही इतकी प्रचंड म्हणजे काही ठिकाणी सरळ सात ते आठ मैल खोल एवढी आहे. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे इतक्या खोल प्रचंड दाबाखाली सुद्धा जीवसृष्टी आहे ! नंतर क्रमांक लागतो तो समुद्राच्या अंतरंगातील वेगवान जलप्रवाहांचा, समुद्रांतर्गत वेगवान बदलांपैकी काही प्रवाह हे समुद्रपृष्ठावर तर काही प्रवाह शेकडो फूट खोलीवर असतात.

समुद्रपृष्ठावरील जलप्रवाह हे समुद्र तळातील प्रवाहांच्या बरोबर विरुद्ध दिशेने वाहतात ही आणखी एक आश्चर्याची गोष्ट !

समुद्रातील वारे आणि लाटा ह्या आणखी काही रहस्यमय गोष्टी आहेत ! प्रचंड वेग असलेली आणि अगदी अचानक उद्‌भवणारी वादळे दोन ठिकाणी होतात.

कॅरिबियन आणि प. अटलांटिक समुद्राचा भाग. व द. चिनी समुद्र ही ती दोन स्थान होत. ह्या दोन स्थानांवर वेगांची वादळे होतात. समुद्र शांत असतानाही 'सेईशी' नावाच्या पर्वतप्राय लाटा उसळतात. समुद्रतळाशी होणाऱ्या भूकंपामुळे ह्या लाटा वर उसळत असाव्यात असं शास्त्रज्ञांचं मत आहे. ह्या भूकंपाची नोंद जमिनीवरील भूकंपाप्रमाणे होऊ शकत नसल्याने हवामानखात्यास त्याचे पूर्वअनुमान देता येत नाही.

सागरतळाशी अगणित संपत्ती दडलेली आहे. तेलाव्यतिरिक्त इतर अनेक खनिज-साठे समुद्र गर्भातून काढले जात आहेत. त्याचप्रमाणे जगभरातल्या महासागरांमध्ये बुडालेल्या प्राचीन संस्कृतीसुद्धा सापडल्या आहेत. त्यात १) मध्य अटलांटिक समुद्रात हरवलेली ॲटलांटिस संस्कृती २) बहामा पूर्व भूमध्यसमुद्र तसेच द. पॅसिफिक महासागरात बुडालेल्या प्राचीन संस्कृती ३) इस्टर बेटांवरील आश्चर्ये या सर्व गोष्टी पाहता ध्रुवाचं स्थलांतर होण्यापूर्वी अंटार्क्टिकावरही एके काळी एखादी संस्कृती अस्तित्वात असावी जी हल्ली द. ध्रुवावर असलेल्या बर्फाखाली पुरली गेली असावी. त्याचप्रमाणे महासागरांचे तळसुद्धा वारंवार बदलत असावेत. ते त्यांच्या अंतर्गत प्रवाहामुळे किंवा समुद्रातील भूकंपांमुळे. कारण १९७३ साली मे महिन्यात जपानच्या जवळ असलेल्या बोबीन दरीचा काही भाग अकस्मात सहा हजार फूट वर उचलला गेला. पृथ्वीवर दरवर्षी सुमारे एक लक्ष भूकंप होतात. त्यापैकी बहुतांश भूकंप अटलांटिक महासागराच्या तळाशी असलेल्या पर्वतरांगांमध्ये होत असावेत. प्राचीन काळी हा भूभाग पृथ्वीच्या पृष्ठभागावर असावा नि तिथे ॲटलांटिस संस्कृतीचे वसतिस्थान असावे असे सर्वसाधारणपणे मानले जाते.

'फसवे सागरतळ' हा सागरातील आणखी एक आश्चर्यकारक प्रकार ! ह्यात समुद्रतळाचे (खोली) सोलर यंत्रणेमुळे रीडिंग घेतले तरी ते पहिल्या रीडिंगपेक्षा कमी भरते. पण पुन्हा नंतर काही काळानंतर रीडिंग घेतले तर ते पुन्हा पहिल्या रीडिंगएवढेच भरले. हे फसवे तळ म्हणजे दुसरं तिसरं काही नसून माशांचे किंवा अन्य प्राण्यांचे समूह तेथे येत असावेत. हे घनदाट समुह एक तात्पुरता सघन असा पृष्ठभाग निर्माण करून असावेत नि त्यावरून हे सोलर कंपने उसळी मारून परत येत असल्याने खोलींचं रीडिंग कमी भरत असावं असा एक तर्क लढविण्यात येतो.

असाच घोटाळ्यात पाडणारा आणखी एक दुसरा प्रकार म्हणजे समुद्रात प्रवाहात दिसणारे चमकदार पांढऱ्या प्रकाशाचे पट्टे ! पाण्यातल्या त्या चमकदार पट्ट्यांमुळे शास्त्रज्ञांनी त्याला श्वेतजल प्रवाह (White - Water - Strips) असं नाव दिलं आहे. अंगातून प्रकाश फेकणाऱ्या एका विशिष्ट जातीच्या माशांच्या समूहामुळे समुद्रात हे प्रकाशमय पट्टे दिसत असावेत किंवा पाण्यातील किरणोत्सर्गामुळे त्या विवक्षित भागातलं पाणी चमकदार पांढरं दिसत असावं. या विलक्षण प्रकारा मागील रहस्य काहीही असो; पण पाच शतकांपूर्वी अमेरिकेचा शोध लावणाऱ्या कोलंबस ह्या शूर दर्यावर्दीलाही समुद्रात हे श्वेत जलप्रवाह दिसले होते, अशी त्याने त्याच्या डायरीत नोंद केली आहे. तसेच, अंतरिक्ष प्रवासासाठी निघालेल्या आजच्या अंतराळयुगातील अंतराळवीरांनाही पृथ्वीवरला शेवटचा प्रकाश लुप्त झाल्यानंतर हे श्वेतजलप्रवाहाचे पट्टे अटलांटिक समुद्रात आपल्याला दिसले असं सांगितलं. ह्या दोन्ही गोष्टी या संदर्भात लक्षात ठेवण्याजोग्या आहेत !

सरतेशेवटी सागरातील प्रचंड उलथापालथीमुळे वाहून स्थलांतरित झालेल्या भूखंडबाबतच्या उत्पत्तीचा परामर्श 'वेगनर' ह्या वनस्पती व प्राणी-शास्त्रज्ञाने खंडवहन सिध्दान्ताद्वारे केला आहे. त्याच्या मते पृथ्वीवरील भूखंड आज आपल्याला दिसतात तसे ते पूर्वी नसावेत. त्यांची स्थानं, रचना भिन्न असाव्यात. परंतु सागरातील प्रचंड उलथापालथीमुळे हे भूखंड आपल्या मूळ स्थानापासून सुटून, वाहून दुसऱ्या ठिकाणी गेले असावेत. किंवा वाहून काही बेटं एकत्र येऊन त्यापासून सलग खंड निर्माण झाले असावेत अशी ही उपपत्ती. अर्थात ही उपपत्ती पृथ्वीचं भ्रमण, तिची रचना आणि स्थिती

इत्यादी गोष्टींवर बरीचशी अवलंबून आहे.

सागरातील ही विविध रहस्यं आणि बर्म्युडा ट्रँगलचं रहस्य ह्या दोन्ही गोष्टीत अर्थात तसा बराच फरक आहे. पण सागरातील आणि ह्या रहस्यांचा आपण जर वर्तमान आणि भविष्य काळात उकल करू शकलो तर कदाचित बर्म्युडा ट्रँगलचे रहस्यही उलगडेल. कदाचित त्या रहस्यांमध्ये ते रहस्य दडलेल असेल तर ? परंतु आजपर्यंत तरी शास्त्रज्ञांना हे रहस्य उलगडलेलं नाही. प्रवाशाला सतत धोक्याची जाणीव करून देणाऱ्या 'बर्म्युडा ट्रँगलच्या' गूढाची तऱ्हाच काही निराळी आहे. अर्थात एक गोष्ट सत्य आहे की, ह्या सागरी प्रदेशावरून कितीतरी विमानं उड्डण करतात. लहान मोठी जहाजं नि नौका विशिष्ट सागरी प्रदेशातून जलसंचार करतात; अगणित प्रवासी ह्या विभागाला काहीही अघटित न घडता-भेट देतात.

ह्या ट्रँगलव्यतिरिक्त जगभरातील समुद्रांमधूनसुध्दा आशा प्रकारे विमानं नि बोटी बेपत्ता झाली आहेत व आजही होतात. उदा. भारताच्या बंगालच्या उपसागरात ४४ खलाशांसह २१ जून १९८५ ला दोन भारतीय बेपत्ता झाले. ह्या दोन्ही जहाजांवरील कोणतीही धोक्याची सूचना किंवा संदेश कंट्रोल रूममध्ये आला नाही. ह्या दोन्ही जहाजांवरली संदेश-यंत्रणा एकाच वेळी बंद पडली, हे एक कुतूहलच आहे. त्यापैकी एक जहाज 'एम. व्ही. नित्य नानक' हे सौराष्ट्राकडून कलकत्त्याकडे निघाले होते. तर 'एम. व्ही. नित्यराम' हे कोलंबो येथून शंभर किलोमीटरवर असताना गायब झाले ! त्याचप्रमाणे १९७९ मध्ये 'एम. व्ही. कैराली' हे जहाज आखाती बंदराकडे निघाले असताना गोव्यापासून सहाशे कि. मी. अंतरावर बेपत्ता झाले. भारताप्रमाणेच जपानच्या ' डेव्हिल्स सी'मध्ये सुद्धा अनेक जहाजे व विमाने नाहीशी झाली आहेत. ह्या ' डेव्हिल्स सी' मध्ये होकायंत्राचा काटा एकाच वेळी उत्तर दिशा व चुंबकीय उत्तर दिशा दाखवितो ! म्हणजेच बर्म्युडा ट्रँगलच्या परिसराप्रमाणेच 'वाट्टेल तसा ' व 'वेड्यासारखा' फिरतो (महत्त्वाची गोष्ट म्हणजे बर्म्युडा ट्रँगल व डेव्हिल्स सी एकाच अंशावर म्हणजे ८० अंश पश्चिम रेखांशावर अशी एक रेषा आहे जिथे उत्तर दिशा व चुंबकीय उत्तर दिशा संयुक्त होतात. या विशिष्ट रेषेवर होकायंत्रातील चढउतार मोजता येत नाहीत. हीच ८० अंश पश्चिम रेखांश रेषा जेव्हा ध्रुवावरून जाते तेव्हा तिचे स्वरूप बदलून १५० अंश पूर्व असे होते. आणि उत्तर ध्रुवाच्या दक्षिणेकडून पुढे जाणारी रेषा पूर्व जपानमधील डेव्हिल्स सी च्या मध्यावरून जाते.) डेव्हिल्स सी जपानने वाहतुकीसाठी बंद केला आहे.

परंतु बर्म्युडा ट्रँगल परिसरात विमानं नि बोटी, जहाजं नाहीशा होण्याचे प्रकार इतके अनाकलनीय रीतीने, इतके अचानकपणे नि विचित्र परिस्थितीत घडले आहेत की तसे प्रकार जगाच्या इतर कोणत्याही भागात अद्याप घडलेले नाहीत ! बर्म्युडा ट्रँगलमध्ये घडलेल्या काही घटनांनी तर अशक्य कोटीच्या सीमाच गाठल्या आहेत !

ज्या सागरी प्रदेशात मोठ्या प्रमाणावर हवाई आणि सागरी वाहतूक चालते, तिथे अचानक उद्भवलेल्या वादळांमुळे नौकापर्यटनातील चुकांमुळे किंवा इतर अपघातांमुळे विमानं नि बोटी नाहीशा होण्याचे प्रकार घडणं अगदी स्वाभाविकच आहे, असं अनेक नाविक व हवाई दलाच्या अधिकाऱ्यांचं मत आहे. ह्या अधिकाऱ्यांच्या मते हा बर्म्युडा ट्रँगल हा एक कपोलकल्पित, काल्पनिक, अद्भुतरम्य अशी गोष्ट आहे. बर्म्युडा ट्रँगल वगैरे सर्व काही झूट आहेत. परंतु ह्या सागरी प्रदेशातून वाहतूक करणाऱ्या बऱ्याचशा वैमानिकांच्या मते व जहाजांवरील कॅप्टन व खलाशांच्या मते येथे काहीतरी वेगळे आहे. कोणीतरी गूढ किंवा अगाध शक्ती येथे वास करीत असावी.

बर्म्युडा ट्रँगल नाही असं म्हणणाऱ्यांचं म्हणणं देखील एक परीने बरोबर आहे; कारण अधिकारीही असे म्हणू लागले तर प्रवासी ह्या भागातून प्रवास करायला तयार होणार नाहीत. त्यामुळे त्यांच्यापुढे एक नविनच प्रश्न उभा राहील. आज जग जवळ येत असताना जगापासून लांब जाणे हे या प्रगत देशांना परवडणारे नाही. मुख्यतः U. S. A. कॅनडा,

ब्रिटन, फ्रान्स व इतर युरोपियन देश त्याचप्रमाणे बर्म्युडा ट्रँगल हा सागरी प्रदेश नेमका त्रिकोणाकार आहे की, वर्तुळाकार की दीर्घवर्तुळाकार (Eliptical) ह्याबद्दल मतभेद आहेत.

" इनव्हिजिबल रेसिडेंटस् " या पुस्तकाचा लेखक 'इव्हान सँडरसन' याच्या मते हा प्रदेश लंबवर्तुळाकार असून ठराविक अंतरावर असे आणखी बारा प्रदेश अस्तित्वात आहेत. (जगभरातील सागरी प्रदेशात) त्यात जपानच्या 'डेव्हिल्स सी' चाही समावेश आहे. 'जॉन स्पेन्सर' च्या मते हा सागरी प्रदेश युरोपच्या उतारावर साधारण व्हर्जिनियापासून सुरू होतो तो दक्षिणेकडे U. S. A. च्या किनारपट्टीकडे जात, फ्लोरिडा मागे टाकत तसाच पुढे मेक्सिकोच्या आखाताला वळसा घालून कॅरिबियन बेटांचा भूभाग व बर्म्युडा बेटाच्या उत्तरी सीमा व्यापतो. 'इनव्हिजिबल हॉरिझॉन्स' या पुस्तकाचा लेखक 'व्हिसेंट गॅडिस' याने या विभागाला बर्म्युडा ट्रँगल हे नाव दिले व ते सर्वमान्यच झाले. फ्लोरिडाहून बर्म्युडाकडे जाणारी एक रेषा, बर्म्युडापासून प्युर्टोरिककोकडे जाणारी दुसरी रेषा, आणि तिथूनपुढे बहामा बेटांमधून पुन्हा फ्लोरिडाकडे येणारी रेषा अशी तीन रेषांपासून तयार झालेल्या त्रिकोणाकार प्रदेश असा गॅडिसने त्याचं वर्णन केलं आहे. या उलट (This Baffling World ) या पुस्तकाचे लेखक महाशय - 'जॉन गॉडविन' यांनी बर्म्युडा आणि व्हर्जिनिया यांच्या किनाऱ्याच्या दरम्यान पसरलेला एक मोठा चौकोन असं या भागाचं वर्णन केल आहे. अमेरिकेच्या सागरी किनारपट्टी रक्षकदलाचा (Coast- Guard ) च्या 'सेव्हंश कोस्ट गार्ड डिस्ट्रिक्ट' च्या ५७२० क्रमांकाच्या फायलींमध्ये या भागाच वर्णन पुढीलप्रमाणे आढळते ते असे

'बर्म्युडा' अथवा 'डेव्हिल्स ट्रँगल' हा अमेरिकेच्या आग्नेय किनारपट्टीपासून काही अंतरावर अटलांटिक समुद्रात असलेला एक काल्पनिक सागरी विभाग आहे. अनेक विमानं, मोठी जहाजं नी लहान बोटी या विभागत अनाकलनीय रीतीने नाहीशा झाल्याच्या अनेक घटनांमुळे या विभागाला सैतानाचा त्रिकोण, म्हणून प्रसिध्दी मिळाली आहे. बर्म्युडा, मियामी, फ्लोरिडा, सानजुआन, प्युर्टोरिको हे या त्रिकोणाचे सर्वसाधारण शिरोबिंदू मानले जातात."

हवामन तज्ज्ञांच्या मते "बर्म्युडाच्या उत्तरेला न्यूयार्कपर्यंत जाणारी एक रेषा, दक्षिणेला व्हर्जिन बेटांपर्यंत जाणारी दुसरी रेषा आणि पश्चिमेला पंख्याप्रमाणे वक्राकार असलेली ७५ अंश प. रेखांश घेरणारी तिसरी रेषा अशा तीन रेषांमधून बनलेला त्रिकोणाकार सागरी परिसर म्हणजे बर्म्युडा ट्रँगल होय."

बर्म्युडा त्रिकोणाचा सर्वात रहस्यमय भाग म्हणजे 'सारागासो' समुद्र. या सागराला आगबोटीची स्मशानभूमी असे संबोधले जाते. कारण या समुद्राच्या तळात कित्येक बोटी व जहाजे रहस्यमयरीतीने बुडाल्या आहेत. महत्त्वाची गोष्ट अशी की हा समुद्र अतिशय शांत व संथ आहे. या समुद्रामध्ये सारगासम नावाची वनस्पती विपुल प्रमाणात राहते. ह्या वनस्पतीमुळेच ह्या सागराला सारागासो समुद्र असे नाव पडले आहे. अ‍ॅटलांटिस नावाचा पूर्वी जो पृथ्वीवर खंड होता, तो हाच खंड. ह्या समुद्रतळाशी खेचला गेला असावा. ह्या खंडावर निसर्गसौंदर्य व वनस्पती विपुल प्रमाणात होत्या. त्याचाच परिणाम ह्या भागात सारगासम वनस्पतीचे जाळे निर्माण झाले असावे. हा उत्तर अटलांटिक महासागरचाच एक भाग आहे. तो वेस्ट इंडीज बेट व अझोर्सच्या मध्ये आहे. 'जहाजांची दफनभूमी' समजल्या जाणाऱ्या ह्या सारागासो समुद्रात नाहीशा होणाऱ्या जहाजांची नोंद १८६०सालापासून वाढत्या प्रमाणावर होऊ लागली. दळणवळणाच्या प्रगत तंत्रांमुळे हे प्रमाण बहुधा वाढलं असावं. सारागासो समुद्राच्या तळाशी प्रत्येक युगातली जहाजं बोटी आहेत. असा एक समज आहे की, पूर्वींच्या फिनिशिअन्स व्यापाऱ्यांच्या बोटींना चांदीचे नांगर होते व काही जहाजे तर सोन्याने गच्च भरलेली होती. ही सर्व जहाजे व आगबोटी त्यातील अवाढव्य खजिन्यांसह सारागासो समुद्राच्या तळाशी अक्षरश: तळ ठोकून बसल्या आहेत. कारण, त्यांची जोपासना खलाश्यांचे सापळे सतत

करीत असतात. (तेथील वदंता आहे.)

अमेरिकेतील सेंट लॉरेन्स जहाजाच्या होकायंत्राचे काटे वेडेवाकडे फिरतात; त्याचे कारण कदाचित तेथे लोखंडाचा खूप मोठा साठा तळाशी बुडालेला असावा किंवा खूप मोठा खंड बुडाला असावा असे शास्त्रज्ञांचे मत आहे.

बर्म्युडा ट्रँगल परिसरातीलच एक विचित्र व गूढ गोष्ट म्हणजे "मोझेल खडक " (अँद्रोस बेटांच्या जवळ) ह्या खडकावर रात्रीच्या वेळी रहस्यमय व गुढ असे प्रकाश दिसतात ! हे प्रकाश अनेक वैमानिकांनी व खलाशांनीसुद्धा पाहिले आहेत. हा प्रदेश झपाटलेला आहे असा येथील बिमिनीमधील स्थानिक कोळ्यांची समजूत आहे. शास्त्रज्ञांना मात्र ह्यातही अपयश पदरी पडले आहे. अमेरिकेमधील ह्या भागत ज्यांना विचित्र अनुभव आले, त्यांचे अनुभव चित्तथरारक व अंगावर रोमांच उभे करणारे आहेत. अमेरिकेमधील कित्येकांनी या प्रदेशात व अमेरिकन संरक्षण प्रयोगशाळांच्या आसपास उडत्या तबकड्या पाहिल्या आहेत. ह्या तबकड्यांमध्ये प्रचंड मॅग्नेटिक शक्ती असावी व त्याच्या प्रभावानेच विमानांचे व जहाजांचे काटे वेडेवाकडे फिरत असावेत व जहाजांची जनरेटर्स बंद पडत असावीत ! कित्येकांच्या अनुभवावरुन ह्या तबकड्या आकाशात नाहीशा होतात व नंतर सर्व काही पूर्ववत होते. ह्या तबकड्या आकाशात नाहीशा होताना आकाशात मोठा काळा डाग दिसतो. त्यात ह्या तबकड्या जातात व नंतर हा डाग पुसट होत असतो. व आकाश पूर्ववत होते व चांदण्या दिसू लागतात. ह्या तबकड्या कोणी एकेकट्या पाहिल्या तर काहींनी दोन्ही, तीन चार ह्या संख्येतही पाहिल्या आहेत. ह्या तबकड्या केवळ आकाशात नव्हे तर समुद्राच्या पाण्याखालीही पाहिल्या गेल्या आहेत. अमेरिकन नाविक दलांची युद्ध चाचणी चालू असताना त्यांना समुद्रात सिगारेटच्या आकाराची व पाणबुडीएवढी मोठी वस्तू त्यांच्या जहाजाखालून जाताना दिसली, तेव्हा हा चाचणीचाच एक भाग असावा असे त्यांना वाटले. ती वस्तू जहाजाबरोबर ५० नॉट ह्या वेगानं काही वेळ गेली व नंतर अचानक वेग वाढवून (सुमारे १००० ते १५०० नॉट) ह्या वेगाने अचानक समुद्रात नाहीशी झाली. नंतर चौकशी केली असता तो चाचणीतील भाग नव्हता हे स्पष्ट झाले.

विमाने व बोटी नाहीसे होण्याचे आणखी एक संभाव्य कारण म्हणजे युद्धातले टॉरपीडोज व समुद्रातील माइन्स. त्या कुठेतरी भरकटत जाऊन फुटतात. पण असे असेल तर संभाव्य अपघात जगातील समुद्रात कुठेही व्हायला हवेत; परंतु ते बर्म्युडा भागातच का व्हावेत ? बरे झाले तरी अपघातातील कोणतेच अवशेष सापडत नाहीत ! तेव्हा ते कारण चुकीचे वाटते.

समुद्रात कधी कधी तर फक्त बोटीवरील खलाशी व प्रवाशीच नाहिसे झालेले आढळले ! म्हणजे बोटीवरला माल व बोट एकदम सुरक्षित पण त्यातील माणसेच गायब ! पुढे त्यांचा पत्ताही लागत नाही व प्रेतेही सापडत नाहीत. एका बोटीवरील तर डिनर रूममध्ये टेबलावर वाढून ठेवलेली ताटेही तशीच होती; मात्र माणसे नव्हती ! एका बोटीवर साळुंकी व कुत्रा असे प्राणीसुद्धा सुरक्षित सापडले; परंतु पोपट मात्र नाहीसे झाले; कारण पोपट हा केवळ एकच प्राणी माणसाप्रमाणे बोलू शकतो !

समुद्रात जसे वेगवेगळ्या दिशेने प्रवाह वाहतात तसेच प्रकार आकाशात, हवेतसुद्धा असतात. त्यामुळे वैमानिकांनासुद्धा कधीकधी चमत्कारिक अनुभव येतात. वातावरण एकदम शांत असते. आकाशात तारे लुकलुकत असतात. चांदीच्या ताटासारखा चंद्र आकाशात तरंगत असतो. सर्व काही आलवेल असते. तेवढ्यात विमान झपकन् समुद्राच्या (जमिनीच्या) दिशेने जाते व तेवढ्याच वेगाने आकाशात भिरकावले जाते किंवा विमान एखाद्या भिंतीवर आपटल्यासारखे होते त्याला CAT (Clear Air Turbulence) म्हणतात.

अशा प्रकारे सर्वांच्या मतानुसार अनेक जी कारणे ह्या प्रदेशातून गायब होणाऱ्या विमान व बोटींबद्दल दिली. गेलेली आहेत, त्यांचा सविस्तर अभ्यास केला व चहूबाजूंनी विचार

केल्यास एक - एक कारण आपल्याला गाळत जावे लागते व आपण येऊन ठेपतो ते ह्या निष्कर्षाप्रत की ह्या भागात अवकाशातून वा सागरातून इतर मानवी शक्ती वा U. F. O. द्वारे हे काम केले जात असावे. किंवा आपल्यापूर्वी जी संस्कृती ह्या भागात नष्ट झाली, ती आपणापेक्षा अतिशय प्रगत होती. खगोलशास्त्राविषयी त्यावेळी माहिती होती, तसेच अणूंच्या विघटनापासून बनणारी शक्ती ते वापरीत असत. हे काही धर्मग्रंथातील कथांवरून आढळते. अशाच प्रकारची एखादी अणुभट्टी वा एखादे प्रचंड शक्तीचे जनरेटर्स ह्या भागात बुडाले असावेत व समुद्रातील उलथापालथींमुळे हे कार्यरत होत असावेत.

काही अमेरिकन शास्त्रज्ञांनी मॅग्नेटिक फिल्डचा काही प्रभाव त्यावर पडतो का हे पाहण्यासाठी समुद्रात एक प्रयोग केला. त्याला "फिलाडेल्फिया एक्सपेरिमेंट" असं म्हटलं जातं. हा प्रयोग करताना अत्यंत गुप्तता राखण्यात आली होती. १९४३ साली फिलाडेल्फियानजीक अमेरिकन आरमाराच्या देखरेखीखाली गुप्तपणे हा प्रयोग घडवून आणला गेला. एखाद्या समानव जहाजावर अत्यंत प्रबळ चुंबकीय क्षेत्राचा काय परिणाम होतो याची कसोटी घेणं हे उद्दिष्टं होतं. शक्तिमान चुंबकीय जनरेटर्सच्या सहाय्याने हा प्रयोग घडवून आणण्यात आला. त्याप्रमाणे फिलाडेल्फिया बंदरातील एक जहाज या प्रयोगासाठी निवडण्यात आलं. या जहाजावर खलाशीपथक पाठविण्यात आलं. नंतर मग 'पल्सेटिंग' व 'नॉनपल्सेटिंग' या दोन्ही प्रकारच्या जनरेटर्सच्या सहाय्याने त्या जहाजावर आणि त्याच्या भोवताली भयंकर जबरी असे चुंबकीय क्षेत्र निर्माण करण्यात आलं. प्रयोगास सुरुवात होताच जहाजाभोवती विशिष्ट प्रकारचा हिरवट धुकट असा प्रकाश पसरू लागला. (बर्म्युडा ट्रँगलच्या तडाख्यातून सहीसलामत बचावून आलेल्या लोकांनी त्या त्या विशिष्ट प्रसंगी चमकदार हिरवट प्रकाश आणि धुके आपल्याभोवती पसरले होते असं सांगितलं आहे). वरील जहाजाच्या प्रयोगाच्यावेळीसुद्धा नेमका हाच प्रकार घडला. थोड्या वेळानंतर ते संबंध जहाज त्या हिरवट धुक्यात बुडून गेले. आणि त्यानंतर त्या वरच्या खलाशांसह ते हळूहळू अदृश्य होऊ लागलं. हिरवट धुक्यात गडप होणारे ते जहाज बंदरपासून दूरदूर जात आहे असं तेव्हा प्रयोग पाहाण्यासाठी जमलेल्या निरीक्षक अधिकाऱ्यांना भासमान होऊ लागले व खरोखर बघता बघता ते जहाज त्या हिरवट धुक्यात अदृश्य होऊन गेले. फक्त त्याचा प्रवास-मार्ग दाखविणारी पाण्यातली रेषाच काय ती दिसत होती. काल-ताणाच्या सिद्धांताशी संबंधित असलेल्या त्या जहाजाच्या चाचणी-प्रवासातील हा बहुधा दृक्चमत्कार असावा. नंतर ह्या सर्वांना एका विशिष्ट तंत्राने त्यांना पुन्हा दृश्य स्वरूपात परत आणण्यात आलं. त्यासाठी एका खास पद्धतीने बनविण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा उपयोग करावा लागला. ह्या प्रयोगासाठी U. F. O. चा अभ्यास करणाऱ्या संशोधकाने मदत केली होती. त्याच्याकडे U. F. O. संबंधी काहीतरी गुप्त व गूढ माहिती मिळाली होती. परंतू हा (शास्त्रज्ञ) संशोधक त्याच्या मोटारीत बेशुद्धावस्थेत अमेरिकेतील एका रस्त्यावर सापडला. त्याची वाचा गेली होती व त्याच्याकडची गूढ माहितीसुद्धा गायब झाली होती. नंतर काही वेळातच तो हे जग सोडून गेला.

ह्या अशा प्रकारचे चुंबकीय क्षेत्र हे U. F. O. आपल्या विमान व जहाजावर त्यांच्यावरती निर्माण करत असावीत व त्यांना पृथ्वीच्या कक्षेच्या बाहेर त्यांच्या कक्षेत ओढून नेत असावीत! जमिनीवरील माणसांवर प्रयोग करण्यासाठी किंवा पृथ्वीवरील माणसांचा वा वस्तूंच्या बनविलेल्या झु ठेवण्यासाठी हा त्या संदर्भात एक खुलासा असू शकेल.

मुख्य गोष्ट म्हणजे ७० ते ८० टक्के विमाने व जहाजे गायब होण्याचा काळ हा नाताळ जवळपासचा असतो. म्हणजे नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी तसेच जून, जुलै हे आपल्याला गायब झालेल्या विमानांच्या व जहाजांच्या गायब होण्याच्या दिनांकावरून आढळते. कारण ह्या काळात तेथे अनेक प्रवासी सहलीसाठी येत असतात.

# साक्षर मी झाले

**शैलजा मनोहर डंके**
तृतीय वर्ष कला

पात्रे — १) शेवंता : एक खेडवळ अशिक्षित स्त्री
२) सुप्रिया : एक समाजसुधारक
३) किशोर : शेवंताचा मुलगा
४) डॉक्टर, ५) नर्स, ६) कमला.

**शेवंता :** प्रिया ऽऽऽ ये सुप्रिया हायस का बाय घरात ?

**सुप्रिया :** काय काकू या आत या. मी घरातच आहे.

**शेवंता :** हे बघ मी पाटी अन् पेनशील आणली हाय, धर ही - अन् मला शिकीव लिहाया, वाचाया.

**सुप्रिया :** (आश्चर्याने) काकू तुम्ही ! अन् शिकणार ! अहो मागच्या महिन्यात मी तुमच्याकडे, तेव्हा तुम्ही मला काय बोलला होता आठवतं तुम्हाला ?

**शेवंता :** व्हय ग बाय ! तवा माझं लय चुकलं बघ. तुझी माफी मागते बघ मी.

**सुप्रिया :** नाही काकू, माफी नका मागू, तुमच्यापेक्षा मी लहानच आहे.

**शेवंता :** नाय ग प्रिया ! म्या मागच्या महिन्यात तुझ्याशी कसे वागले हे अजूनही मला आठवतंय बघ ! अगदी डोळ्यासमोर तो प्रसंग दिसतोय.

( एक महिन्या अगोदरचे दृश्य)

**सुप्रिया :** काकू ऽ ओ काकू ऽऽ येऊ का ?

**शेवंता :** ये ग बाय ये, काय म्हणतीस ? बैस. गरम, गरम भाकर-भाजी खातीस का ?

**सुप्रिया :** नाही काकू मी जेवायला नाही आले, माझं तुमच्याकडे एक काम आहे ?

**शेवंता :** काय काम आहे बाय ?

**सुप्रिया :** हे पहा काकू तुम्ही जेव्हा, जेव्हा तुमचे पत्र येते, तेव्हा दुसऱ्यांकडून वाचून घेता. तुम्हाला असं नाही वाटत, तुम्ही स्वत: हून लिहावं, वाचावं ?

**शेवंता :** इस ! मी शिकून काय करू ? तुझं बाई काहीतरीच ! आर्ध आयुष्य सरून गेलं आता काय करू शिकून ?

**सुप्रिया :** तसं नाही काकू तुम्ही शिकलात म्हणजे तुम्हाला कुणी फसविणार नाहीत, बाजारात भाजी घेताना, धान्य आणताना, तुम्हाला पैसे स्वत:हुन मोजता येतील.

**शेवंता :** ते समदं खरं हाय; पर आपल्या गावची मानसं साधी भोळी. कोण कुणाला कशाला फसवील ? अन् हे बघ प्रिया मला येळ बी मिळणार नाही शिकायला. आता जायचं पाटलाची भांडी घासायला. नवरा दारू पिऊनशान धूत पडतो. घरामंदी सर्व

पोटापाण्याचं मला बघावं लागतंय मग म्याच शिकत बसले तर घराचं माथेरं होईल ! माझ्या शिकुन मला कोन दोन येळंची भाकर फुक्ट देणार हाय का ?

**सुप्रिया :** पण काकू जरा ऐका ........

(तिचे शब्द तोडून मध्येच शेवंता म्हणते)

**शेवंता :** ये प्रिया, तुजं ते राहू दे, काहीतरी खुळ अन् गावभर फिरायचं ! मला जायचंय भांडी घासायला. चल जाऊ दे मला......

**सुप्रिया :** आता ते मागील महिन्याचं राहू द. मला सांगा तुमचा विचार एवढा बदलला कसा ?

**शेवंता :** आग पोरी, त्या दिवशी न जाणो कुणाचं तोंड सकाळी पाहिलं ! अगं माझ्या पोराला – म्हंजी किशोरला – ते पाटलाचं कुत्रं चावलं. मुडदा बशिवला त्या कुत्र्याचा !

**सुप्रिया :** काकू असं काय बोलता, मला सांगा कुत्रं चावलं कसं ?

**शेवंता :** माझा किशोर गोट्या खेळीत होता ग तवा त्या पाटलांचं कुत्रं अचानक मागून आलं अन् चावलं की त्याच्या पायाला, मग मी त्याला माझ्या किशोरला घेऊन दवाखान्यात गेले. दवाखान्यात गेले पोराला बरं करण्याकरिता. पर जे घडलं ते अजून माझ्या डोळ्यासमोरून हटत नाहीये.

(दवाखान्यातील प्रसंग)

**शेवंता :** ओ दाक्दर, ओ दाक्दरसाहेब माझ्या पोराला कुत्रं चावलंय बघा हो जरा !

**डॉक्टर :** 'काय हे बाई ! तुम्ही ओळीमध्ये या आणि प्रथम केसपेपर काढा.'

**शेवंता :** केसपेपर, हे काय आहे ना.

**डॉक्टर :** अहो पण नंबरने या.

**शेवंता :** कसला नंबर अन् कसलं काय माझं लेकरु इथं रडतंय त्याचं कुणाला काय नाय !

**डॉक्टर :** हं, या आता. तुमचाच नंबर आहे.

**शेवंता :** हे बघा, कुत्रं चावलं माझ्या पोराला. दाखीव रे किशोर बाळा.

**डॉक्टर :** हं बरंच चावलंय तिथं ती 'नर्स आहे ना. तिला हा केसपेपर दाखवा. ती तुमच्या मुलांना इंजेक्शन देईल. चला पुढचा नंबर......

**शेवंता :** ये पोरी, हे धर हा पेपर अन् दे माझ्या पोराला इंजेक्शन, जरा हळू दे बरं का !

**नर्स :** हं बघू ! चला, आत लवकर चला हो, किती नंबर आहेत मागे, काहीच सुचत नाही. बरं तुम्ही तिथला फलक वाचला ना ?

**शेवंता** (मनाशीच म्हणते : फलक कसला ? पर आता नाय कसं म्हणायचं, पोराला बघायचं सोडून फलक कसला वाचायचा ? मला वाचता बी येत नाही, पर हिला कशाल सांगायचं जाऊ दे) व्हय, व्हय वाचला.

**नर्स :** हं, झालं बाय इंजेक्सन देऊन. अजून दोन दिवसांचं दिलं की झालं समदं.

**किशोर :** आये ! ये आये ! कसंतरी होतंय चक्कर येतीया.

**शेवंता** या:बया ! काय झालं रे लेकरा ? ये पोरी, ये नरस बाय, हे बघ माझं 'पोर कसं करतंया !'

**नर्स :** (तपासते) तुम्ही ह्याला इंजेक्शनच्या अगोदर खायला काही दिलं नाही का ?

**शेवंता :** अं ! नाय बाय. तुम्ही कुठं म्हणालात खावून

या !

**नर्स :** कमाल आहे बाई तुमची ! मगाशी तुम्हाला मी फलक वाचला का म्हणून विचारलं तेव्हा हो म्हणालात मग.....

**शेवंता :** अंहो, पण मला वाचता कुठं येतंया ? काय लिव्हलंय त्यावर ?

**नर्स :** त्यावर स्पष्ट लिहलंय इंजक्शन घ्यायच्या अगोदर खावून येणे, नास्ता करून येणे. समजलंत. उगाच हो म्हणाला आणि आता पोरगं बघा कसं करतंय.

**शेवंता :** परं ये बाय, तू मला स्पष्ट सांगायचं पोराला नाश्ता करून आणा.

**नर्स :** इथे १०० पेशंट येतात, प्रत्येकाकडे व्यक्तिगत बघितल्यावर एक पेशंटला बघायला १० दिवस लागतील. बरं हे ग्लुकोजचे पाणी त्याला पाजा आणि ही फळं थोडी खायला घाला.

(शेवंताने हळूहळू ग्लुकोजचे पाणी किशोरला पाजले. आणि नंतर तो बऱ्यापैकी शुद्धीवर आला.)

**शेवंता :** (स्वत:शीच) हे देवा, तुझं लय उपकार रे ! नाहीतर माझं लेकरू आज.........

हे समदं घडलं ते केवळ मला वाचता येत नाही म्हणून ! आता आजच मी जाते त्या प्रियाकडे, हो आता जायलाच पाहिजे.

**किशोर :** आये, ये आय ! काय म्हणतेस ग ?

**शेवंता :** काय नाय रं पोरा, काय नाय.

**सुप्रिया :** काकू म्हणजे एकंदर तुमच्या मुलावर जो वाईट प्रसंग आला, त्यावरून तुम्हाला पटलं की शिकणं महत्वाचं आहे.

**शेवंता :** अग फक्स्त मलाच नाही हे कळतं माझ्या शेजारची कमला नाय का, अग तीच्या पोराला परवा ताप आला ना, तवा दाक्दरने चॉकलेटी रंगाच्या बाटलीमंदी औषध दिलं पर ह्या कमलाच्या घरी ४, ५, चॉकलेटी रंगाच्या बाटल्या. दाक्दरच्या बाटलीवर औषधाचं नाव होतं पर तिला कुठं वाचता येतंय तवा तिनं चुकून भलतंच काय तरी औषध म्हणून दिलं. तीचं पोर नंतर बरं झालं पर हे समदं घडलं ते केवळ न शिकण्यामुळ घडते हे तिलाबी कळलं तवा तू पहिल्यांदी मला शिकिव, मग मी समद्या चाळीतल्या बायकांस्नी शिक्षनाचं महत्त्व सांगीन बघ !

**सुप्रिया :** चला, म्हणजे आता तुम्ही शिकल्यावर सगळी चाळ शिकेल. हळुहळु सर्वच शिकतील. अन् सगळं गाव साक्षर होईल. खरंच असं प्रत्येक गाव साक्षर व्हावे.

**शेवंता :** बरं आता, गप्पा लय झाल्या. मला अगुदर ते 'अ, आ..... ' समदं शिकव बरं मला लवकर शिकव बरं मला लवकर शिकून शहाणं व्हायचंया.

**सुप्रिया :** चला, शुभकामाला वेळ कशाला ? हे पहा, हा असा 'अ' अननसाचा आणि 'आ' आईचा. तुमच्यासारख्या प्रेमळ किशोरच्या आईचा 'आ' !

(थोड्याच दिवसात काकूंना लिहिता-वाचता येऊ लागते. अन् नंतर एक दिवस शेवंता सुप्रियाकडे धावत धावत कुठल्या तरी आनंदात, उत्साहात येताना दिसल्या.

**शेवंता :** प्रिये ऽ ये सुप्रिया ! अग लवकर बाहेर ये पोरी ! अग आज लय आनंद झालाय बघ मला.

**सुप्रिया :** एवढं झालं तरी काय सांगा लवकर !

**शेवंता :** अग, आज मला माझ्या शिक्षनाचं फळ मिळालं. लय लय उपयोग झाला बघ.

**सुप्रिया :** झालं काय ते तरी सांगा.

**शेवंता** अग ! दिवाळीचा सण, माझ्या भावानं मला भाऊबीज धाडली, तो पोस्टमास्तर स्वत:ला लय शहाणा समजीत होता.

**सुप्रिया :** पोस्टमनने मनीऑर्डर आणली होती काय ?

**शेवंता :** हां ते मनीऑर्डर का काय ते आणलं बघ. ५० रु. भाऊबीज पाठवित हाय असं भावानं चीठ्ठीत लिवलं होतं. अन् पोस्टमास्तरने १० च्या ४च नोटा दिल्या ! म्हंजी चाळीस रु. दिलं. अन् म्हणाला हे घ्या ५० रु. म्या म्हटलं हा हा, पोस्टमास्तर, हे काय ५० रु. नव्हत. हे ४० रु. हायत. तुम्ही १० रु. सवताच्या खिशात घातले. मला फसवू नका. आता आम्ही बायका अडाणी नाय.

**सुप्रिया :** मग काय म्हणाला तो शहाणा ?

**शेवंता :** तो म्हणाला काय नाय, पर भ्याला लय. मीं त्याला म्हटलं ही चूक पन: करू नगं चाळीतल्या बायका समद्या आता शिकनार हायती.

**सुप्रिया :** बघा काकू तुम्ही जर आज अडाणीच असता तर फसला गेला असता !

**शेवंता :** व्हय ग ! आता मी माझ्या किशोरला बी 'साळंत पाठविते. पहिल्यांदी त्याला शेतावर कामाला पाठवायचे; पर आता रोज साळंत जातं माझं पोरगं पैसां मिळायचा म्हणून मी त्याला कामावर पाठवायचे; पर आता कळतंय, पैसा आज हाय उद्या नाय, पर शिक्षण सदैव आपल्या उपयोगी पडतं..

**सुप्रिया :** हो काकू शिक्षण ही एक प्रकारची भविष्याची बचतच आहे. त्याची फळे खूपच गोड मिळतात. बरं चला काकू आता संपूर्ण चाळीला सुशिक्षित करण्यासाठी प्रयत्न करू ! ईश्वर पाठी आहेच आपल्या.

**शेवंता :** व्हय ग प्रिया परमेश्वर जिथं सुविद्या तिथं. चल बाय बीगी बीगी.

**सुप्रिया :** होय काकू लवकर तर जायलाच हवं कारण अज्ञानाचा अंधार आपल्या देशात खूप आहे. ह्या अंधाराला घालविण्याकरिता सूर्याच्या तेजाइतके बळ जरी आपल्यात नसले तरी पणतीइतके बळ आहे. पणतीने पणती प्रज्वलित करू अन साक्षरतेचा उजेड या अंधारमय जीवनात पसरवू ! चला........ !

# गतानुगतिको लोको.......

मङ्गला सदानंद सोमण
द्वितीय वर्ष, शास्त्र

पुरा अङ्गदेश नाम्नि राज्ये रन्तिदेवः नाम कोऽपि भिक्षुकः आसीत् । तस्य गृहे तस्य योगक्षेमत्राहनार्थं कोऽपि नासीत् । स पतिदिनं प्रातःकाले उत्थित्वा नद्यां स्नात्वा देवं नत्वा च भिक्षाटनमकरोत् । तदेकमेवं तस्योपजीविकायाः साधनम् । गृहे आगत्वा भोजनं करणीयं तथा यत्किमपि द्रव्यं प्राप्तं तत्सर्वमेकस्मिन् ताम्रभाजने स्थापनीचमिति तस्य दिनक्रम एव । एकवारं गङ्गातीरे गत्वा गङ्गायां स्नात्वा पापक्षालनं करणीयमिति तस्य तीव्रा इच्छा। अतः द्रव्य सञ्चनमावश्यकम् ।

तत्समयं पर्यटनार्थं वाहनानि नासन् अतः पद्भ्याम् एव सर्वत्रं गन्तव्यम् । रन्तिदेवः बहु द्रव्यं सञ्चयति गङ्गा. स्नानार्थं प्रस्थानं च करोति । द्रव्यभाजनमापि नयति तेन सह ।

चिरकालानन्तरं रन्तिदेवं गङ्गातटे आगच्छति । बहु समाधानं तस्य मनसि। अधुना शुद्धोदकस्नानमिति ध्येयमेकम् । परं द्रव्यसञ्चितं ताम्रभाजनं कुत्र स्थापनीयम् इति तस्य. चिन्तायाः विषयः कारणं रन्तिदेवस्य अनुपस्थितौ द्रव्यभाजनं द्रष्टुं प्रातःकाले तत्र गङ्गातटाके कोऽपि नासीत् । अतः "किं करणीयम् ? यदि कोऽपि चोरः चोरयति तर्हि ?" इत्थं विचिन्तयित्वा तेन युक्तिरेका व्यरचि । ताम्रभाजनं सुरक्षार्थं गङ्गातटे वालुकाप्रदेशे कुत्रापि भूम्यामन्तर्भागे स्थापनीयमिति सा युक्तिः । अपितु, 'कथमहं पश्चात् जाने कुत्र मया भूमिः खनिता कुत्र च निधिः निक्षेपितः.?' तस्मात् तेन मृत्तिकायाः शिवलिङ्गं भाजनस्योपरि कृतं सुखेन च नद्यां स्नानार्थं गतः ।

किञ्चित्समयानन्तरम् एकः भक्त : स्नानार्थं तत्रागतः । स पश्यति, एकः मनुष्यः स्नानं करोति, एकं च शिवलिङ्ग रचयति तत्र । स चिन्तयति यद् स्नानार्थं गमनात्पूर्वम् अत्र तीरे वालूकायाः शिवलिङ्गं करणीयम् इति परम्परा क्वचित् । अतः सोऽपि शिवलिङ्गं कृत्वा स्नानार्थं गच्छति । पश्चात् पुनरेको स्नानार्थमागच्छति । द्वौ पुरुषौ - द्वे शिवलिङ्गे - दृष्टवैव सः अपि अपरं शिवलिङ्गं रचयित्वा नद्यां गच्छति ।

. . . . . एवं यदा रन्तिदेवः स्नात्वा होराद्वयानन्तरमागच्छति बहु शिवलिङ्गानि पश्यति । अनेकानि शिवलिङ्गानि कथं समद्भूतानि इति सम्भ्रान्तः । नद्याम् अनेकाञ्जनान् पश्यति। शत-द्विशतनां शिवलिङ्गानाम् उत्खननमपि अशक्यम् । सर्वैः जनैः कारणमज्ञात्वैव शिवलिङ्गानि कृतानि । रन्तिदेवो बहुदुःखम् अन्वभवत् । तस्य ताम्र-द्रव्यभाजनं गतम् । अतः सः दुःखपूरितेन स्वरेण अवदत् –

" गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ।
गङ्गासैकतलिङ्गेन नष्टं मे ताम्रभाजनम् ॥"

# निष्ठा

वेगवेगळ्या वातावरणात
सरडा जसे रंग बदलतो
तशा बदलतो आम्ही आमच्या निष्ठा
स्वार्थाच्या घाणेरड्या तलावात
मारतो डुबकी नव मोती शोधण्यासाठी
रामराज्याचं उदाहरण देत
आम्ही करतो लंकापती रावणाची पूजा
लाचारीच्या कळपात सामील होताना
मारतो आम्ही आतले मन
साऱ्या नैतिक सुखासाठीच
बसवतो देव्हाऱ्यात - नीतिशून्य पाषाण
आणि करीत असतो पूजा
पाषाणांना साक्षी ठेवून

**प्रविण मातुसे**
प्रथम वर्ष, वाणिज्य

# विरहिणी

काळ्या मेघांनी झाकाळले नभ
आठवणींनी तुझ्या ओथंबले मन
सुसाट सोसाट्याचा बेभान वारा
सोसवता सोसवेना तव दुरावा
सैरभर आल्या अवखळ बटा
सलतो उरीं स्पर्शाचा काटा
क्षणात कोसळतील अमृतधारा
तृप्त होऊनी आचवेल धरा
अशा धुंद रम्य वातावरणी
अश्रू गोठविते मुकी विरहिणी ॥

**मरळे सुनिल मारुतराव**
एम. कॉम., द्वितीय वर्ष

# जीवनाचे गणित

सौंदर्य सुस्वभाव यांची बेरीज करा;
आणि मैत्रीतून मत्सर वजा करा.
प्रेमाला शुद्ध अंत:करणाने गुणा
आणि परनिंदेचा लघुत्तम काढा.
सुविचारांचा सतत वर्ग करीत रहा
आणि दया, क्षमा, शांती, नित्य जपा
नीती अनीतीचे समीकरण मांडून
सुखी जीवनाचे गणित सोडवून पहा.

**मरळे सुनिल मारुतराव**
एम. कॉम., द्वितीय वर्ष

# माझी प्रेयसी

खूप प्रेम आहे माझे तिच्यावर
ठाऊक नाही तिचे आहे कुणावर
वयात येताच तिच्यावर आसक्त झालो
तिच्यासाठी वणवण भटकलो

दर्शन देईना ती मला का कोण जाणे !
माझ्याच बाबतीत निष्ठूर कसे नियतीचे लेणे ?
जरी रागावली असेल ती माझ्यावर
विसरणार नाही तिला मी जन्मभर
करित राहीन सदैव तिचीच चाकरी
कधी ना कधी भेटेल मला माझी प्रेयसी 'नोकरी'

**नंदकुमार कांबळे**
एम. कॉम. प्रथम वर्ष

* * *

# अभिव्यक्ती

शिल्पकाराच्या शिल्पाला,
कोणतीच भाषा येत नसते
तरीही ते शिल्प,
खूप काही सांगत असते.

चित्रकाराच्या चित्राला,
कोणतीच भाषा माहीत नसते
तरीही ते चित्र
खूप काही बोलत असते.

अन् असंच काही प्रेमाला
कोणतीच भाषा येत नसते
अन कोणतीच भाषा माहीत नसते
तरीही मनात जे असते,
ते सर्व नयनातून त्या,
अभिव्यक्त होत असते.

**विजय नारायण गायकवाड** एम. कॉम., द्वितीय वर्ष

# प्रतीक्षा

शांत सागरी किनारा
वेडा पिसाट वारा
आज भासतो आहे
सागराचा सूरही न्यारा

उठविती रोमांच अंगी
नाजूक सागरी तुषार
बदलला रंग नभाचा
चालला परतुनी रविकर

असा एकांतही भासतो
भयाण मजला
उडवित केस माझे
वाराही छळिता झाला

वाट पाहुनी तुझी
डोळे थकुनी गेले
रेशमी स्पर्श तुझा
अनुभवाया मन आतुरले

**डी. एस. क्षीरसागर**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# घरटे

उंच आभाळी भरारी मारणाऱ्या
पाखराला,
आधार असतो जमिनीवरील घरट्याचा
घरट्यातून बाहेर पडताना प्रेरणा असते
घरट्याचीच
उंच आभाळी भरारी मारण्यासाठी आणि.........
उंच आभाळी गेल्यावरही ओढ असते
फक्त घरट्याचीच
कारण ते असते त्याचे स्वतःचे
घरटे, त्याला प्रेमाने सांभाळणारे
विजयाचे कौतुक करणारे तर
पराजयाचे अश्रू पुसणारे, सांत्वन करणारे
पण ............
या घरट्यानेच जर आसरा नाकारला
पाखराला तर
तर बिचारे पाखरू कोलमडून पडते
कोणीतरी पंख छाटल्यागत
एकदम उंच आभाळातून जमिनीवर कोसळते
कारण
पाखराचा आधार असते
फक्त त्याचे घरटे, त्याचे स्वतःचे घरटे
त्याला प्रेम लावणारे, त्याच्यावर माया करणारे (?)

**डी. एस. क्षीरसागर**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# अंत

सुंदर ही शहरनगरी,
शिवू पाहते गगनाला,
कोण विचारते कोणला,
मोल फक्त पैशाला,
माणूस मारतो माणसाला,
नाही किंमत माणुसकीला,
दिवस जातो, रात्र जाते,
सारे जीवनच कष्टात जाते
फिकिर नाही कोणाला,
सर्वांनीच कवटाळले स्वार्थाला
सुंदर ह्या जीवनी
कोणीही नाही समाधानी
निघालेत हे स्टार वॉरला
घेऊन एक एका भयंकर आयुष्याला
फिकिर नाही याची कोणाला
अरे ! क्षणही नाही लागणार......
ह्या विश्व-अंताला.

**विजय नारायण गायकवाड**
एम. कॉम., द्वितीय वर्ष

* * *

*चाललास ? निघून जाताना*
*धरीत नाही मी मनी राग*
*उजाड करुनी जीवन माझे*
*काय मिळवलंस तेवढंच सांग... ?*

**शोभा पाटील**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# दगड

दगड कधी रडत नसतात
दगड कधी बोलतही नसतात
दुसरा ठेचाळतो तेव्हा;
दगड फक्त हसत असतात.

काही माणसेही अशीच असतात
कधीच कोणाला,
काही चांगलं सांगत नसतात,
दुसरा चुकतो, ठेचाळतो तेव्हा
त्याला पाहून फक्त हसत असतात

काटे कधी जवळ येत नसतात,
अन् जवळ येऊही देत नसतात,
आणि कोणी केव्हा जवळ आलेच
तर लगेच टोचून रक्तबंबाळ करतात
आणि 'त्या' रक्तबंबाळ हाताला पाहून
ती फक्त हसत असतात

काही माणसेही अशीच असतात
कधीच कोणाला जवळ येऊ देत नसतात
आणि कोणी केव्हा जवळ आलेच
तर आपल्या तीक्ष्ण शब्दांनी लगेच वार करतात
आणि 'त्या' रक्ताळलेल्या मनाला पाहून
ती फक्त हसत असतात.

तुम्हालाही वाटतं अन् मलाही वाटतं
जे घडतं ते अगदी वाईट घडतं
म्हणून........
दगडांनी थोडं बोललं पाहिजे,
अन् काट्यांनी हळूच जवळ आलं पाहीजे.

**विजय नारायण गायकवाड**
एम. कॉम., द्वितीय वर्ष

# हे असेच का ?

मनी-मनी आज असे हास्य का ?
हे असेच का होते मला कळेच ना !
मनाची ही अशी वेडी अवस्था का ?
हे असेच का होते मला कळेच ना !
दृश्यांची स्पंदने आज अशी बेहोश का ?
हे असेच का होते मला कळेच ना !
नयनासमोर सतत तुझेच रूप का ?
हे असेच का होते मला कळेच ना !
तुझाच सहवास आज मला प्रिय का ?
हे असेच का होते मला कळेच ना !
सगळे जग आज आनंदी का ?
हे असेच का होते मला कळेच ना !
सांग सखे तू सांग मला,
यालाच 'प्रेम' असे म्हणतात का ?
हे असेच का होते मला कळेच ना !

**विजय नारायण गायकवाड**
एम. कॉम., द्वितीय वर्ष

* * *

*विसरला जरी मला तू*
*तुला विसरणे अवघड जाते,*
*तू रंगविले नाटक पण*
*मी प्रेम केले होते !*

**शोभा पाटील**
तृतीय वर्ष, वाणिज्य

# हिंदी विभाग

# धर्म क्या है ?

भारती स. कोळी
११ वी कला

धर्म है मनुष्य के पार जाने का विज्ञान । धर्म न हो तो मनुष्य, मनुष्यही रह जाएगा । और मनुष्य का मनुष्य रह जाना ही दु:ख है; क्योंकि मनुष्य अधूरा है । अधूरेपन में पीडा है । मनुष्य होकर कोई तृप्त नहीं हो सकता ।

हम जहाँ है, जैसे है, वहाँ से आगे जाना होगा । आगे बढ़ने की कला का नाम है विज्ञान ।

मार्क्स का वक्तव्य धर्म के संबंध में वैसा ही है, जैसे किसी गुंगे का वक्तव्य संगीत के बारे में, या किसी अंधे का वक्तव्य प्रकाश के बारे में । किताबों में धर्म नहीं है । अगर किताबों के धर्म को धर्म समझा जाए, तो मार्क्स ठीक कहता है कि धर्म एक भ्रमात्मक सूर्य है, अच्छा है कि आदमी इससे मुक्त हो जाए । अगर गिरजाघरों में, मंदिरों में, मस्जिदों में धर्म समझा जाए, तो मार्क्स का कहना ठीक है, इनसे मुक्त हो जाए ।

जिसको मार्क्स धर्म समझ रहा है, वह धर्म नहीं है । धर्म बुद्धि में नहीं है, मस्जिद में नहीं है, न मंदिर में है । धर्म तो एकात्मता में है, जहाँ समाधी है, वहाँ धर्म है ।

धर्म मानवता की सीढ़ी है, ऐसा कहो । या ऐसा कहो कि असली मनुष्य होने की कला है । दोनों का मतलब एक ही होता है । अगर तुम असली मनुष्य हो, तो मनुष्यता के पार जाने की कला धर्म है । तुम जैसे हो, इससे उपर उठना ही होगा । धर्म तो राजनीतिज्ञों का जाल है । धर्म तो एक ही है, न वह हिंदू है, न मुसलमान है, न वह ईसाई या बौद्ध है । धर्म तो वह है, जब आप अपने भीतर परिपूर्ण मानवता का अनुभव करते है, उस अनुभूति का नाम धर्म है । जब तुम अंतरतम में डूब जाते हो, तो जिसका तुम्हें स्वाद मिलता है, उसका नाम धर्म है ।

धर्म तो चिरंतन है । और जो चिरंतन है उसी का नाम धर्म है । उसकी न स्थापना करनी होती है, ना उसे कोई मिटा सकता है । उसका मिटना असंभव है । अगर धर्म मिट जाए तो हम सब बिखर जायेंगे । धर्म टूटा तो सब टूट जाएँगे । धर्म तो सबको जोडे हुआ है । धर्म तो वह धागा है, जिसने सब फूलों को अपने में गूँथा हुआ है । यह सारा अस्तित्व गूँथा है । जिससे गूँथा है, उस सूत्र का नाम धर्म है ।

किसी ने गुरुद्वारा बना लिया, किसी ने मंदीर बना लिया, किसी ने मस्जिद बना ली है । लेकिन मंदिर, मस्जिद और गुरुद्वारा के भीतर जिसकी पूजा की जा रही है, वह एक है । 'श्री गुरुग्रंथसाहिब' में जो पढ़ा जा रहा है, और वेद में जो पढ़ा जा रहा है, गीता में और कुराण में जो पढ़ा जा रहा है, शब्द तो अलग-अलग है लेकिन जिस तरफ उन शब्दों के इशारे है, वह एक है । जिसको वह एक दिखाई पडता है, वह ज्ञानी है । जिसको अनेक दिखाई पड़ता है, वह मूर्ख है ।

तुम जा नहीं सकते थे अपने बल, तुम्हें मंदिर ले जाया गया । तुम हिंदू हो तुम मुसलमान हो, तुम सिक्ख हो, तुम ईसाई हो, यह बात बार-बार दोहराई गयी, वह प्राणों में उतर गयी । इसके पहले की बुद्धि पैदा होती, इस के पहले की इस बात ने तुम्हारे भीतर जडे जमा ली । अब तुम सोचते हो, मैं हिंदू हूँ, मैं मुस्लिम हूँ, सिक्ख हूँ ।

भाईचारा तभी संभव है, जब हम अपना अहंकार, संकीर्णता, भेदाभेद की भावना छोड देंगे ।

मानवता ही सच्चा धर्म है ।

# साहित्य में जीवन दर्शन

रमेश जगन्नाथ निकम
११ वी वाणिज्य

साहित्य की सरिता जीवन की असंख्य कोमल व कठोर भाव-भूमियों के बीच में होकर बहती है। यह जीवन से प्रेरणा ही ग्रहण नहीं करती वरन् जीवन के प्रति उसका कुछ सन्देह भी होता है। मनुष्य एक चेतना सम्पन्न प्राणी है। संसार की प्रत्येक वस्तु उसके मस्तिक पर एक प्रतिक्रिया का सृजन करती है, और अपनी उस प्रतिक्रिया को शब्दों के साँचे में ढाल कर जब वह व्यक्त कर देता है, तो साहित्य का निर्माण होता है। साहित्य जीवन की विशद समन्वय - भावना का प्रतीक है। सृष्टि के आरंभ से आज तक मानव मस्तिष्क ने जो कुछ सोचा है, ह्दय ने जो अनुभव किया है, और वाणी ने उसे जो सुंदर शब्द प्रदान किये है, उनका व्यक्त रूप ही साहित्य है। साहित्य मानव - विचारों, अनुभवों, अनुभूतियों, भावनाओं, इच्छा और आकांक्षाओं की कलात्मक अभिव्यक्ति ही तो है।

प्रेमचंदजी के शब्दों में, "साहित्य लेखक का मनोवैज्ञानिक जीवनचरित है, वह उसके आध्यात्मिक सामंजस्य का व्यक्त रुप है। साहित्यकार को साहित्य सृजन की प्रेरणा मूलत: जीवन से प्राप्त होती है। उसका अपना जीवन ही उसके अपने लिए एक पहेली है। वह अपने आप को समझना चाहता है और अपने आपको समझने के जो प्रयास उसने आज तक किए है वे ही संसार में साहित्य के रुप में रक्षित है। केवल अपने आप को समझने कें प्रयास मात्र से कलाकार का आत्मसंतोष नहीं होता, वह आपने आपको व्यक्त भी करता है, क्योंकि जैसा उसने अनुभव किया है वैसा ही वह दूसरों को अनुभव भी कराना चाहता है। अपनी अभिव्यक्ति को सुन्दर बनाने का यह प्रयत्न ही 'कला' की सृष्टि करता है। "जीवन सौंदर्य की साधना है और कला उस की अभिव्यक्ति।"

मेथ्यू अनरोल्ड ने कहा है, "साहित्य मूलत: जीवन की आलोचना है।" वह हमारे जीवन की भावनाओं व अनुभूतियों की रागात्मक अभिव्यक्ती है! मानव की भावनाएँ, मानव-जीवन में ही जीवित है; अत: जीवन और साहित्य की संबंध अटूट व अभेद्य है। साहित्य का जन्म मनोभावों से है, इसीलिए वह हमारे जीवन का आंतरिक अभिव्यक्ती है। भारतीय आदर्श के अनुसार जीवन के आंतरिक रुप को और जीवन के अध्यात्मिक आधार को ही महत्त्व दिया गया है। साहित्य जीवन के अध्यात्मिक आधार से प्रेरणा ग्रहण करता है, उसका संबंध लेखक के मानसिक जगत् से होता है; उसमें पाठक के मानस पर प्रभाव डालने की क्षमता होती है। साहित्य हमें अज्ञान से ज्ञान की ओर, स्थूल से सूक्ष्म की ओर, रुप से कुरुप की ओर अंधकार से प्रकाश की ओर ले चलता है।

जैसा अभी कहा गया है कि लेखक स्वयं अपने लिए एक पहेली है, वह अपने-आपको समझना चाहता है। सत्य, शिव और सुंदर की खोज में वह निरंतर व्यस्त है, आत्मदर्शन साधना में वह सतत लगा हुआ है और साहित्य उसकी आत्मदर्शन की साधना का ही फल है।

कलाकार की अपनी कृतियों में केवल उसका व्यक्तित्व ही नहीं वरन् वह जग-जीवन का भी प्रतिनिधित्व करता है। विश्वनिर्माता की भाँति कलाकार अपनी कृति के कण-कण में समाया होता है। उसके एक-एक शब्द पर उसके व्यक्तित्व का प्रभाव है, उसके जीवन की छाप होती है। तभी तो यह कहा गया है कि, "शैली ही व्यक्तित्व है।" किसी कृति को समझने के लिए हमें उस कृति के लेखक के जीवन से परिचय प्राप्त करना भी आवश्यक है। रचना का महत्त्व रचयिता के कारण ही होता है। इस प्रकार हम देखते हैं कि साहित्य में जीवन का प्रकाश, उसकी विविधता, उसकी उलझनों का सुलझाव, उसका प्रकाशन, उसकी प्रेरणा, प्रतिक्रिया,

अनुभूति और चेतना का समावेश है । जिस साहित्य में जीवन की अभिव्यक्ति नहीं, वह निर्जीव होता है । साहित्य का केवल जीवन से ही नहीं वरन् समाज से भी गहरा और अटूट सम्बन्ध है । किसी कवि ने सत्य ही कहा है —

"अन्धकार है वहाँ, जहाँ आदित्य नहीं है
मुर्दा है वह देश, जहाँ साहित्य नहीं है ॥"

साहित्य और समाज का सम्बन्ध स्वंय 'साहित्य' शब्द से ही स्पष्ट है । जनसाहित्य की भावनाओं के प्रकाशन से जो युक्त है; जो सबके सहित है, वही तो साहित्य है । साहित्य समाज का दर्पण है, वह जनता की चित्त-वृत्तियों का संकलित स्वरुप है । जिस युग में जिस प्रकार के भावों, विचारों और आदर्शों की प्रधानता होती है । हिन्द्री साहित्य के इतिहास को इस तथ्य के समर्थन में उपस्थित किया जा सकता है । युद्धों और संघर्षों के उस वीरगाथा काल में जो हिन्दी कविता वीरदर्प से पूर्ण थी, उसे पढकर हृदय की भाव-भंगी आज भी रणक्षेत्र की तलवारों पर नाचने लगती है । वही हिन्दी कविता निराशा, पराजय और पतन के भक्तिकाल में भक्ति और प्रेम की पीयूष-वाहिनी बन गई और आत्मविस्मरण, वैभव और विलास के नग्न युग रीतीकाल में उसने साक्षात रवि का रुप ही ग्रहण कर लिया । उसी हिन्दी कविता ने राष्ट्रीय जागरण और चेतना के सुप्रभात में भारत-माता के भाल पर भव्य भावनाओं का कुंकुम बिखेरा और आज निर्माण के इस नये युग में वह नवनिर्माण की अग्रदूतिका बन गई हैं । इससे यह सिद्ध होता है कि साहित्य में समाज की प्रवृत्ति, भावधाराओं और आदर्शों का प्रकाशन होता है ।

धर्म, मानव जीवन और साहित्य का संबंध शाश्वत है । सृष्टि के प्रारंभ से ही प्रकृति की सुषमा और शोभा ने मनुष्य को आकर्षित किया, उसके रौद्र रुप ने कभी- कभी उसे क्षुब्ध भी किया । सृष्टि के आरंभ से आज मनुष्य ने जीवन, जगत, प्रकृति और परमात्मा के संबंध में जो कुछ सोचा है, उसे हम दर्शन के नाम से जानते है । सृष्टि के कण-कण में व्याप्त उस विश्वात्मा के और अपने (आत्मा के) संबंधों पर जब मनुष्य ने विचार किया तो दर्शन का जन्म हुआ । इसके विपरीत आत्मा और परमात्मा के संबंध जब मस्तिष्क का विषय न रहकर हृदय का विषय बन गए तो रहस्यवाद का सूत्रपात हुआ । दर्शन की भावभूमि मस्तिष्क और रहस्यवाद की भावभूमि हृदय है । आचार्य शुक्ल ने रहस्यवाद की परिभाषा इस प्रकार की है - " साधना क्षेत्र में जो अद्वैतवाद है, भावना के क्षेत्र में वही रहस्यवाद है ।" हिन्दी के आधुनिक युग में रहस्यवादी काव्य का अपना एक महत्त्वपूर्ण स्थान है, इस में कवी की तीव्र कल्पना व आत्मिक अनुभूति की प्रधानता होती है । हिन्दी के रहस्यवादी काव्य में प्रेम, सौंदर्य, वेदना आदि की प्रधानता है । कबीर हिन्दी के प्रथम रहस्यवादी कवि कहे जाते है ।

प्रत्येक युग के साहित्यिक आदर्शों में भिन्नता होती है । आदर्शों और आस्थाओं की इस भिन्नता के आधार पर ही साहित्य की विशेषताओं का सृजन होता है. प्रत्येक के साहित्यकी अपनी विशेषताएँ होती है । इन विशेषताओं के कारण ही साहित्य चिर शाश्वत व चिरनवीन है । वह एक होते हुए भी अनेकत्व से परिपूर्ण है और अनेक रुप होते हुए भी एक है । हिन्दी का छायावादी काव्य अपने युग का सुन्दरतम् काव्य है । छायावादी काव्य में प्रकृति में चेतना रोपण करने का प्रयास किया गया । छायावादी काव्य के सशक्त कवि 'जयशंकर प्रसादजी है । उनका 'आँसू' और 'कामायनी' हिन्दी साहित्य की अमर निधियाँ है ।

साहित्यकार अपने समय और समाज की परिस्थितीसे निर्मित ही नहीं होता वरन् वह उसका निर्माण भी करता है । साहित्यकार को समाज का मुख भी कहा गया है । वह असंख्य मूक, दु:खी, निराश और दलित प्राणियों का नेता और संदेश वाहक होता है । वह कल्पना और स्वप्नलोक का प्राणी न होकर वास्तव में जग जीवन का प्रकाशक होता है । श्रीमती सरोजनी नायडू ने साहित्य जीवन और समाज के इस संबंध को इस प्रकार व्यक्त किया है : " कवि केवल एक स्वप्न- द्रष्टा ही नहीं होता, वरन् उसका हृदय संसार की भावनाओं का दर्पण है । उसके प्रसन्नता के गीतों में संसार के हास्य की गूँज होती है । और उसके दु:ख के गीत मानवता के आँसुओं को प्रतिबिंबित करते है ।"

# मनुष्य बनाम पर्यावरण

अर्जुन भोई
एम. कॉम., द्वितीय वर्ष

सृष्टि विधाता की एक अद्‌भुत रचना, हर तरह से संतुलित हर रुप में सुंदर, कवियों- लेखकों के लिए प्रेरणास्रोत, कहीं बर्फ की शुभ्र चादर लपेटे पर्वत, तो कहीं हरियाली का आँचल ओढे मैदान । तो कहीं विशाल सागर और कहीं अनंत मरुस्थल । विधाता ने इस संपूर्ण सृष्टि को सजाया है, तरह तरह के प्राणियों से, पशु-पक्षीयोंसे इन सभी में महत्त्वपूर्ण है 'मनुष्य' क्योंकि वह अन्य प्राणियों से भिन्न है । वह बुद्धिमान है । उस में वैचारिक क्षमता है और वह छल प्रपंची भी है ।

सृष्टि का जन्म कब हुआ इस की कोई निश्चित तिथि तो ज्ञात नहीं, तब से.१९ वीं शताब्दी तक पर्यावरण पूरी तरह से सुरक्षित था । लेकिन प्रगतिशील मनुष्य ने अपनी बुद्धि की सार्थकता सिद्ध करते हुए आविष्कारों का ताँता-सा लगा दिया और यही से आरंभ हुआ मनुष्य का अधिकाधिक भौतिकवादी हो जाना । मनुष्य ने अपने भौतिक सुख-सुविधाओं के बदले पर्यावरण को मानो अजीर्ण रोग दे दिया ।

मनुष्य पर्यावरण संतुलन में किसी प्रकार का विघ्न न डालते हुए अपना विकास कर सकता है । साथ ही साथ भौतिक सुख-सुविधाओं को प्राप्त कर सकता हैं । परंतु यहाँ बाधक बन जाती है उसकी स्पर्धात्मक प्रवृत्ति, स्वार्थ, अहंकार तो दूसरी ओर सामाजिक पिछडापन, भूख, भयंकर बेकारी और गरिबी । इन स्थितिओं में पर्यावरण रुपी ऊख कोल्हू के बीच निचोड दिया जाता है ।

पर्यावरण को मनुष्य ने कई तरह से आहत किया है । जैसे कि देश की सुरक्षा के नामपर भयंकर अस्त्रों का निर्माण । यह अस्त्र संपूर्ण सृष्टि के लिए अभिशाप है । विचित्र विडंबना यह है कि इन घातक अस्त्रों का निर्माण मनुष्य ने अपने ही तरह मनुष्य के प्राण हानि के लिए किया है । अत: वे इस तरह से स्वत: के लिए । मनुष्य ने अपनी सुख-सुविधाओं के साथ साथ मृत्यु की भी पूरी व्यवस्था करते हैं । व्यवस्था भी कुछ ऐसी की अंत्यसंस्कार की समस्या ही न हो केवल मात्र एक हाइड्रोजन बम का धमाका, फिर सब कुछ शांत । जिनके प्राण पखेरु उड गये वे भाग्यवान और जिन्हें मृत्यु ने अंगिकार नहीं किया उन्हें बस अपने विकलांग शरीर के लिए यमराज की प्रतीक्षा, वह भी अजीवन । इन घातक अस्त्रों का परिणाम केवल जीवित लोगों के लिए ही सीमित नहीं होता, बल्कि उन अजन्मे शिशुओं को भी जीवन प्राप्त करने के बाद झेलने पडते है ।

इन अस्त्रों की परिक्षा के दौरान बडी मात्रा में जहरीली गैस पर्यावरण को भेंट दी जाती है और इसके ऐवज में पर्यावरण अपनी 'ओझोन' की परत जरा हटाकर सूरज की तप्त किरणों का मार्ग साफ कर देती हैं । मनुष्य को जब इसका अहसास होता है, तब वह चिंता करता है, चर्चायें होती हैं, फिर मत-भेद होता है । आरोप-प्रत्यारोप होते है । सभी एक स्वर मे कहते हैं ओझोन परत का क्षीण होना समस्त जीवित प्राणियों के लिए हानिकारक है । परंतु प्रत्यक्ष में कोई कुछ नहीं करता - अस्त्रों का निर्माण पूर्ववत चलता रहता है । इन अस्त्रों के आधनुनिकिकरण के लिए और अधिक धन खर्च किया जाता है । साथ ही यह इच्छा भी प्रकट की जाती है, "देश की गरिब

जनता को घास क्यों न खाना पडे, परमाणु बम अवश्य बनायेंगे, हजार साल तर लड़ेंगे।"

कारखानों की चिमनियाँ जहरीला धुआँ उगलती है। अगर वह जहरीला धुआँ उगलना बंद कर दे तो औद्योगिक प्रगति ठप्प हो जायेगी, लोगों के पास काम नहीं होगा, वे बेकार हो जायेंगे, वे एक बार फिर पिछड जायेंगे। तब सब वे धनुष्य-बाण लेकर जंगल की खोज में निकलेंगे, लेकिन इन लोगों को जंगल कहाँ मिलेगा? सभी जंगलों को तो काट-काट कर हजम कर गये हैं। पर इन्हें बदहजमी नहीं होती, डकार नहीं आती। आज कल तो शेर चीते भी शहरों में दिखाई देते है। सीधे 'टेल्को कंपनी' में चले जाते है। नौकरी के लिए नहीं, जंगल की खोज में। आपके मन में यह प्रश्न उठ सकता हैं कि धनुष्य-बाण ही क्यों? हल-बैल क्यों नही? बात यह है कि रासायनिक खादों के अत्याधिक प्रयोग के कारण भूमि तो बंजर बन गयी है। मेघों ने खेतों से मुँह मोड लिया है। भला उसे बंजर भूमि से कैसा मोह? उसे तो हरियाली पसंद है। अब परिस्थिति यह है की 'अकाल'रुपी राक्षस समस्त विश्व को ग्रासने के लिए आतुर है। कीटकनाशकों के प्रयोग से कीटकों का तो कुछ बिगडा नहीं परंतु मनुष्यों की अस्पताल की लंबी कतार कई गुना बढ गयी है।

मनुष्य तो ध्वनि प्रदूषण का आदी हो चुका है। उसे तो शांत वातावरण में नींद ही नहीं आती। और जब वह सो जाये तो कुंभकर्ण को जगानेवाले भी पिछड जायेंगे। मुर्गे की कुक, चिडियों की चहचहाट का ही नहीं, अपितु 'आलाराम' की तेज ध्वनि का भी उसपर कोई असर नहीं होता। ध्वनि प्रदूषण के और भी कई लाभ है, जैसे कि मनुष्य का स्वभाव बदल जाता है, तो ऐसा मनुष्य निःसंदेह भोजन कम करता है। इससे देश के अनाज की बचत होती है। तेज ध्वनि के कारण आसानी से नींद नहीं आती है, तो घरपर डाका पडने का सवाल ही नहीं उठता क्योंकि वह खुदही प्रहरी बनकर जागता रहता है। अतः अलग से रखवालदार रखने की आवश्यकताही नहीं होती।

विश्व समुदाय बढते हुये तापमान से चिंतित है। तो इसका सरल और साधा उपाय होगा भगवान से संपूर्ण भारत को वातानुकूलित बनाने का वरदान प्राप्त करना। अगर वह वरदान मिल जाए तो लोग गर्मी में राहत की साँस लेंगे और विश्व हमारे देश का अनुसरण करेगा। इससे हमारे देश के 'कर्ज' का बोज तो कुछ कम हो जायेगा।

आपकी इच्छा स्वच्छ जल पीने की है तो कुएँ और नदीयों पर जाने की कोई जरुरत नहीं, वह तो दुकानों में 'मिनरल वॉटर' के नाम से मिल जायेगा। नदी का नाम लेते ही गंगा का स्मरण हुआ होगा। गंगा की वर्तमान स्थिति से आँखे भी नम हो सकती हैं। इस दुख को दूर करने के लिए एक उपाय हैं, जैसे कि हमें अपने गौरवपूर्ण इतिहास पर गर्व है, इसी शृंखला मे गंगा को भी जोड देंगे और अभिमान से कहेंगे की, 'किसी समय गंगा नदी अपने विशिष्ट गुणों के कारण अन्य नदीयों से श्रेप्ठ थी।'

सृष्टि के पूर्ण कल्याण के लिए इस संसार को दो-चार 'सद्दाम हुसैन' और उतने ही 'बुश'आवश्यक है। क्योंकि जो प्रदूषण इन लोगों ने महिने भर में कर दिखाया है वह पूरे विश्व को वर्षों से साध्य नहीं हो रहा था। यह अपने आप में एक मिसाल है। मानव जाति कि ओर से यह पृथ्वी को एक सौगात है। सभी देशों को चाहिए कि इन महान नेताओं का अनुसरण करें, आपस में लडे, वर्षों से जो अस्त्र - शस्त्र बेकार पडे हैं, उनका सदुपयोग करे, अपनी महत्त्वाकांक्षाओं को पूर्ण करें। अपनी श्रेप्ठता को सिद्ध करें। 'चिपको' आंदोलन के कार्यकर्ता 'ग्रीन फ्रेंडस' डॉ. सलिम अली, 'जीम कॉर्बेट' आदि सनकी मिजाज 'पर्यावरण बचाओ' आंदोलन चला रहे हैं। अगर ये लोग सफल हो गये तो पृथ्वी का कल्याण कैसे होगा?

# मंथरा अभी भी जिन्दा है।

जितेंद्र राजपूत
११ कला

